CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

मकर संक्रांति

तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...

सोलापूर | बुधवार, १४ जानेवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ४९ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## राज्यातील १२ झेडपी, १२५ पंचायत समिती
# निवडणुकांचा वाजला बिगुल!

### ५ फेब्रुवारीला मतदान, ७ तारखेला निकाल



### शुक्रवारपासून अर्ज आता ग्रामीण रणधुमाळी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १३ जानेवारी-**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची राळ मंगळवारी थंडावली असतानाच आता राज्यातील विविध १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले आहे.

याठिकाणी ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. येत्या शुक्रवार (दि. १६) उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५0 टक्केहून कमी आरक्षण असलेल्या १२जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१; तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होणार असून याक्षेत्रांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज केली.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होईल.

**परिषद आणि पंचायत समितीसाठी प्रत्येकी एक मत द्यावयाचे**

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या वेळी ऑनलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती; परंतु विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन या निवडणुकांच्या शेवटच्या टप्प्यात पारंपरिक पद्धतीने म्हणजे ऑफलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे स्वीकारण्यात आली. त्यानंतर महानगरपालिका निवडणुकीतसुद्धा ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आले होते. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही आता ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील.



**मतदान केंद्र आणि ईव्हीएम**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी सुमारे २५ हजार ४८२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) उपलब्धता करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट, १ लाख १0 हजार ३२९ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे.

**'जातवैधता पडताळणी'बाबत**

राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.

| निवडणूकीचा तपशील असा | |
|---|---|
| एकूण जिल्हा परिषदा | १२ |
| एकूण जागा | ७३१ |
| महिलांसाठी जागा | ३६९ |
| अनुसूचित जातींसाठी जागा | ८३ |
| अनुसूचित जमातींसाठी जागा | २५ |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा | १९१ |
| **पंचायत समित्यांच्या जागांचा तपशील** | |
| एकूण पंचायत समित्या | १२५ |
| एकूण जागा | १,४६२ |
| महिलांसाठी जागा | ७३१ |
| अनुसूचित जातींसाठी जागा | १६६ |
| अनुसूचित जमातींसाठी जागा | ३८ |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा | ३४२ |
| **महत्वाच्या तारखा** | |
| नामनिर्देशनपत्र स्वीकारणे | १६ ते २१ जानेवारी |
| छाननी | २२ जानेवारी |
| माघारीची अंतिम मुदत | २७ जानेवारी |
| चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी | २७ जानेवारी |
| मतदान | ५ फेब्रुवारी |
| मतमोजणीचा | ७ फेब्रुवारी |



**एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र...** सोलापूर : ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांच्या यात्रे निमित्त मंगळवारी मंदिर परिसरातील संमती कट्ट्यावर अक्षता सोहळा पार पडला.



## महत्वाचे...




### लोकमंगल महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा रुग्णालयाचे संवेदना प्रकल्प जिल्हा समन्वयक सारिका सोनवले व अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी निखिल धुमाळ, ओम पवार, अभिजीत तनपुरे, भक्ती काटकर, प्रियांका वळसे, सानिका यादव, मंजुनाथ कुंभार आदींनी आपल्या मनोगतातून स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचे महत्त्व पटवून सांगितले. प्रमुख पाहुणे सारिका सोनवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य व आजचा युवक याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा . निशा काटे, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा माने देशमुख, प्रा. स्मिता धायगुडे, प्रा. सुप्रिया डोके, प्रा. रोहिणी सोमवंशी, प्रा. मयुरी क्षीरसागर, प्रा. अपूर्वा पिस्के उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैष्णवी मागाडे यांनी केले.



### वेळापूर पोलिस स्टेशनच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**वेळापूर, दि. १३ जानेवारी-**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून वेळापूर पोलिस स्टेशनच्या वतीने हद्दीतील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित पत्रकारांना प्रशस्तीपत्र देऊन पारंपरिक पद्धतीने फेटा बांधून वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक कांबळे, पत्रकार बांधव तसेच वेळापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पत्रकार सूर्यकांत भिसे, रामचंद्र मगर, यांनीही विचार व्यक्त केले.



### राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त पानगाव आरोग्य केंद्राला व्हीलचेअर अर्पण

**वैराग, दि. १३ जानेवारी-**

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्ह्यातील पानगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला व्हीलचेअर अर्पण करण्याचा सामाजिक उपक्रम महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटी आणि बागवान सोशल फाउंडेशन, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त पोलिस निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र बागबाव वर्किंग कमिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शरीफ बागवान, पानगावचे सरपंच जयसिंग देशमुख, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश पाटील यांच्यासह पिंटू नाईकवाडी, प्रकाश कानगुडे, इब्राहिम काजी, जुबेरभाई येळशिकर, हाजी मुस्ताकभाई मोहोळकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच गावातील इम्रान बागवान, शारिक बागवान, सुलतान मुजावर, सलमान मुजावर, रईस बागवान वैराग आणि वैराग बागवान जमातीचे अध्यक्ष इस्माईलभाई बागवान यांचीही उपस्थिती लाभली. पानगावचे सरपंच जयसिंग देशमुख यांनी मनोगतात दोन्ही संस्थांचे कौतुक करीत प्राथमिक आरोग्य केंद्राला व्हीलचेअर देऊन रुग्णांसाठी मदतीचा हात दिल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. पानगाव आरोग्य केंद्राचे सहाय्यक बापू यादव यांनी आभार मानले.



### मानेगावमध्ये जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**वैराग, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यातील मानेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांनी जिजाऊंच्या कर्तृत्वाचा आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा जागर केला. यावेळी सुरेखा वाघमारे, कोमल डाके, रजनी घोंगडे, अविदा डाके, संगीता डाके, सुरेखा डाके, रसिका डाके, अश्विनी डाके, इंदुमती डाके, लोचना डाके, लक्ष्मी मोरे उपस्थित होते.

## वैरागकरांच्या आरोग्याशी खेळ

# कोट्यवधींचे जलशुद्धीकरण केंद्र धूळ खात पडून

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १४ जानेवारी-**

वैराग शहरात भीषण परिस्थिती समोर आली आहे. गेल्या ४०-५० वर्षांपासून वैराग शहराला दूषित पाणीपुरवठा होत असून, तक्रारी करूनही नगरपंचायत प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. यंत्रणा असूनही पाण्याचे शुद्धीकरण' नाही

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगणी तलाव येथे कोट्यवधी रुपये खर्च करून पाणी शुद्धीकरण यंत्रणा बसवण्यात आली आहे. मात्र, ही यंत्रणा केवळ शोभेची वस्तू बनली आहे. प्रत्यक्षात या यंत्राचा वापरच केला जात नाही. इतकेच नव्हे तर, ज्या टाक्यांमधून गावाला पाणीपुरवठा होतो, त्या टाक्यांची अनेक दिवसांपासून स्वच्छता केलेली नाही. या टाक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आळ्या आणि शेवाळ साचले असून, तेच पाणी नागरिकांच्या घरात पोहोचत आहे.

वैराग शहराची लोकसंख्या आज ५० ते ६० हजारांच्या घरात आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला दूषित पाणी देऊन प्रशासन कोणाच्या मृत्यूची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. जर दूषित पाण्यामुळे वैरागमध्ये एखादी जीवितहानी झाली, तर त्याची जबाबदारी मुख्याधिकारी की जिल्हा प्रशासन घेणार? असा प्रश्न अर्जदाराने उपस्थित केला आहे.

या प्रकरणी आतापर्यंत कोणती कारवाई केली, याची लेखी माहिती अर्जदारास देण्यात यावी आणि तातडीने स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा जनआंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

> **केवळ कागदोपत्री कारभार**
>
> या गंभीर विषयावर वैराग नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी श्रीमती विद्या पाटील यांच्याकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री घोडे नाचवले जात असून प्रत्यक्ष जमिनीवर कोणतीही सुधारणा झालेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरविकास शाखेकडेही दाद मागून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.




## प्रथमेश म्हेत्रेनी घेतला नगराध्यक्ष पदाचा पदभार

**उपनगराध्यक्षपदी जिलानी नाकेदार; स्विकृत सदस्यपदी उदयकुमार म्हेत्रे, बसवराज हौदे**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

दुधनी नपा चा पदभार नुतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांनी मुख्याधिकारी तथा प्रशसक लक्ष्मीकांत कहर यांच्या हस्ते स्विकारला पदभार घेताच पहिल्या सभेत उपनगराध्यक्ष निवडीचा कार्यक्रम झाला . उपनगराध्यक्ष पदी जिलानी चॉंदसाब नाकेदार यांचा एकमेव अर्ज आल्याने अविरोध निवड झाली स्विकृत सदस्या करिता उदयकुमार म्हेत्रे ' बसवराज हौदे यांचे अर्ज प्राप्त झाल्याने दोघांची निवड झाली .

याप्रसंगी प्रमुख उपस्थिति मध्ये शिवसेनेचे जिल्हयातील जेष्ठ नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे ' जेष्ठ नेते शंकर म्हेत्रे, वैशाली म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी दुधनी नगर परिषद नुतन नगरसेवक शिंदे शिवसेनेचे नगरसेवक व नगरसेविका अश्विनी हरळेकर, श्रीदेवी कोळी, पवार हरिचंद्र, सरूबाई मळेकर, मधुमती म्हेत्रे, सिद्धाराम येगदी, सुष्मा धल्लू, राऊफ निंबाळकर, सुनंदा चिंचोळी, बसवराज बसवनकेरी, संगीता पाटील, स्वाती सोळशे, अंजनाबाई पोलिस पाटील, ललिता गद्दी, सातलिंगप्पा परमशेट्टी, जगदेवी कोतली, महांतेश पाटील, संगमेश्वर सिन्नूर, बसवराज परमशेट्टी, आदिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुरु हबसी गुलाब खैराट शंकरराव म्हेत्रे, मंदिर पंचकमिटी चेअरमन चंद्रकांत येगदी, मलकाजप्पा अंधेनी, गिरमलप्पा सावळगी, सातलिंगप्पा परमशट्टी, सिद्धाराम मल्लाड, लक्ष्मीपुत्र भाईकट्टी, मल्लिनाथ म्हेत्रे, निंगण्णा सोळसे, शरणबसप्पा हावशेट्टी , सचिन माशाळ आदी दुधनी शहरवासीय प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते.



## सांगोला नगरपरिषद उपनगराध्यक्षपदी नितीन इंगोले

**स्वीकृत सदस्यपदी विजय इंगोले, तनुजा एरंडे**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जानेवारी-**

मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी सांगोला नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीसाठी नवनिर्वाचित सदस्यांची पहिली सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष तथा पिठासीन अधिकारी आनंदा माने यांच्या अध्यक्षतेखाली राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे संपन्न झाली.

उपनगराध्यक्ष पदासाठी शिवसेना पक्षा तर्फे नितीन विठ्ठल इंगोले यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड तसेच स्वीकृत सदस्य पदासाठी शिवसेना पक्षा तर्फे विजय वसंत इंगोले व सांगोला शहर विकास आघाडी तर्फे तनुजा बाळासाहेब एरंडे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर करण्यात आलेले नामनिर्देशनपत्र वैध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले असल्याने त्यांना नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती झाली असल्याचे पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष आनंदा माने यांनी घोषित केले. यावेळी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी उपस्थित होते.

## पापरकर, वाळुजकर, थिटे यांची स्विकृत नगरसेवकपदी वर्णी

**भालके गटाचे नाव अद्यापही गुलदस्त्यात**







**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जानेवारी-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीकडून तीन स्विकृत नगरसेवकांची नावे मंगळवारी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर, सुनील वाळुजकर तसेच सौरभ थिटे यांची वर्णी लागली आहे.दुसरीकडे भालके गटाच्या वाट्याला एक स्विकृत नगरसेवकपद आलेले आहे. मात्र त्यांच्याकडून अद्याप कुणाचेही नाव जाहीर करण्यात आलेले नाहीत.

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीत ३६ नगरसेवकां पैकी २४ जागांवर परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे २४ नगरसेवक निवडून आलेले होते. तर भालकें यांच्या नेतृत्वाखालील तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे ११ नगरसेवक निवडून आलेले होते. एक जागेवर अपक्ष नगरसेवक निवडून आला.

दरम्यान निवडून आलेल्या सदस्यांच्या संख्याबळानुसार परिचारक गटाला तीन आणि भालके गटाच्या वाट्याला एक स्विकृत सदस्यपद आलेले होते. गेल्या दोन,चार दिवसांपासून परिचारक गटातील अनेक जण स्विकृत सदस्यपदी आपली वर्णी लागावी म्हणून आपआपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह परिचारकांच्या भेटीगाठी घेत होते. माजी आमदार प्रशांत परिचारक, विद्यमान आमदार समाधान आवताडे तसेच युटोपियन शुगर्सचे सर्वेसर्वा उमेश परिचारक यांच्या विचारविनीमयातून अखेर मंगळवारी तीन नावे निश्चित करुन ती जाहीर करण्यात आली. त्यामध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाट, ड. सुनील वाळुजकर आणि सौरभ काशिनाथ थिटे यांची निवड करण्यात आली. दरम्यान सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जावून जिल्हा प्रशासनाधिकारी योगेश डोके यांच्याकडे मंगळवारी दुपारी या तिघांकडून आपआपली नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात आली. यावेळी त्यांच्या समवेत पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सतीश मुळे, अर्बन बँकेचे संचालक हरीश ताठे, पालिकेतील भाजपाचे गटनेते भागवत बडवे तसेच ज्येष्ठ नगरसेवक सुजित कुमार सर्वगोड, अमोल डोके, विश्वनाथ आळगे आणि ओंकार वाळूजकर हे उपस्थित होते.

## शेळ्या चोरटे जेरबंद; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर, दि. १३ जानेवारी-**



शेळ्या चोरी प्रकरणी पंढरपूर तालुका पोलिसांनी तीन आरोपींना शिताफीने जेरबंद करुन त्यांच्याकडून सहा शेळ्या, एक विवो कंपनीचा मोबाईल, रोख रक्कम आणि एक टेम्पो असा एकूण ६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे या आरोपींकडे चौकशी करीत असताना इतर पाच गुन्हांचा छडा देखील लावण्यात पंढरपूर तालुका पोलिसांना यश आल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांनी दिली.

लक्ष्मी टाकळी येथे २ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात-चोरांनी लक्ष्मी टाकळी गावातून शेळ्या चोरून नेल्या होत्या, तसेच १२ जानेवारी २०२६ रोजी गुरसाळे गावातून समाधान बाबर यांच्या शेळ्या चोरून नेल्याची घटना घडली होती. दरम्यान समाधान बाबर यांनी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे त्या बाबत तक्रार दिल्यावरून अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील फिर्यादी यांना सोबत घेऊन उमदी (ता.जत,जि.सांगली) येथे जाऊन सखोल तपास केला असता शेळ्या चोरी प्रकरणी माधुरी भानुदास चव्हाण (वय ३८,रा. माळीनगर), अंबिका सोमनाथ काळे (वय ३८ रा.सवतगाव, ता.माळशिरस) यांच्याकडे तपास करून तिसरा आरोपी उदय विजय काळे (वय २१,रा.सवतगाव) यांना ताब्यामध्ये घेऊन यांच्याकडून पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या चोरीच्या गुन्ह्यातील एकूण ६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या संशयीत आरोपीकडून एकूण पाच गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. आरोपी उदय विजय काळे याचे ताब्यातून एकूण चार शेळ्या जप्त केल्या असून त्या फिर्यादी समाधान बाबर यांनी आपल्याच असल्याच्या ओळखलेले आहेत. उदय काळे हा संशयीत आरोपी सध्या कोठडीत आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, एपीआय शहाजी गोसावी, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, एएसआय रमेश बनसोडे, आबासाहेब शेंडगे, सुधाकर हेंबाडे, संजय गुटाळ, सागर गवळी, महिला पोलीस चोपडे आणि चालक पोलीस हसन नदाफ, विलास घाडगे यांनी पार पाडली.




## मतदान हे लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन : डॉ. काळवणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

भारत हा लोकशाही समृद्ध देश आहे. ही लोकशाही अधिक बळकट व सक्षम करण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदान हे केवळ हक्क नसून लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पी.एम.-उषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय 'मतदार जनजागृती व्याख्यान' कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. राजीवकुमार मेंते (संचालक, संगणकशास्त्र संकुल) होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. मतदान प्रक्रियेबाबतचे गैरसमज, मतदार नोंदणीचे महत्त्व, लोकशाहीतील युवकांची भूमिका यावर चर्चा झाली.

# शंकरनगर येथे त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धेला रंगत

**● मल्लांचा उत्साह,खुल्या व वजनी गटातील स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ जानेवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर अकलूज येथे सुरु असलेल्या ४७ व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेत रंगत आली असून मल्लांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ ते १४ जानेवारी या कालावधीत स्पर्धेचे आयोजन केले आहे.



यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, बाळासाहेब तरसे, चंद्रकांत मगर,दत्ता मगर,वसंतराव जाधव,पोपट भोसले पाटील, बिभीषण जाधव यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी,कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते व आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक राम सारंग व त्यांचे पंच स्पर्धे साठी कार्यरत आहेत.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी तिसऱ्या फेरी अखेर खुल्या गटात अनिल जाधव करमाळा यांच्यावर मात करत रविराज चव्हाण पंढरपूर हे विजेते झाले. श्रीधर वावरे सांगली यांनी सचिन जरांगे अकलूज यांच्यावर मात केली. संकेत शिंदे कंदर यांनी अभिजीत सोनवणे कंदर यांच्यावर मात केली. आर्यन पाटील माळशिरस यांनी सचिन काळे आटपाडी यांच्यावर मात केली. मोहसीन गावडे पुळुज यांनी महादेव झंजे माळशिरस यांच्यावर मात केली. अविनाश गावडे सराटी यांनी हनुमंत काळे कंदर यांच्यावर मात केली. सुरज राऊत निमगाव यांनी अर्जुन सावंत काटी यांच्यावर मात केली. अर्जुन सुळ मोरोची यांनी आदित्य कोकाटे अकलूज यांच्यावर मात केली. सोमनाथ कोकाटे पुणे यांनी निलेश यादव खुडूस यांच्यावर मात केली. सागर देवकाते निमगाव यांनी विक्रम भोसले खवसपूर यांच्यावर मात केली. सायंकाळी उशिरापर्यंत वजनी गट व खुल्या गटाच्या कुस्त्या सुरू होत्या.

अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धे साठी ८०, तर वजनी २५ ते ८५ पर्यंतच्या गटा करीता ६०३ मल्लांनी सहभाग घेतला आहे.स्वागत वसंतराव जाधव यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
सोलापूर | बुधवार, १४ जानेवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

मकर संक्रांति

तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...

# काहींची प्रतिष्ठा तर अनेकांचे अस्तित्व पणाला

## प्रचार संपला आता वेध उद्या होणाऱ्या मतदानाचे; काही प्रभागात हाय व्होल्टेज लढती

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

महापालिका निवडणुकीचा प्रचार मंगळवारी सायंकाळी पाच वाजता थंडावला आता उमेदवारांसह नेत्यांना वेध लागले आहेत ते गुरुवार, १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाचे. या महापालिका निवडणुकीत महायुतीमधील मित्रपक्षच आपसात लढत असल्यामुळे विरोधकांना काहीसा जोर चढला आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झंझावाती सभा सोलापुरात झाली मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापुरातील रोड शो रद्द झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार हे तर सोलापूरकडे फिरकलेच नाहीत. शिगेला पोहचलेल्या प्रचारामुळे काहींची प्रतिष्ठा तर अनेकांचे अस्तित्व पणाला लागले आहे. प्रमुख लढतही भाजपा आणि सेना-राष्ट्रवादी यांच्यातच असल्याची चर्चा रंगली आहे. काही प्रभागात हाय व्होल्टेज लढती रंगल्या आहेत.

यंदा सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे. भाजपासाठी तर शिंदेसेनेच उमेदवार यांनी तर थेट भाजपा आमदार देवेंद्र कोठे यांनाच ओपन चॅलेंज करत आपली गाठ आता विधानसभा निवडणुकीत असल्याचे जाहीरपणे घोषित केले आहे.



एकतर्फी वाटणारी ही निवडणूक मित्रपक्ष शिवसेना व राष्ट्रवादी युती आणि महाविकास आघाडीने काहीसे आव्हान निर्माण करून निवडणुकीत रंग भरला आहे. प्रभाग सातमध्ये भाजपा आणि शिंदेसेना यांच्यात मोठी हाय व्होल्टेज फाईट बघावयाच मिळत आहे

प्रभाग तीन मध्ये माजी सभागृहनेते भाजपाचे संजय कोळी आणि पूर्वाश्रमीचे भाजपाचे सभागृहनेते सध्या शिवसेनेकडून लढणारे सुरेश पाटील यांच्यात लढत चुरशीचे आहे. काँग्रेसचे माजी नगरसेवक सिध्दाराम चाकोते किती मते घेणार यावर विजयाची गणिते अवलंबून असणार आहेत.

प्रभाग सहामध्ये पूर्वाश्रमीचे उबाठा ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख आणि सध्याचे भाजपाचे उमेदवार गणेश वानकर आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक मनोज शेजवाल यांच्यात चुरशीची लढाई आहे.

प्रभाग १४ मध्ये एमआयएमचे तौफिक हत्तुरे यांच्या विरोधात माजी नगरसेवक समाजवादी पक्षाचे उमेदवार रियाज खरादी यांच्यात लढत आहे.

प्रभाग १५ मध्ये पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी नगरसेवक सध्याच भाजपाचे उमेदवार विनोद भोसले आणि काँग्रेसचे माजी महापौर अरिफ शेख यांच्यात चुरशीची लढत आहे. तर याच प्रभागात ओबीसीमधून काँग्रेसचे माजी पक्षनेते चेतन नरोटे यांच्या विरोधात पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे पण सध्या भाजपाचे उमेदवार आंबादास करगुळे यांच्यात सामना रंगला आहे.

प्रभाग १६ मध्ये पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसेचे माजी उपमहापौर सध्याचे भाजपाचे उमेदवार दिलीप कोल्हे आणि काँग्रेसचे नरसिंग कोळी यांच्यात लढत आहे. तर पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी महापौर सध्याचे समाजवादी पक्षाचे उमेदवार यु.एन. बेरिया आणि एमआयएमचे उमेदवार गाझी जहागीरदार हेदेखील मैदानात आहेत.

प्रभाग २२ मध्ये पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे महापालिकेतील गटनेते किसज जाधव यांच्या विरोधात शिवसेनेचे कुणाल गायकवाड आणि राष्ट्रवादीचे जुबेर शेख हे मैदानात आहेत.

प्रभाग २४ मध्ये भाजपाचे माजी शहराध्यक्ष तथा महापालिकेतील विरोधी पक्षनेते नरेंद्र काळे यांच्या विरोधात शिवसेनेने नव्या दमाचे विकास कदम यांना मैदानात उतरवले आहे. भाजपाचे माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या पत्नी उषा काळे यांना एसटी प्रवर्गातून शिवसेनेने मैदानात उतरवले असून त्यांच्या विरोधात वनिता पाटील लढत आहेत. एकूणच काय तर या निवडणुकीत यंदा भाजपाने स्वबळावर मैदानात उतरून रंगत आणली आहे. सर्वांचे आता मतदानाकडे लक्ष लागले आहे.

### पालकमंत्री सोलापुरात ठाण मांडून

गतवेळी महापालिकेत एकहाती सत्ता आणि महायुतीतील मित्रपक्षाचे शहरातील अस्तित्व पाहून भाजपाने यंदा महापालिका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांची सभा झाली असून महापौर भाजपाचाच होणार, भाजपा यंदा ७५ पार अशा घोषणा करणारे पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापुरात ठाण मांडून सूत्रे हलवत आहेत.

### पत्रा आणि मंगळवेढा तालमीत चुरशीची लढत

सोलापुरातील बहुचर्चित पत्रा तालीम आणि मंगळवेढा तालमीचा समावेश असलेल्या प्रभाग सातमध्ये यंदा हाय व्होल्टेज लढत आहे. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख माजी नगरसेवक अमोलबापू शिंदे यांच्या विरोधात भाजपाने पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर नाना काळे यांना मैदानात उतरवले आहे. या लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचेच लक्ष लागले आहे.

# प्रचारतोफा थंडावल्या; आता घरोघरी ‘तोंडी प्रचार’

◆ **मुंबई, १३ जानेवारी**

मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी थंडावल्या. मात्र, घरोघरी जाऊन ‘तोंडी प्रचार’ करण्याची मुभा निवडणूक आयोगाने दिली असल्याने, प्रत्यक्ष भेटी-गाठींना वेग आला आहे.

राज्यातील २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २,८६९ नगरसेवकांसाठी शुक्रवारी मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५,९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे ७ ते साडेपाच वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.



प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने सर्व राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात बुलेटने रोड शो केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत, तर अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो केला. राज ठाकरे यांनीही पुण्यात प्रचार केला. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, मिरा भाईंदर, आणि भिवंडी निजामपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी विविध पक्षाच्या उमेदवारांनी, नेत्यांनी प्रचारफेऱ्या काढल्या. ठिकठिकाणी पोलिसांनी पथसंचलन करीत नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले. (वृत्तसंस्था)

### हिंसाचाराचे गालबोट

**निवडणूक प्रचारकाळात काही शहरांमध्ये हिंसाचाराच्या घटनांमुळे गालबोट लागले. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली, मिरज आणि कुपवाडसारख्या ठिकाणी दगडफेकीच्या, उमेदवाराच्या घरावर हल्ल्यासारख्या घटना घडल्या. मुंबई उमेदवारावर चाकू हल्ला, आकोट आणि सोलापुरात तर थेट हत्या झाल्यात.**


नागपूर महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी रोड शो आयोजित करण्यात आला. दुचाकीवर प्रचार करताना देवेंद्र फडणवीस

# दहा मिनिटांत ‘डिलिव्हरी’ बंद

### झेप्टो, ब्लिंकिट, स्विगीबाबत केंद्राचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, १३ जानेवारी**

मागील काही वर्षांपासून भारतात क्विक कॉमर्सची झपाट्याने वाढ होत आहे. मात्र, आता या क्षेत्रासंबंधी केंद्र सरकारने मंगळवारी एक मोठा निर्णय घेतला आहे. देशभरातील डिलिव्हरी बॉय आणि गिग वर्कर्सच्या सुरक्षेच्या पृष्ठभूमीवर केंद्राने दहा मिनिटांत डिलिव्हरी देण्यावर बंदी घातली आहे. केंद्रीय कामगार मंत्रालयाने यासंदर्भात देशातील प्रमुख ऑनलाईन डिलिव्हरी/क्विक कॉमर्स कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.



केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी या संदर्भात ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी आणि झोमॅटोसारख्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि डिलिव्हरी वेळेची मर्यादा काढून टाकण्याचा निर्देश दिला. यानंतर सर्व कंपन्यांनी सरकारला आश्वासन दिले की, ते आपापल्या ब्रॅण्ड जाहिराती आणि सोशल मीडियावरून डिलिव्हरी वेळेची मर्यादा काढून टाकतील. म्हणजेच, आता यापुढे कोणतेही सामान दहा मिनिटांत मिळणार नाही. ब्लिंकिटकडून तत्काळ अंमलबजावणी सरकारी निर्देशांचा तात्काळ परिणाम ब्लिंकिटवर दिसून आला. कंपनीने आपल्या सर्व जाहिरात आणि मंचावरून दहा मिनिटांत डिलिव्हरीचा उल्लेख हटवण्याची घोषणा केली आहे.

कंपनीने आपली टॅगलाईन बदलत ‘१० मिनिटांत १०,०००+ उत्पादने’ ऐवजी, ‘तुमच्या दारात ३०,०००+ उत्पादने’ अशी केली आहे. येत्या काही दिवसांत इतर क्विक कॉमर्स कंपन्यांकडूनही अशाच प्रकारचे निर्णय घेतले जातील

# भाजपाने विकासाच्या मुद्द्यांवर दिला भर

### दुहेरी पाईपलाईन, विमानसेवा, आयटीपार्क ठरणार निर्णायक

### महापालिकेत सत्ता आणण्याचा पालकमंत्र्यांचा निर्धार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणुकीत सध्याचा कल पाहता भारतीय जनता पार्टीचे पारडे जड असल्याचे दिसत आहे. याला एकमेव कारण म्हणजे विकासाचा मुद्दा. भाजपा केवळ शहर विकासाचा मुद्दे घेऊन या निवडणुकीत उतरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टर्निंग पॉईंट ठरलेली सभा आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह चारही आमदारांचे विकासाचे व्हिजन याचा फायदा भाजपाच्या उमेदवारांना निश्चितच होण्याची शक्यता आहे.

पहिल्यापासून पालकमंत्री जयकुमार गोरे आणि चारही आमदारांची निवडणुकीची दिशा ही केवळ विकासाची होती. केंद्रात भाजपाचे सरकार, राज्यात भाजपाचे सरकार आता महापालिकेतही पुन्हा भाजपा सरकार आले तर सोलापूरच्या विकासाला एक नवी उर्जा प्राप्त होणार आहे. दुहेरी पाईपलाईनसाठी ८९२ कोटी रुपये दिले आणि त्याचे काम सुरु झाले. सोलापूरची विमानसेवा सुरु झाली आणि आता नाईट लँडींगसाठी प्रयत्न सुरु आहेत. आय टी पार्कची घोषणा झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यात जागा निश्चित होऊन काम सुरु झाले. वर्षभरात आयटीपार्कची उभारणी सुरु होऊन येथील तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. ही तीनही महत्वाची कामे केवळ भाजपाने करुन दाखवली. विरोधक मात्र केवळ टिका करण्यात आणि इतर गोष्टीत व्यस्त राहिले.

महापालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापुरात तळ ठोकून आहेत. चारही आमदारांना सोबत घेऊन प्रत्येक प्रभागात सभा, पदयात्रा यामध्ये स्वतः सहभागी होत आहेत. सोलापुरातील प्रत्येक भागातील प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्यासाठी काय करता येईल याचा विचार करताना दिसत आहेत. याचा सकारात्मक परिणाम शहरातील नागरिकांकडून मिळत आहे.

### मुख्यमंत्र्यांची सभा ठरली टर्निंग पॉईंट



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर विजयी संकल्प सभा पार पडली. एकतर बाराबंदी वेशात येऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोलापूरकरांची मने जिंकली. त्याच बरोबर किरकोळ अपवाद वगळता त्यांनी विरोधकांवर टिकाच केली नाही. देवाभाऊंनी ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्दयांभोवती असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी संपूर्ण भाषणात शहर आणि जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्दयांना हात घातला. सोलापूरकरांना दररोज पिण्याचे पाणी देणार, विमानसेवा सुरु झाली आता दुसऱ्या शहरात विमानसेवा व नाईट लँडिंगची सुविधा देणार, आयटी पार्कची सुरुवात झाली ते पूर्ण करुन येथील युवकांच्या हाताला सोलापूरातच काम देणार या प्रमुख विषयांसह नाशिक-सोलापूर- अक्कलकोट महामार्ग होत असल्याचे सांगत वाढवण बंदराशी सोलापूर जोडण्यात येणार असल्याचे सांगितले. सोलापूरच्या विकासाच्या वाटा रुंद करण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. त्यांची अभूतपूर्व अशी सभा या निवडणुकीतील टर्निंग पॉईंट ठरणार यात शंका नाही.

पालकमंत्री विरोधकांवर टिका करण्यापेक्षा विकासाचे व्हिजन सांगत निवडणुकीला सामोरे जात आहेत. यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्देच राहिले नाहीत. भाजपाने ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्दयावर आणून ठेवली आहे.

आम्ही विकासकामे करणार तुम्ही काय करता? ते सांगा हाच भाजपाचा निवडणुकीतील नारा ठरला आहे. शहराला गती देणाऱ्या तीनही कामांचा शुभारंभ झाला; आता सोलापुरातील गुंठेवारीचा प्रश्न, प्राणीसंग्रहालयाची पुर्नउभारणी, बोरामणी विमानतळ, धूळमुक्त शहर, पर्यटनाचा आराखडा, एमआयडीसीत सुविधा, हद्दवाढ भागातील सोईसुविधा, आयुर्वेदिक दवाखान्याची उभारणी, शहरात मराठी बरोबरच इंग्रजी माध्यमांच्या शाळा उभारणा, कर प्रणालित सुसुत्रता आणून नागरीकांवरील करांचा बोजा कमी करणार, बांधकाम परवाने सुलभ करणार यासह अनेक आश्वासने भाजपाने आपल्या जाहिरनाम्यात दिली आहे. नागरीकांना भाजपाचा विकासाचा हा जाहिरनामा आश्वासक वाटत आहे.

प्रत्येक ठिकाणी चर्चा आहे ती केवळ विकासाची. भाजपाने संपूर्ण निवडणूक विकासाच्या मुद्दयावर आणून ठेवली आहे. याचा फायदा भाजपाला या निवडणुकीत होणार आहे.

### मुख्यमंत्री ममता बॅनर्जी १७ गुन्ह्यांत आरोपी

**नवी दिल्ली :** दरोडा, लूट, घोटाळे, आरोपींना संरक्षण आणि चोरी यांसारख्या १७ गुन्ह्यांमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, शासकीय अधिकारी, काही मंत्र्यांचा सहभाग असल्याने याचा निष्पक्ष तपास करण्यासाठी सीबीआय चौकशीची परवानगी द्यावी, अशी मागणी ईडीने सर्वोच्च न्यायालयात केली.

# आम्ही सोलापूरचे डॉन; अक्कलकोटमध्ये जावून दादागिरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१३ जानेवारी**

आम्ही सोलापूरचे डॉन आहोत, सुपारी घेवुन लोकांना मारणे हाच आमचा धंदा आहे असे म्हणत अक्कलकोट येथील फत्तेसिंह ग्राउंड जवळ वॉकिंग करणारा दोघांना चार आरोपीने धारधार हत्याराने एकाला डोक्यात मारुन गंभीर जखमी करून त्याचे खिशातून जबरदस्तीने २ हजार ७०० रु.रोख रक्कम काढून घेतले आहे. या बाबत उत्तर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला असून कोर्टाकडून चारही आरोपींना तीन दिवसांची पोलिस कष्टडी मिळाला आहे.

सोमवार दि.१२ रोजी रात्री साडे आठ ते नऊ दरम्यान अक्कलकोट येथील फत्तेसिंह ग्राउंडजवळ वॉकिंग करणारा दोघांना आरोपी समर्थ सोमनाथ जाधव वय २० वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, अथर्व बलभीम अंधारे वय २१ वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, जुनैद मोहसिन शेख वय २२ वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, श्रेयश सिद्राम गायकवाड वय २२ वर्षे रा. सेंटलमेंट फ्री कॉलनी नंबर २ सोलापूर असे चार आरोपीने संगनमत करून फिर्यादी शरणप्पा यांना लाथाबुक्याने मारहाण करुन फिर्यादीचे खिशातील २७०० रुपये जबरदस्ती हिसकावून काढून घेतले, चारही आरोपींना कोर्टा समोर हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक दिपक भिताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ ५६७ कोळी हे अधिक तपास करीत आहे.

### बिनविरोध निवड प्रकरणी आज उच्च न्यायालयात सुनावणी

◆ **मुंबई, १३ जानेवारी**

महापालिका निवडणुकीतील बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध याचिकांवर बुधवारी सुनावणी होणार आहे. आता न्यायालयाच्या निर्णयावर बिनविरोध उमेदवारांचे भवितव्य निर्भर आहे.

राज्यात २९ महापालिका निवडणुका सुरू आहेत. त्यात सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. मात्र, या निवडणुकांच्या मतदानापूर्वी राज्यात ६८ ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, हे उमेदवार सत्ताधारी महायुतीचे आहेत. त्यात सर्वाधिक बिनविरोध भाजपाचे आणि त्याखालोखाल एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेना पक्षाचे तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत.

या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव आणि अन्य काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सदर याचिकांवर बुधवारी सुनावणी होणार आहे.

उमेदवारांना पैशाची आमिषे, दबाव आणि दहशतीचा वापर करून सत्ताधाऱ्यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला, असा मनसेचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# श्वानाने हल्ला केल्यास राज्य सरकार भरपाई देणार

**सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती**

**काळजी वाटते त्यांनी श्वान घरी न्यावे**

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

श्वान चावल्याने मुले किंवा वृद्ध जखमी झाल्यास अथवा त्यांचा मृत्यू झाल्यास आणि राज्यांनी वेळीच पावले न उचलल्यास आम्ही मोठी नुकसान भरपाई आकारू, अशी कठोर भूमिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी घेतली. नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांनी मागील पाच वर्षांत काहीही केले नाही, अशा शब्दांत न्यायालयाने राज्यांची जबाबदारी निश्चित केली.



भटक्या श्वानांना खायला घालणाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित केली जाईल. तुम्हाला या प्राण्यांवर इतके प्रेम असेल, तर त्यांना तुमच्या घरी का घेऊन जात नाही? हे श्वान रस्त्यांवर का फिरत राहावेत, लोकांना चावावेत आणि घाबरवावेत? त्यांना आम्ही असेच सोडू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले.

> आम्हाला अर्धा दिवस अधिकाऱ्यांना उत्तरे मागण्यात घालवावा लागतो. त्यांच्या निष्क्रियतेमुळे समस्या हजारपटीने वाढली आहे. न्यायालयीन कामकाज हे सार्वजनिक व्यासपीठ बनले आहे. २०११ मध्ये माझी बढती झाल्यापासून, मी कधीही इतके लांबलचक युक्तिवाद ऐकले नाहीत आणि कोणीही मानवांसाठी इतका लांब युक्तिवाद केला नाही.
> **न्या. संदीप मेहता**

श्वानांमध्ये एक विशिष्ट प्रकारचा विषाणू असतो. त्यावर कोणताही उपचार नाही. आतापर्यंत चार दिवसांच्या सुनावणीत भावना केवळ श्वानांसाठीच दिसत आहे. रस्त्यांवरील श्वान नऊ वर्षांच्या बालकावर हल्ला करतात, त्यासाठी जबाबदार कोण असेल आणि आम्ही डोळे झाकून घ्यायचे का, असा सवाल न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने उपस्थित केला. या प्रकरणी आता पुढील सुनावणी २० जानेवारी रोजी होईल. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# चीनने नखे काढलीच

व्याप्त काश्मीरच्या मुद्यावर चीनने पुन्हा एकदा भारताची चिंता वाढविणारी भूमिका घेतली आहे. गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भविष्यात दोन्ही देशांमध्ये शक्सगम खोऱ्यावरून लष्करी तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत. शक्सगम खोरे व्याप्त काश्मिरातील गिलगिट-हुंझाचा भाग आहे. नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत मनोहारी असलेला हा भाग लष्करी आणि रणनीतिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यानंतर गिलगिट एजन्सीचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यात होता. येथे कार्यरत इंग्रज लष्करी अधिकारी विलियम ब्राऊन हा फितूर झाला आणि त्याने जम्मू-काश्मीर संस्थानचा अत्यंत मोक्यावरील हा प्रदेश पाकिस्तानात विलीन केल्याचे घोषित केले. पहिल्या भारत-पाकिस्तान युद्धात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चुकीच्या धोरणांमुळे गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश शत्रूच्या ताब्यात गेला. स्कार्दू या ठिकाणी काश्मीर संस्थानचे सैनिक तैनात होते; पण हिवाळा असल्याने भारतीय सैनिक त्यांना मदत पोहोचवू शकले नाहीत. परिणामी कारगिलपासून जवळ असलेले हे शहर पाकिस्तानच्या ताब्यात गेले. येथे हवाईतळ उभारण्यात आला. येथे चीनची लढाऊ विमाने तैनात आहेत. पाकिस्तान आणि चीन यांच्यात सीमारेषा नव्हती. २ मार्च १९६३ रोजी दोन्ही देशांमध्ये एक सीमा करार झाला, जो पूर्णपणे अवैध आणि बेकायदेशीर आहे. चीनमधील पेकिंग शहरात पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री झुल्फीकार अली भुट्टो आणि चीनचे परराष्ट्र मंत्री मार्शल चेन यी यांनी २ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. या करारांनुसार काश्मीरच्या उत्तेरकडील ५२०० वर्ग किलोमीटर एवढा भूभाग चीनला परस्पर देऊन टाकला. याच भागातून चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपेक) हा प्रकल्प गेला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात चीनकडून महामार्ग, रेल्वे मार्ग उभारण्यात आले आहेत. एक महामार्ग तर थेट बलुचिस्तानच्या ग्वादार बंदरापर्यंत पोहोचला आहे. ९ जानेवारीला साप्ताहिक पत्रकार परिषदेत सीपेक मुद्यावर बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी १९६३ चा चीन-पाकिस्तान सीमा करार अवैध असून, भारत या कराराला मानत नसल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर सीपेक बेकायदेशीर असून, भारतीय भूभागात प्रकल्प उभारणे कोणत्याही स्थितीत मान्य नाही. शक्सगम खोरे आमच्या जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशाचा अविभाज्य भाग आहे. आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार भारताला आहे, असे त्यांनी कडक शब्दांत सांगितले. या शक्मगम खोऱ्यावर चीनच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी हा भाग आमचाच असून, पाकिस्तान आणि चीन या दोन सार्वभौम देशांमध्ये झालेल्या सीमा करारानुसार आमच्या भूभागात पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले.

भूतकाळात केलेल्या चुकांचे भावी पिढ्यांना परिणाम भोगावे लागतात, याचे तंतोतंत उदाहरण म्हणजे जम्मू-काश्मीर होय. काश्मीरचे संस्थानिक राजा हरि सिंग यांनी संपूर्ण जम्मू-काश्मीर भारतात विलीन करण्याचा निर्णय घेतला. अशावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने देशहित लक्षात घेऊन त्वरित संपूर्ण जम्मू-काश्मीर लष्कर पाठवून ताब्यात घेण्याची आवश्यकता होती. पण, दुर्दैवाने कालापव्यय करीत त्यांनी पाकिस्तानला घुसखोर काश्मिरात पाठविण्याची संधी दिली. भारताकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून ऐन हिवाळ्यात पाकिस्तानने गिलगिट-बाल्टिस्तान आणि काश्मीर खोऱ्यात हजारो घुसखोर आणि सोबत सैनिक घुसविले. महाराजा हरि सिंग यांनी विलीनीकरण दस्तावेजावर स्वाक्षरी केल्यानंतर नेहरू यांनी लष्करी हालचाली सुरू केल्या. पण, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. कारण, तोपर्यंत लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या गिलगिट-बाल्टिस्तान या भूभागावर पाकिस्तानने अवैधरीत्या ताबा मिळविला होता. या प्रदेशाला चीन, अफगाणिस्तान, पाकिस्तानच्या सीमा भिडतात. या भूभागातून भारताला थेट युरोपियन देशांसोबत व्यापार करता आला असता. पण, भविष्याचा थोडाही विचार न करता तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीर मुद्यावर बोटचेपे धोरण स्वीकारले. याचे गंभीर परिणाम आज आपण भोगत आहोत. उलट चीनने भविष्याचा विचार करताना तिबेट तर बळकावलाच पण १९६२ मध्ये लडाखमधील अक्साई चीन हा मोठा भूभागही गिळंकृत केला. 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या घोषणांमध्ये नेहरू आणि त्यांचे पाठीराखे मश्गूल असताना तिकडे चीन काराकोरम महामार्ग उभारण्यासाठी तळमळत होता. १९६१ मध्ये संसदेत अक्साई चीनवर चर्चा सुरू होती. चीनच्या आक्रमक हालचालींमुळे संसद सदस्य चिंता व्यक्त करीत होते. मात्र, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना काश्मीरशी काहीच घेणेदेणे नव्हते, हे त्यांच्या भूमिकेवरून दिसून आले : ''अक्साई चीन, जिथे गवताचे एक पातेही उगवत नाही आणि १७ हजार फूट उंचीवरील हे बर्फाळ ठिकाण मानवासाठी राहण्यास योग्य नाही. तसेच हा भाग कुठे आहे हेही आपल्याला माहीत नाही.'' नेहरूंच्या या विधानावर खासदारांनी आश्चर्य व्यक्त केले. देशाचा पंतप्रधान असे विधान कसे काय करू शकतो, असे भाव खासदारांच्या चेहऱ्यावर होते. मात्र, माजी सैनिक असलेले खासदार महावीर त्यागी हे उभे राहिले आणि व्यंग करीत म्हणाले, ''माझ्या डोक्यावर एकही केस उगवत नाही. याचा अर्थ माझे डोके बेकार आहे काय?'' त्यागी यांच्या या वाक्यावर सर्व खासदार एका क्षणासाठी अवाक् झाले; पण दुसऱ्याच क्षणी सभागृहात हास्याचे फवारे उडाले. पण, दुसऱ्याच वर्षी चीनने १९६२ मध्ये चीनने आक्रमण करीत अक्साई चीनसह लडाखचा बराच भूभाग ताब्यात घेतला. चीनबाबत पंडित नेहरू यांची भूमिका किती तकलादू आणि आत्मघातकी ठरणारी होती हे सिद्ध झाले. चीनने अक्साई चीन घेऊन आज ६४ वर्षे उलटली आहेत. भारत आजही अक्साई चीन आपला भूभाग मानत असला तरी या भागावरील चीनची मगरमिठी अधिकच घट्ट झाली आहे. यावर कडी म्हणजे चीनने आता शक्सगम खोऱ्यावरही दावा सांगितला. या खोऱ्यातून सीपेक-२ अंतर्गत चीनने पाकिस्तानला जोडणारा एक महामार्ग उभारला आहे. चीनचे हे कृत्य चिथावणी देणारे तर आहेच; पण आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे उल्लंघनही आहे. महामार्ग उभारणीला भारताने विरोध करीत शक्सगम खोरे आमचा अविभाज्य घटक असून चीनचे कृत्य बेकायदेशीर असल्याची भूमिका मांडली. यावर तिळपापड झालेल्या चीनने ''चोर ते चोर अन् वरून शिरजोर'' या उक्तीप्रमाणे हे खोरे आमचेच असल्याचे विधान केले.

तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे चीनबाबतचे धोरण किती चुकीचे आणि आत्मघातकी होते हे आता सिद्ध होत आहे. नेहरूंना दोष देण्यात काय अर्थ आणि आणखी किती काळ नेहरूंना जबाबदार धरणार, असे आजचे काँग्रेसचे नेते म्हणत असले तरी, पश्चिम आणि पूर्वोत्तर सीमेवर नेहरूंच्याच चुकांमुळे भारताला एकाचवेळी दोन शत्रूंचा सामना करावा लागत आहे, हे विसरता येणार नाही. चीन आणि पाकिस्तान सातत्याने भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. एकीकडे सीमेपलीकडून दहशतवादी पाठवून भारताला जखमी करण्याचे काम पाकिस्तान सातत्याने करीत असतो तर दुसरीकडे चीन डोकलाम, गलवानसारख्या कुरापती करीत दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतो. व्यापार कराराच्या मुद्यावर आधीच अमेरिकेसोबत तणाव असताना चीनने शक्सगम खोऱ्याचा मुद्दा उपस्थित करीत भारताच्या चिंता वाढविल्या आहेत. पूर्वेकडे बांगलादेशही भारताच्या मुळावर उठला आहे. ज्या देशाला आपण जन्माला घातले, तोच आता आपल्याला वाकुल्या दाखवीत आहे. त्यामुळे भारताला एकाचवेळी पाकिस्तान, चीन आणि बांगलादेश या त्रिकुटाशी सामना करावा लागत आहे. बांगलादेशला ढेकणासारखे चिरडण्यास भारताला थोडाही वेळ लागणार नसला तरी पाकिस्तान-चीन यांचे एकत्रित आव्हान चिंतेत टाकणारे आहे. कारण, शक्सगम खोऱ्याचा संबंध या दोन्ही देशांशी आहे. पण, आज ना उद्या भारताला या आव्हानाचा सामना करावाच लागणार हे मात्र नक्की.

---

## विशेष

# मोहिनी घालणारे रेल्वेचे पूल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतीय रेल्वे २१ व्या शतकातील काही सर्वांत महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प राबवत आहे. हे प्रकल्प राष्ट्रीय एकता मजबूत करणे, रसद सुधारणे आणि आधुनिक रेल्वे नेटवर्कचा विस्तार करणे या स्वरूपाचे आहेत. कठीण भूभागात बांधलेल्या कौशल्यपूर्ण पुलांपासून मालवाहतूक कॉरिडॉर आणि 'हाय-स्पीड' रेल्वेपर्यंत हे प्रकल्प भारताच्या वाढत्या अभियांत्रिकी क्षमता आणि दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रदर्शन जगासमोर करत आहेत. सर्वांत महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक म्हणजे उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल). हा अंदाजे ४४ हजार कोटी रुपये खर्चून बांधलेला अत्यंत धोरणात्मक आणि राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प आहे. २७२ किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक हिमालयीन प्रदेशातून जातो. या प्रकल्पात जगातील सर्वांत उंच रेल्वे आर्च ब्रीज, चिनाब रेल ब्रीजदेखील समाविष्ट आहे. नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला हा पूल आयफेल टॉवरपेक्षा उंच आहे. हा १,३१५ मीटर लांबीचा स्टील आर्च ब्रीज भूकंप आणि वाऱ्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी डिझाईन केला आहे. या प्रकल्पात अंजी नदीवरील भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल असून, त्याला 'अंजी रेल ब्रीज' म्हणून ओळखले जाते. त्याचाही समावेश आहे. या प्रकल्पात ३६ बोगदे (११९ किलोमीटर लांबी) आणि ९४३ पूल समाविष्ट आहेत. 'यूएसबीआरएल' काश्मीर खोऱ्याला सर्व हवामान रेल्वे कनेक्टिव्हिटी प्रदान करते. यामुळे या प्रदेशात वाहतूक, पर्यटन आणि आर्थिक क्रियाकलाप वाढत आहेत.

तामिळनाडूमधील नवीन पंबन रेल्वे पूल हा भारतातील पहिला व्हर्टिकल समुद्री पूल आहे. अंदाजे ५५० कोटी रुपये खर्चून बांधलेला, २.०८ किलोमीटर लांबीचा हा पूल १०० स्पॅनचा आहे. त्यात १८.३ मीटरचे ९९ स्पॅन आणि ७२.५ मीटरचा मुख्य स्पॅन समाविष्ट आहे. या पुलात ३३३ पाईल्स आणि १०१ पाईल्स कॅप्स असलेली एक मजबूत 'सबस्ट्रक्चर सिस्टिम' आहे, जी स्ट्रक्चरल स्थिरता प्रदान करते. त्यात कार्यक्षम भार वितरणासाठी डिझाईन केलेले ९९ 'ॲप्रोच गर्डर्स'देखील समाविष्ट आहेत. हा पूल आव्हानात्मक समुद्री परिस्थिती आणि तीव्र किनारी वाऱ्यांना तोंड देण्यासाठी सक्षम आहे. त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी, एक गंज संरक्षण प्रणाली प्रदान करण्यात आली आहे. ती पुलाचे सेवा आयुष्य देखभालीशिवाय ३८ वर्षांपर्यंत आणि कमीत कमी देखभालीसह ५८ वर्षांपर्यंत वाढवू शकते. हा नवीन पूल एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ असलेल्या रामेश्वरमला रेल्वे कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करतो. त्याच्या प्रगत डिझाईन आणि अभियांत्रिकीची दखल घेऊन नवीन पंबन रेल्वे पुलाला पूल डिझाईन श्रेणीमध्ये प्रतिष्ठित स्टील स्ट्रक्चर्स आणि मेटल बिल्डिंग्ज पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेने ईशान्येकडील राज्यांमध्येदेखील लक्षणीय प्रगती केली आहे. अनेक वर्षांपासून या प्रदेशाला गंभीर कनेक्टिव्हिटी आव्हानांचा सामना करावा लागला. २०१४ पासून ईशान्येकडे १,६७९ किलोमीटरहून अधिक रेल्वे ट्रॅक टाकण्यात आला आहे. २,५०० किलोमीटरहून अधिक मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. ४७० हून अधिक रोड ओव्हरब्रिज आणि अंडरब्रिज बांधण्यात आले आहेत. बैराबी-सैरंग नवीन लाईन पूर्णपणे कार्यान्वित झाली आहे. ती पहिल्यांदाच आयझॉलला रेल्वे नेटवर्कशी जोडते. आयझॉल आता ईशान्येकडील चौथी राजधानी आहे. ती राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कशी जोडलेली आहे. 'अमृत भारत स्टेशन योजने'अंतर्गत ईशान्येकडील ६० स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. शिवोक-रंगपो, दिमापूर-कोहिमा आणि जिरीबाम-इम्फाळसारखे मोठे प्रकल्पदेखील वेगाने प्रगती करत आहेत. हे प्रकल्प ईशान्येकडील देशाच्या उर्वरित भागाशी आर्थिक आणि सामाजिक एकात्मतेत योगदान देत आहेत. लुधियाना ते सोननगरपर्यंत पसरलेला 'इस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' (ईडीएफसी) १,३३७ किलोमीटर लांब आणि पूर्णपणे कार्यरत आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट टर्मिनल ते दादरी यांना जोडणारा 'वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' १,५०६ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी १,४०४ किलोमीटर किंवा ९३.२ टक्के पूर्ण झाले आहे. दोन्ही कॉरिडॉर एकत्रितपणे २,८४३ किलोमीटर लांबीचे आहेत. आजपर्यंत २,७४१ किलोमीटरचे काम सुरू झाले आहे. ते एकूण लांबीच्या अंदाजे ९६.४ टक्क्यांपर्यंत आहे. हे समर्पित कॉरिडॉर प्रवासी मार्गांवरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करत आहेत, प्रवासाचा वेळ, लॉजिस्टिक्स खर्च कमी करत आहेत आणि उद्योग आणि बंदरांसाठी विश्वासार्हता सुधारत आहेत. हे समर्पित कॉरिडॉर भारतातील मालवाहतूक बळकट करत आहेत आणि जलद आर्थिक वाढीला चालना देत आहेत. समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वे 'हाय-स्पीड रेल्वे'च्या क्षेत्रातही प्रगती करत आहे. मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प 'एनएचएसआरसीएल'द्वारे राबवला जात आहे. २१ डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ५०८ किलोमीटर ट्रॅकपैकी ३३१ किलोमीटर व्हायडक्टचे काम पूर्ण झाले आहे. ४१० किलोमीटरसाठी पिअरचे काम पूर्ण झाले आहे. १७ नदी पूल, पाच पीएससी पूल आणि ११ स्टील पूल आधीच पूर्ण झाले आहेत. सुमारे २७२ किलोमीटर आरसी ट्रॅक बेड बांधण्यात आला आहे. ४,१०० हून अधिक 'ओएचई' मास्ट बसवण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात मोठ्या बोगद्याचे बांधकाम सुरू आहे. सुरत आणि अहमदाबादमध्ये रोलिंग स्टॉक डेपोदेखील विकसित केले जात आहेत. या प्रकल्पामुळे भारतात जागतिक दर्जाचे 'हाय-स्पीड' रेल्वे तंत्रज्ञान येईल. यामुळे दोन प्रमुख आर्थिक केंद्रांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत सुरत जिल्ह्यात बांधलेला एक व्हायडक्ट असाच दखलपात्र आहे. पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनचे आगमन, २०२७ पर्यंत प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्प आणि काश्मीर आणि मिझोरामच्या दुर्गम भागात रेल्वे मार्गांचा विस्तार हे सर्व सूचित करतात की भारतीय रेल्वे केवळ वाहतुकीचे नाही तर बदलाचे वाहनदेखील बनले आहे. ते नवीन सीमांवर स्वतःची पुनर्परिभाषा करत आहे. गेल्या वर्षीच ते काश्मीर खोरे आणि मिझोरमची राजधानी आयझॉलला जोडले, जे देशाच्या उत्तर आणि पूर्व सीमांना उर्वरित भारताशी जोडते. देशातील पहिला उभ्या-लिफ्ट रेल्वे समुद्री पूल, पंबन पुलापर्यंतदेखील पोहोचले, जे पाल्क सामुद्रधुनीपर्यंत पसरते आणि दक्षिणेकडील रामेश्वरमला मुख्य भारतीय भूमीशी जोडते.

पश्चिमेकडे पहिली ट्रेन पश्चिम समर्पित फ्रेट कॉरिडॉरवर वैतरणा ते जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत टाकलेल्या १०२ किलोमीटरच्या नवीन ट्रॅकवर धावली. तथापि, या यशांच्या समांतर, वाहतूक व्यवस्थापन आणि मालवाहतुकीची सर्वांत मोठी परीक्षा आहे. क्षमता वाढवण्यासाठी अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत स्थानकांचा पुनर्विकास सुरू आहे; परंतु तो लक्ष्यांपेक्षा मागे आहे. 'कवच'सारख्या सुरक्षा व्यवस्था अजूनही पूर्ण व्याप्तीपासून दूर आहेत. शिवाय, मालवाहतूक हा भारतीय रेल्वेचा कणा आहे, जो त्याच्या एकूण महसुलाच्या ६५ टक्के आहे. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, मालवाहतुकीमध्ये रेल्वेचा वाटा सध्या रस्ते वाहतुकीच्या तुलनेत फक्त २७ टक्के आहे. तो वाढवणे आवश्यक आहे. तथापि, रेल्वे एक हरित वाहतूक व्यवस्था म्हणून आशेचा किरण देते. कारण ती वाहतूक उत्सर्जनात फक्त एक टक्का योगदान देते. भारतीय रेल्वे अशा टप्प्यावर उभी आहे, जिथे यश आणि आव्हाने एकत्र येतात. बुलेट ट्रेनच्या स्वप्नाच्या जवळ जाणे आणि दुर्गम भागात रेल्वेचा विस्तार करणे नवीन सीमा उघडतात; परंतु वाढत्या वाहतुकीचा भार आणि मालवाहतुकीच्या गुंतागुंतीमुळे धोरणकर्त्यांकडून दृष्टी आणि शाश्वत गुंतवणुकीचीदेखील आवश्यकता असते. वेग संतुलित असेल, तंत्रज्ञानाचा समावेश असेल आणि सुरक्षिततेसह विस्तार सुनिश्चित केला गेला, तर भारतीय रेल्वे निःसंशयपणे जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह मॉडेल म्हणून उदयास येईल.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

# अमरावती मनपाचा किंगमेकर कोण?

**गिरीश शेरेकर**

अमरावती महापालिकेच्या २२ प्रभागांच्या ८७ जागांसाठी गुरुवार १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठीचा जाहीर प्रचार मंगळवारी थांबला. या निवडणुकीत सुरुवातीला युती व आघाडीच्या चर्चा झाल्या. शेवटपर्यंत चर्चांच्या फेऱ्या सुरू होत्या. अखेर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन प्रचार सुरू केला. पक्ष व अपक्ष असे एकूण ६६१ उमेदवार रिंगणात आहेत. दहा दिवस जोरदार प्रचार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यापासून भाजपाचे अनेक मंत्री, नेते तसेच इतर पक्षांचे नेतेही प्रचारात सहभागी झाले होते. आरोप-प्रत्यारोप झाले. आता नेमकी वेळ जवळ आली आहे. अमरावती महापालिका हद्दीतल्या मतदारांच्या मनात काय आहे, हे निकालानंतरच स्पष्ट होणार असले तरी अनेक अंदाज वर्तविले जात आहेत. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभागनिहाय वेगवेगळी समीकरणे पाहायला मिळत आहेत. ज्याला जे समजते ते भाकीत सांगितले जात असून नेमका अंदाज काढणे अवघड झाले आहे.

अमरावतीत त्रिशंकू स्थितीची शक्यता वर्तविली जात आहे. अशा स्थितीत महापालिकेचा किंगमेकर कोण होईल? या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल तर गेल्या १५ दिवसांत तयार झालेल्या समीकरणात ते दडले आहे. भाजपाने २०१७ मध्ये स्वबळावर सत्ता स्थापन केली होती. यंदाही भाजपाची सत्ता स्थापन व्हावी म्हणून संपूर्ण ताकद पणाला लावण्यात आली आहे. पण, पहिले शिवसेना आणि नंतर युवा स्वाभिमान पार्टीसोबत भाजपाचा युतीचा घोळ शेवटपर्यंत कायम राहिल्याने उमेदवार निश्चितीवर काही प्रभागांत परिणाम झाला. शेवटी भाजपाने युवा स्वाभिमानसाठी ज्या प्रभागांत जागा सोडल्या होत्या, तेथे अपक्षांना पाठिंबा देऊन युती संपुष्टात आणली. प्रचारा दरम्यानही भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या नेत्यांचे शीतयुद्ध चांगलेच रंगले. या दोन्ही पक्षांचा दुवा असलेल्या भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या विलासनगर - मोरबाग प्रभागातल्या कृतीची दखल भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी सुद्धा घेतली. स्थानिक भाजपा नेत्यांच्या तर ती खूपच जिव्हारी लागली. तेथून वातावरण तापले आणि संभ्रम निर्माण झाला. याचा फटका किती प्रमाणात कोणाला बसेल हे वेळच सांगणार आहे. कोणी कोणाला अंधारात ठेवले माहिती नाही पण, दगाफटका झाला आहे. चार ते पाच प्रभागांत भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारांतच लढत होत असल्याचे चित्र आहे. भाजपाकडून ते बदलविण्याचे आणि स्वाभिमानकडून ते तसेच कायम ठेवण्याचे प्रयत्न जोरात सुरू आहे. कोणाला यश मिळते, हे निकालातून कळेलच! या स्थितीत जर युवा स्वाभिमानला ८ ते १० जागा मिळाल्या तर ते किंगमेकर होण्याची शक्यता दिसत असून भाजपाची घोडदौड ३० ते ३५ जागांवर थांबू शकते. आमदार रवी राणा यांनाही असे वाटत असेल की भाजपा आपल्यावर अवलंबून राहावी. पण, भाजपाला ते नको आहे. राजकीय स्वार्थ म्हणून दोघेही आपल्या जागेवर बरोबर आहे. तसे पाहिले तर राणा 'कलाकार' आहेत. निकाल जर त्यांच्या मनासारखा आला तर ते सर्वांच्या कल्पनेच्या पलीकडे जाऊन अनेकांना धक्का देणारा निर्णय घेऊ शकतात. यासाठी त्यांना नवनीत राणा यांचे बळ मिळेल. वेळ आल्यावर सर्व काही स्पष्ट होईलच.

एक दुसरी स्थिती राष्ट्रवादी अजित पवार पक्षाची आहे. या पक्षाच्या १० ते १२ जागा येण्याची शक्यता आहे. राज्यात भाजपासोबत हा पक्ष आहे. भाजपातला स्थानिक नेत्यांचा निर्णय प्रक्रियेतला जो गट आहे, त्यांना निकालानंतर जर काही वेगळी स्थिती निर्माण झालीच तर युवा स्वाभिमानपेक्षा राष्ट्रवादीसोबत जाणे आवडणारे आहे. (एका अर्थाने त्यांना राणापेक्षा खोडके किंगमेकर झाले तर चालते) वर म्हटल्याप्रमाणे रवी राणा यांनी धक्कातंत्राचा वापर केला तर? फार विचार करण्याची गरजच उरत नाही. एक तिसरी स्थिती म्हणजे पाच ते सहा जागा मिळाल्या तर शिवसेना एक पर्याय भाजपाकडे आहेच. हा पर्यायही तसा सोईचाच आहे. राजकारणात काहीपण होऊ शकते. कोणाला किती जागा मिळतात, यावरच गणित आहे. राष्ट्रवादी, शिवसेना आणि युवा स्वाभिमानची डोकेदुखी नकोच, आपले स्वतंत्रच बरे असे भाजपाला मनोमन वाटते. त्यासाठीच भाजपाने इतक्या गोट्या फिरवल्या पण तसे होईल का? दुसऱ्या बाजूने काँग्रेस स्वतंत्रपणे किल्ला लढवत आहे. गत निवडणुकी इतक्या जागा कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या मुस्लिमबहुल भागातल्या उमेदवारांपुढे अन्य पक्षांचे तगडे आव्हान आहे. उबाठा व अन्य छोट्या पक्षाने उमेदवार दिले आहेत. त्यांचेही प्रयत्न सुरू आहेत. मविआपेक्षा युतीचीच सत्ता बसण्याचा अंदाज अनेकांकडून वर्तविला जात आहे. फक्त समीकरण कसे तयार होते, हेच पाहायचे आहे.

९४२०७२१२२५

---

## धर्म-संस्कृती

# ब्रह्म पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

अठरा पुराणांतील अत्यंत गोड असलेले पुराण म्हणजे ब्रह्म पुराण. भगवान विष्णूंच्या परब्रह्म स्वरूपाचे ज्यात वर्णन आहे म्हणून ते ब्रह्म पुराण. भगवंताच्या दशावताराचेही संक्षेपात वर्णन या पुराणात आहे. याशिवाय भारत देशाचे माहात्म्य, सूर्यादी ग्रहमंडलाची स्थिती इत्यादी वर्णन यात आहे. भगवान श्रीकृष्णाचे विस्तृत चरित्र या पुराणात आहे.

पुराण आणि दशावतार यांची आपण सांगड घालत असल्याने याच पुराणात दशावतार संक्षेपात असले तरीही पुढील भगवान परशुराम अवताराबद्दल आपण चर्चा करणार आहोत.

भगवान परशुराम अवतार म्हणजे ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अनोखा संगम आहे. साधूंचे रक्षण आणि दुष्टांचा विनाश हा भगवंताचा अवतार उद्देश या परशुराम अवतारात ठळक दिसतो. जमदग्नी महामुनी आणि रेणुकामाता यांच्या पोटी आलेला हा बालक म्हणजे


**अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥**

चार वेदांचे ज्ञानी म्हणून ब्रह्मतेजस्वी आणि धनुर्धारीमध्ये अग्रणी म्हणून क्षात्रतेजस्वी असे त्यांचे वर्णन केले आहे.

वडील जमदग्नींच्या आज्ञेचे पालन म्हणून आईचे मस्तक उडविले आणि प्रसन्न झालेल्या वडिलांकडून पुन्हा माता रेणुकेला जीवन मिळवून देणारा मातृ-पितृभक्त म्हणजे भगवान परशुराम.

आपल्या वडिलांना म्हणजे ऋषी जमदग्नी यांना मिळालेली कामधेनू कार्तवीर्य अर्जुन पळवून नेतो आहे म्हणून त्या सहस्रार्जुनाचा वध करून आश्रमातील ऋषींना अभय देणारे महापराक्रमी परशुराम अवतार आहेत.

भगवान परशुराम साधनेसाठी गेलेत हे पाहून सहस्रार्जुनाच्या मुलांनी जमदग्नींच्या आश्रमावर हल्ला करून जमदग्नींना ठार मारले. हे ऐकताच पृथ्वीवरील दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी ज्यांनी कार्तवीर्य अर्जुनाच्या मुलांसह २१ वेळा पृथ्वीवरील दुष्टांचा निःपात केला ते क्षात्रतेजस्वी भगवान परशुराम आहेत.



या हत्येचे पातक फेडण्यासाठी यज्ञ करून यज्ञाचे आचार्य कश्यप ऋषींना संपूर्ण पृथ्वी दान करून ज्यांनी महेंद्र पर्वतावर साधना सुरू केली ते महायोगी भगवान परशुराम. संपूर्ण पृथ्वी दान केल्यामुळे स्वतःला जागा हवी म्हणून आपल्या परशूने ज्यांनी आपल्या सामर्थ्याने समुद्राला मागे हटवून परशुराम क्षेत्र म्हणजे केरळ, कोकण, गोवा किनारपट्टी निर्माण केली ते सामर्थ्यवान भगवान परशुराम आहेत.

ज्यांना स्वयं भगवान शंकराने परशू दिला म्हणून ते परशुराम झालेत. त्यांचे शिष्य देखील भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण आणि रुख्मीसारखे एक एकाचेनी मनोव्यापारे, अवघे विश्व संहारे असे होते.

जे चिरंजीव असल्यामुळे चारही युगात कार्यरत होते आणि आहेत. कृत युगात ज्यांच्या परशू प्रहाराने भगवान गणेशाचा एक दात खुडला त्यामुळे गणपती एकदंत झाले. त्रेता युगात ज्यांच्या धनुष्यभंगामुळे श्रीराम-जानकी विवाह झाला. द्वापार युगात भीष्म-द्रोणादींना शिष्यत्व दिले, भगवान श्रीकृष्णाला साहाय्यभूत झालेत आणि कलियुगात आजही ज्यांचे अस्तित्व जाणवते ते भगवान परशुराम आहेत. त्यांची कथा या ब्रह्म पुराणात आहे.

याशिवाय ब्रह्म पुराणात राजा पृथुची कथा, चौदा मन्वंतरे, वैवस्वत मनुंचे वंशज, सगर राजाचे चरित्र दिले आहे.

जंबुद्वीपासह विविध सहा द्वीपांचे वर्णन, भारत वर्षाचे वर्णन दिले आहे. भगवान सूर्यनारायणाचे माहात्म्य आणि त्यांची नावे दिली आहेत. माता पार्वतीची तपश्चर्या, स्वयंवर आणि भगवान महादेवाशी विवाह, दक्ष यज्ञ विध्वंस.

मार्कंडेय चरित्र, विविध तीर्थ वर्णन या पुराणात आहेत. अनंत वासुदेव माहात्म्य, कण्डूमुनींचे चरित्र दिले आहे. अध्याय ७२ ते ८४ पर्यंत भगवान श्रीकृष्ण चरित्र दिले आहे.

यमलोक, यमद्वार, नरक इत्यादींबाबत माहिती या पुराणात आहे.

धर्मकार्य, अधर्म, अन्नदानाचे महत्त्व, गृहस्थाश्रमाचे धन्यत्व, वर्ण आणि आश्रम व्यवस्था, एकादशी माहात्म्य, नैमित्तिक आणि प्राकृतिक प्रलय वर्णन, त्रिविध तापाचे वर्णन, अध्यात्म-ज्ञान-विज्ञान, योग, क्षर आणि अक्षरयोग याच पुराणात दिला आहे. देवी पार्वतीचे अद्भुत चरित्र, गौतमी, गंगा तथा गोदावरी स्नानाचे महत्त्व या पुराणात दिले आहे.

गृहस्थाश्रमाचे श्रेष्ठत्व देताना हे पुराण सांगते-

**आश्रमाणि च चत्वारि कर्मद्वाराणि मानदः ।**
**चतुर्णामाश्रमाणाम् च गार्हस्थ्यं पुण्यदम् स्मृतम् ।**

सामाजिक समरसता आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग होता. वर्ण जन्माने नाही तर कर्माने ठरत असे.

**सर्वोऽयं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते ॥**
**वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं च गच्छति ।**

गुणवान व्यक्ती जन्माने शूद्र असेल तरीही तिची गणना ब्राह्मण म्हणून होत असे.

कन्या, पुत्र, पृथ्वी, गाय विक्रीला निर्बंध असल्याचेही इथे दिले आहे. त्याला नरक प्राप्ती सांगितली आहे.

**कन्यापुत्रमहीबाजिगवां विक्रयकारिणः ।**
**नरकांत निवर्तन्ते यावदाभूतसंप्लवम ॥**

अतिथीचे स्वागत, आदरातिथ्य आपल्या संस्कृतीचा भाग होता.

**अभ्यागतमनु श्रान्तम् सूर्योढं गृहमागतं ।**
**तं विद्याद्देवरूपेण सर्वक्रतुफलो ह्यसो ।**

थोडक्यात, ब्रह्म पुराणातील परशुराम अवतार ब्रह्मतेज आणि क्षात्रतेजाचा समन्वय होता. त्यामुळेच या भूमीला देवभूमी म्हणत असत. आज मात्र दुर्दैवाने ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांच्यातला समन्वय नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणूनच आपली पुराणे आपला इतिहास असून त्याचा अभ्यास करणे आणि त्याचे अनुसरण म्हणजे भारतीयत्वाची दृढ स्थापना होय.

९८२२२६२७३५

---

## तिळगूळ घ्या... गोड गोड बोला...

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकरसंक्रांत हा त्यापैकीच एक सण. मकरसंक्रांत हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्त्व आहे. मकरसंक्रांत म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. संक्रांत ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो. त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तिळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकरसंक्रांतीच्या दिवशी तिळगूळ वाटला जातो. तिळगूळ देताना ''तिळगूळ घ्या गोड गोड बोला'' असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तिळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे



प्रतीकात्मक रूपही या सणाला आहे. मकरसंक्रांतीला विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी-कुंकू लावून सौभाग्याचे वाण देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे. या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रांतीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावांत पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकरसंक्रांत म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकरसंक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**श्याम ठाणेदार**/ ९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

## वाण देणे प्रदेशानुसार भिन्नता पण भावना एकच

मकरसंक्रांती हा दान, कृतज्ञता आणि सामूहिक आनंदाचा सण आहे. वाण देणे ही त्यातील महत्त्वाची धार्मिक परंपरा आहे. शास्त्रानुसार संक्रांतीच्या काळात यथाशक्ती दान देणे पुण्यकारक मानले जाते. संक्रांतीनिमित्त सुवासिनी हळदी-कुंकू



दान देतात, त्याला वाण म्हणतात. हळदी-कुंकवाचे वाण देणे ही प्रथा असून वाणातील वस्तू सात्त्विक व अध्यात्मपूरक असाव्यात.

याच परंपरेत सुगड्याचे वाण विशेष महत्त्वाचे आहे. 'सुगड' हा 'सुघट' या शब्दाचा अपभ्रंश असून मातीच्या या छोट्या घटांत शेतातील नवे धान्य, कडधान्ये, तिळगूळ, कापूस, बोर, भाजीपाला भरून त्यांची पूजा केली जाते. शेतशिवारातील समृद्धी सर्वांना मिळावी, त्यातील आनंद सगळ्यांना अनुभवता यावा हा त्यामागील भाव आहे. प्रदेशानुसार या प्रथेत भिन्नता आढळते. महाराष्ट्रात सुगडे मातीच्या झाकणाने झाकून देतात, कोकणात काळ्या सुगड्यावर लाल सुगड पालथे ठेवून पूजन करतात, अन्यत्र काळे मोठे सुगड खाली त्यावर लाल सुगड ठेवून दोन्हीत वाण भरतात, गोव्यात सुगड पूजन करतात त्या घटात वेगवेगळ्या प्रकारची कडधान्ये, हिरव्या काचेच्या बांगड्या, हळद-कुंकू आणि सौभाग्याचं वाण ठेवून त्याची पूजा केली जाते आणि पूजा सांगायला आलेल्या ब्राह्मणाला हा घट दान केला जातो. कर्नाटक व आंध्र प्रदेशात एल्लू-बेल्ला (तिळ-गूळ, नारळ, शेंगदाणे) दिले जाते; तामिळनाडूमध्ये पोंगल साजरा होतो; गुजरातमध्ये पतंगोत्सव सोबत तिळगूळ, चिवडा आणि मिठाईचे आदानप्रदान केले जाते. सर्व ठिकाणच्या विविधतेतून एकच संदेश मिळतो, तो म्हणजे ईश्वरकृपेचे आदानप्रदान आणि प्रेम भाव वाढवणे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/ नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# शिव, आंबेडकर जयंतीला जिल्ह्यात डॉल्बी नाही वाजणार

## पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले स्पष्ट; येणाऱ्या अधिकाऱ्यांनी योजना सुरु ठेवाव्यात

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

गतवर्षी जिल्ह्यात गणेशोत्सव हा डॉल्बीमुक्त साजरा झाल्याची दखल सरकारी पातळीवर घेण्यात आली असून सोलापूरचे कौतुक होत आहे. सोलापूरचा डॉल्बीमुक्त पॅटर्न राज्यभर राबविला जाण्याची शक्यता आहे. येत्या काळात साजऱ्या होणाऱ्या शिव जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीत जिल्ह्यात डॉल्बी वाजणार नाही, आम्ही वाजू देणार नाही असे पोलिस अधीकक्षक अतुल कुलकर्णी यांनी आज पोलिस मुख्यालयात झालेल्या वार्तालापात स्पष्ट केले.

पोलिस अधीक्षक कार्यालयाने आपल्या कार्यकाळात पोलिसिंग व्यतिरिक्त अनेक समाजाभिमुख कामे केली आहेत. पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पहाट योजना, गुन्हेगारांना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठी ऑपरेशन परिवर्तन योजना, पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबविले असून त्यांना पंतप्रधान आवासमधून घरे मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला



आहे. स्वागत पोर्टलद्वारे नागरिकांना विविध सुविधा, पोलिस स्टेशनमध्ये येणाऱ्या लोकांना तणाव न वाटता पोलिस आपले वाटले पाहिजे त्यासाठी लोकांशी सुसंवादाचे प्रशिक्षण पोलिसांना दिले जाते आहे. सण, उत्सवासह विविध पोलिस परवानग्यांचे स्टेटस या ॲपद्वारे नागरिकांना कळणार आहे.

एमपीडीए, तडीपारी आणि प्रतिबंधात्मक कारवाईत सोलापूर जिल्ह्यात मोठी कामगिरी झाली आहे. त्यामुळे नगरपालिका निवडणुका सुरळीत पार पडण्यास मदत झाली. गुन्हेगारी जास्त असलेल्या तीस गावांची यादी करून त्या गावात परिवर्तन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. वाहनांना जीपीआएस लावले आहे. पोलिस मुख्यालयात क्रीडा ग्राऊंड तयार केलेले असून येथे फूटबॉल, व्हॉलिबॉल, टेनिस, क्रीकेट खेळांचे सराव सुरु असून पोलिस बॉईज यांच्यासह बाहेरच्या खेळाडूंनाही याचा लाभ घेता येणार आहे. यासाठी प्रशिक्षकही तैनात करण्यात आले आहेत. गार्डन, नर्सरीदेखील सुसज्ज करण्यात आल्याचे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी बाजाराची योजना असून ऑरगॅनिक शेती करणाऱ्यांना येथे मार्केट उपलब्ध करून दिले जाणार आहे. शेतकऱ्यांना आपला शेतमाल थेट विक्री करता येणार आहे. शेतकऱ्यांनीही संपर्क साधण्याचे आवाहन कुलकर्णी यांनी केले आहे. यावेळी जिल्ह्यातील गुन्हेगारी गेल्या दोन वर्षात कमी झाल्याचे सांगताना अतिरीक्त पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी आकडेवारी मांडली. पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी पंढरपूर आषाढी वारी ही हरित वारी संकल्पना तसेच एआय तंत्रज्ञानाद्वारे सीसीटिव्ही मॉनिटरींग असे उपक्रम राबविले, पारधी समाजासोबत दिवाळी सण साजरा केला. शासनाने कुलकर्णी यांच्या कार्याची दखल घेवून सन्मान केला असल्याचे सांगितले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक संजय जगताप यांनीही गुन्हेगारी कमी झाल्याची आकडेवारी दिली. अवैध दारू प्रकरणात ठोस कारवाईमुळे प्रकार कमी झाल्याचेही जगताप यांनी सांगितले.

### बदलून येणाऱ्या अधिकाऱ्यांनी योजना सुरु ठेवाव्यात

पोलिस अधीकक्ष कार्यालयाकडून अनेक लोकाभिमुख योजना सुरु केल्या आहेत. बदली होवनू येणाऱ्या अधिकाऱ्यांनी या योजना पुढे सुरु ठेवल्यास लोकांना त्याचा चांगला लाभ होईल आणि पोलिस व लोकांमध्ये समन्वय वाढेल. योजना पुढे सुरु राहाव्यात यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे हा प्रस्ताव मांडला असून याची अंमलबजावणी होईल, असे कुलकर्णी म्हणाले.

### पासपोर्ट व्हेरिफिकेशनसाठी लोकांच्या घरी जावे

पासपोर्ट पोलिस व्हेरिफिकेशनसाठी संबंधित लोकांना पोलिस स्टेशनला बोलविण्याऐवजी पोलिसांनी त्यांच्या घरी जावे. यासंदर्भात महिला, मुली, लहान मुलांना पोलिस स्टेशनला बोलवून ताटकळत ठेवण्यापेक्षा पोलिसांनी घरी जावून पासपोर्ट व्हेरिफिकेशन करावे, असेही पोलिस अधक्षक अतुल कुलकर्णी यांनी आदेशित केले.

## महत्वाचे...



### महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे बाराबंदीत

सोलापूर : श्री सिद्धेश्वर यात्रेमध्ये अक्षदा सोहळा निमित्त आज महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे हे बाराबंदी परिधान केली होती.यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

**सांगोला, दि. १३ जानेवारी-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज व कॉलेजची माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड होते. यावेळी सचिव अंकुशराव गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.आर. ए. देशमुख यांनी कॉलेजच्या प्रगतीचा आढावा सादर करत माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून निधी उभा करून सध्या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या गोर गरीब विद्यार्थ्यांना मदत करावी, असे आवाहन केले. बाबुराव गायकवाड यांनी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गावी आल्यानंतर कॉलेजला भेट देऊन सध्या ज्ञानग्रहण करत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा असे आवाहन केले. यावेळी विजय नागणे, शर्विल अंकलगी, संकेत शिंदे, ज्ञानेश्वर पाटील, सोनाली गोडसे या विद्यार्थ्यांनी मनोगतात संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व संचालक मंडळ यांनी सांगोला सारख्या ग्रामीण भागात सुरू केलेल्या या कॉलेजमुळेच आम्ही तंत्रशिक्षण घेऊ शकलो व जीवनात यशस्वी होऊ शकलो अशी भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी प्रा.गणेश मिसाळ, इंजि.निलेश माने, प्रा.आनंद गायकवाड, प्रा.पृथ्वीराज लिगाडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.एस.डी.बावचे यांनी केले.

# गाईंची अवैधपणे तस्करी; ७ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १३ जानेवारी -**

गाईंची अवैधपणे आणि बेकायदेशीर तस्करी वाहतूक करणाऱ्या आरोपीवर मोहोळ पोलिसांनी कारवाई करून ७ आरोपींना अटक केली आहे.

सहा महिन्यापूर्वी म्हणजे ५ जुलै २०२५ रोजी दुपारी साडेतीन ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान नरखेड तालुका मोहोळ येथे फिर्यादी हे गोमास वाहतूक करणारी गाडी पकडण्यास गेले असता त्याचा राग मनात धरून आरोपी नामे दानिश लियाकत कुरेशी,मोहम्मद अली लियाकत कुरेशी शहाबाज अबू तालीब कुरेशी, तौफिक अबूत तालीम कुरेशी, दस्तगीर कोंडाजी कुरेशी, अरबाज अफजल कुरेशी रा धाराशिव यांनी फिर्यादीस तू यांची गाडी का पकडतो म्हणून शिवीगाळ व दमदाटी करून तुला दोन दिवसात जिवंत सोडणार नाही असे म्हणून दंड थोपटून निघून गेले होते. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्ह्याचा तपास करत असताना वरील आरोपीवर अशाच स्वरूपाचे एकूण २६ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

यातील आरोपी व त्यांचे साथीदार यांनी सर्व शरीरा विषयी व प्राणी संरक्षक विषयी गुन्हे यातील टोळीप्रमुख व टोळीतील सदस्यांनी त्या अवैध मार्गाने गैरवाजवी आर्थिक फायदा मिळवण्याकरिता गुन्हेगारी क्षेत्रात व समाजात दहशत निर्माण केलेली आहे. तसेच टोळी प्रमुख व टोळीतील सदस्यांनी मोहोळ परिसरात बेकायदेशीर कृत्य करताना प्राणी संरक्षण विषयक सामाजिक संघटना व नागरिकांना हिंसाचार करण्याची धमकी देऊन मारहाण करत असल्यामुळे सामान्य जनता संतप्त झालेली आहे. टोळी प्रमुख व इतर सदस्य यांचे वर वेळोवेळी प्रतिबंध कारवाई करण्यात आलेली असून देखील त्यांनी वेळोवेळी अशा प्रकारचे गुन्हे करून त्यांचे गुन्हे करण्याचे प्रवृत्ती मध्ये सातत्य ठेवले आहे . त्यांना कायद्याची भीती राहिलेली नसून त्यांचेवर प्रतिबंध करणे गरजेचे असल्याने मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये त्यांचे वर गुन्हे दाखल करण्यात आला होता. त्यात गुन्ह्यांच्या कलमात वाढ करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याच्या तपास कामी १२ जानेवारी रोजी आरोपी दानिश लियाकत कुरेशी(२५), मोहम्मद लियाकत कुरेशी वय(२४), तोफिक अबूतालीब कुरेशी (वय३२), इरफान इकबाल कुरेशी (वय २७) कुरेशी (वय२५) अरबाज अफजल कुरेशी वय (२५) वर्षे राहणार कुरेशी मोहल्ला मोहोळ ता मोहोळ यांना अटक करण्यात आली असून मोहोळ पोलिस अधिक तपास करत आहेत . सदर गुन्हच्या तपासात मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय केसरकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल अविनाश पाटील, दयानंद हेंबाडे, अमोल जगताप, स्वप्नील कुबेर, संदीप सावंत, योगेश खलाटे, सुनिल पवार यांनी ही कामगिरी केली

# चोरुन चालणाऱ्या गावठी दारुच्या हातभट्ट्या उध्दवस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी -**

चोरून अवैधरित्या देशी दारूच्या हातभट्ट्यावर व दारू विक्री करणाऱ्या विरूध्द केलेल्या कारवाईत एकूण ८ लाख ८५ हजार ८२० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून त्यामध्ये १६ हजार, ८०० हजार लिटर गुळमिश्रीत रसायन हातभट्टी दारू, प्लॅस्टीक व लोखंडी बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू, हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य तसेच अवैधरित्या दारूच्या हातभट्ट्या उध्दवस्त करून प्लॅस्टीक व लोखंडी बॅरेल जागीच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे.

वडजी तांडा, शिवा तांडा बक्षीहिप्परगा येथे चोरून अवैधरित्या चालणाऱ्या दारूच्या हातभट्ट्या व एमआयडीसी पाकणी ता.उत्तर सोलापूर येथे हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या विरूध्द छापा कारवाई केली आहे. एकूण ५ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्या कलम ६५ फ व ६५ ई अन्वये एकूण ५ गुन्हे दाखल केले आहेत.

ही कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पो. उपनिरिक्षक घोळवे, बागवान, सपोफौ रामेश्वर कोडक, पोहवा महेश कटकधोंड, पोकॉ सागर ननवरे व विलास लोखंडे व मपोकॉ दिपाली खोत यांनी बजावली आहे.

# आनंद चंदनशिवे यांच्यासह सर्व उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार

## राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांचा प्रभाग ५ मध्ये होम टू होम प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रभाग क्रमांक ५ मध्ये होम टू होम प्रचार करण्यात आला. मकर संक्रांतीनिमित्त तीळगुळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार आनंद चंदनशिवे यांच्यासह भाग्यश्री काळे, महादेवी रणदिवे, गणेश पुजारी यांना विजयी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

वसंत विहार, गायत्री नगर, मडकी वस्ती, वारद फार्म हद्दवाढ परिसरासह बुधवार पेठेतील जय मल्हार चौक, साठे चाळ, नरवीर तानाजी चौक, पठाण चाळ, माशाळ वस्ती, गणेश नगर, लक्ष्मी नगर, गुलमोहर आदी भागांत घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला. आनंद चंदनशिवे



व गणेश पुजारी यांच्या माध्यमातून आजवर झालेल्या विविध विकासकामांची दखल घेत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे प्रमुख गौतम चंदनशिवे, धम्मपाल मैंदर्गीकर, भीमा इंगळे, बाळासाहेब तांबे, उमर शेख, रवींद्र काळे, उमेश रणदिवे, हृदयनाथ मोकाशी, बलवीर तीर्थकर, बिभीषण बाकले, मनोज थोरात, सोमनाथ करंडे, मुकेश मोकाशे, किरण वाळके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**कलाबुरगी येथील खासदार स्टॉल**

सोलापूर विभागातील कलबुरगी स्टेशनवरील एमपीएस स्टॉलसाठी ई- लिलाव (सामान्य लिलाव-सिग्नल स्टेज). लिलाव कॅटलॉग क्रमांक: KLBG-MPS27-1-26. लिलाव सुरू बंद, तारीख आणि वेळ: सुरू - दुपारी 12.00 27.01.2026 बंद - दुपारी 12.30 27.01.2026. स्थानकांचे नाव: ई- कलबुरागी स्टेशनवरील एमपीएस स्टॉलचा लिलाव. पद्धत: ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदेची तरतूद: वार्षिक परवाना शुल्क आणि 4 आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव सेंट्रल रॅलवे/इंडियन रॅलवे पोर्टल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत.

Akar/Sur-4 एसीएम/टीसी/सोलापूर
तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

निशाणी नंबर - ६
कि.दि. अर्ज नं १३९/२०२५

**बार्शी येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सा. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१) श्री रमेश विश्वनाथ सरडेपाटील
वय-६६ वर्षे, धंदा - नोकरी
२) श्री रामदास विश्वनाथ सरडे — **अर्जदार**
वय -६३ वर्षे, धंदा - शेती
दोघे रा. पागंरी, ता बार्शी, जि सोलापूर
३) सौ. सुनंदा विठ्ठल मडके
वय- ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव

**विरूध्द**

कोणीही नाही — **जाब देणार**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नामे १) श्री. रमेश विश्वनाथ सरडेपाटील, २) श्री रामदास विश्वनाथ सरडे, ३) सौ. सुनंदा विठ्ठल मडके हे कै. द्रोपदी विश्वनाथ सरडे यांचे कायदेशीर वारस आहेत.


त्याअर्थी कै. द्रोपदी विश्वनाथ सरडे यांच्या नावे बँक ऑफ इंडिया शाखा पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर बचत खाते नं. ०७३२१०१०००३८४७ असून त्यांच्या खात्यावर रक्कम रूपये ३९,०००/- अक्षरी रक्कम रू. एकोणचाळीस हजार फक्त किंवा जी जमा असेल ती शिल्लक रक्कम आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांनी सदर बचत खातेवरील रक्कम मिळणेकामी या न्यायालयात वारसाप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविणेत येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने व अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध आक्षेप असलेस व मयतास अन्य कोणी वारस असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत व पुढील नेमलेली तारीख १६/०२/२०२६ रोजी में. कोर्टात स्वतः व माहितीगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात, मुदतीत कोणाच्याही तकारी, हरकती प्रकरणी में. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकुम होतील.

ता. १३/०१/२०२६

सही/- कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी
शिक्का
सही/- सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

## दुर्मिळ हरणटोळ साप आढळला, सर्पमित्रांनी वाचवले सापाचे प्राण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

कुंभारी साखर कारखाना रोड परिसरात १० जानेवारी २०२६ रोजी रात्री ११:४५ वाजता दुर्मीळ हरणटोळ साप आढळून आल्याची घटना घडली. सागर बिराजदर यांच्या घराजवळ हा साप आढळला. सर्पमित्रांना संपर्क केले असता सर्पमित्र इमरान पटेल व इस्माईल रंगरेज यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत सापाचा सुरक्षितपणे पकडले.या संदर्भात सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, हरणटोळ हा अत्यंत देखणा आणि परिसंस्थेसाठी उपयुक्त असा साप आहे. सोलापूर परिसरात त्याचा आढळ दुर्मीळ असल्यामुळे ही नोंद वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. साप निघाल्यास नागरिकांनी घाबरून जाता तात्काळ सर्पमित्रांशी संपर्क साधावा. अशा घटनांची नोंद भविष्यातील संशोधनासाठी उपयुक्त ठरते. या यशस्वी बचावामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती होण्यासही मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. सर्पमित्र इम्रान पटेल व इस्माईल रंगरेज यांचे नागरिकांनी आभार मानले.

**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME AAKASH VIJAY RAKA HAS BEEN CHANGED TO **AAKASH VIJAYKUMAR RAKA** RESIDING AT 203 A. WEST MANGALWAR PETH, SOLAPUR - 413002 MAHARASHTRA. KINDLY NOTE THE SAME.

Classifieds

**भाड्याने देणे आहे**

मंद्रूपमधील समर्थ नगर येथील टू बीएचके घर भाड्याने देणे आहे. कुटुंब असणाऱ्यांना प्राधान्य. लाईट, पाणी, पार्किंग, या सर्व सोयी सहित घर भाड्याने देणे आहे.

**संपर्क - सावन चव्हाण**
**९७६७३६९७८९**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/23R, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.In वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. कामाचे नाव: सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर विभागात मलठण स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनच्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत TRD भाग. (पुनर्निमंत्रण). अंदाजे खर्च: 1,22,40,703.62/- बिल्ड सुरक्षा: 2,11,200/- पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 10.02.2026 दुपारी 3:00 वाजता.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)
सीआर, सोलापूर
Akar/Sur-3
तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) सी.आर., सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी पात्र निविदाधारकांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक SUR-NC-CR-SNT-C-S-01-2026 दिनांक १०-०१-२०२६. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या पुणे विभागात ५ स्टेबलिंग लाईनच्या तरतुदीसंदर्भात साईनगर शिर्डी स्टेशनवर इनडोअर आणि आउटडोअर उपकरणांचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 13,89,15,238.08 (रु. तेरा कोटी एकोणऐंशी लाख पंधरा हजार दोनशे अठ्ठावीस पैसे फक्त). निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत: रू 0.00. कमाईची रक्कम: 8,44,600/- (रु. आठ लाख चव्वेचाळीस हजार सहाशे फक्त). काम पूर्ण करण्याचा कालावधी: LOA जारी केल्याच्या तारखेपासून 08 महिने (आठ महिने). पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. निविदा सादर करण्याची सुरुवात तारीख: 20-01-2026. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ तारीख: 03.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ तारीख: 03.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदेची संपूर्ण माहिती उपलब्ध असलेली वेबसाइट: www.ireps.gov.in

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (नियंत्रक) सीआर, सोलापूर
Akar/Sur-1
तुमच्या प्राण्यांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) सी.आर., सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी पात्र निविदाधारकांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक SUR-NC-CR-SNT-C-S-02-2026 दिनांक 11-01-2026. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात सोलापूर-उस्मानाबाद नवीन बीजी लाईनच्या संदर्भात उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान 3 स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद, उस्मानाबाद येथे आरआरआयमध्ये बदल करण्याचे काम आणि उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान 04 स्थानकांवर आउटडोअर सिग्नलिंगचे काम. कामाची अंदाजे किंमत: 25,77,79,676.19 (पंचवीस कोटी सत्तावन्न लाख एकोणसाठ हजार सहाशे छहत्तर पैसे फक्त). निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत: रु.0.00. 14,38,900/- (रु. बयाणा रक्कम: चौदा लाख अठ्ठावीस हजार) नऊशे फक्त) काम पूर्ण करण्याचा कालावधी: ङ्ज जारी केल्याच्या तारखेपासून १२ महिने (बारा महिने). पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. निविदा सादर करण्याची सुरुवात तारीख: 26-01-2026. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ तारीख: 09.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ तारीख: 09.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदेची संपूर्ण माहिती उपलब्ध असलेली वेबसाइट: www.ireps.gov.in

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (नियंत्रक) सीआर, सोलापूर
Akar/Sur-2
तुमच्या प्राण्यांना रेल्वे मार्गापासून दूर ठेवा

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 78954077 | मालमत्तेवर कर्ज | 1. नंदकुमार दत्तात्रय भोसले<br>2. दत्तू दगडू भोसले<br>3. चंद्रकांत दत्तात्रय भोसले | 06/12/2025 | INR 4,30,725.12/- |

**मालमत्तेचा पत्ता :** आलेगाव बुद्रुकचा सर्व तुकडा आणि पार्सल गावठाण प्लॉट क्रमांक ५ पैकी ३१ क्षेत्र ० एच ०१ आर, मूल्यांकन १ रु. ५० . त्यात आलेगाव बुद्रुक ग्रामपंचायत मिल्कट क्र.२६३, एकूण जमीन-१६४३. चौ. ., आलेगाव बुद्रुक येथे वसलेले, आलेगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या स्थानिक मर्यादेत, तालुका: माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१२, आणि सीमा: पूर्व: ग्रामपंचायत मिल्कट क्र. २६९ श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार पश्चिम: ग्रामपंचायत क्रमांक २६९ श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार पश्चिम: ग्रामपंचायत क्रमांक २६. श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार. वसंत काळे. दक्षिण: ग्रामपंचायत रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : 14/01/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारताविरुद्धच्या मालिकेनंतर एलिसा हिलीची निवृत्ती

**सिडनी** : ऑस्ट्रेलियाच्या सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूंपैकी एक असलेली एलिसा हिली मार्चमध्ये भारताविरुद्धच्या घरच्या मालिकेनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे.



३५ वर्षीय हिली पर्थमध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय आणि एकमेव महिला कसोटी मालिकेत शेवटच्या वेळी ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करेल. महिला क्रिकेटमधील सर्वात स्फोटक फलंदाजांपैकी एक असलेल्या हिलीने एका निवेदनात म्हटले आहे की, भारताविरुद्धची आगामी मालिका ही ऑस्ट्रेलियासाठी माझी शेवटची मालिका असेल. ऑस्ट्रेलियासाठी खेळण्याची माझी इच्छा कायम आहे, परंतु सुरुवातीपासूनच मला प्रेरित करणारी स्पर्धात्मक भावना काहीशी कमी झाली आहे, त्यामुळे निवृत्तीची ही योग्य वेळ आहे असे वाटते. या वर्षीच्या टी-२० विश्वचषकात मी खेळू शकणार नाही आणि संघाकडे तयारीसाठी मर्यादित वेळ आहे हे माहीत असल्याने, मी हिलीच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने आठ विश्वविजेतेपदे जिंकली आहेत, त्यापैकी सहा टी-२० स्वरूपात आणि दोन एकदिवसीय क्रिकेटमध्ये. एलिसा हिलीने ऑस्ट्रेलियासाठी १० कसोटी, १२३ एकदिवसीय आणि १६२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

### प्रिटोरिया कॅपिटल्सकडून एमआय केपटाऊनचा पराभव

**सेंच्युरियन** : प्रिटोरिया कॅपिटल्सने शानदार अष्टपैलू कामगिरीचे प्रदर्शन करत एमआय केपटाऊनचा ५३ धावांनी पराभव करून एसए२० क्रिकेट स्पर्धेच्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. बोनस पॉईंट विजयामुळे प्रिटोरिया कॅपिटल्सचे २० गुण झाले, तर सनरायझर्स ईस्टर्न केप (१९ गुण) दुसऱ्या स्थानावर घसरले. या पराभवामुळे एमआय केपटाऊनच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या अपेक्षांना मोठा धक्का बसला. सोमवारी रात्री खेळल्या गेलेल्या सामन्यात, कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना शेरफेन रुदरफोर्ड (२७ चेंडूत ५३ धावा) यांच्या अर्धशतकाच्या जोरावर ६ बाद १८५ धावा केल्या. प्रत्युत्तरात एमआय केपटाऊनला ७ बाद १३२ धावाच करता आल्या. एमआय केपटाऊनकडून रीझा हेंड्रिक्सने नाबाद ६८ धावा केल्या. कॅपिटल्सकडून गिडॉन पीटर्सने ३२ धावांत तीन बळी घेतले.

### मर्यादित एकदिवसीय सामन्यांमुळे मालिकेचे महत्त्व

**राजकोट** : जागतिक स्तरावर होणाऱ्या असंख्य स्पर्धांमध्ये मर्यादित संख्येने एकदिवसीय सामने खेळले जात असल्याने भारताविरुद्ध सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेचे महत्त्व आणखी वाढले आहे, असे मत न्यूझीलंडचा फलंदाज हेन्री निकोलसने मंगळवारी व्यक्त केले. एकदिवसीय विश्वचषक अजून २२ महिने दूर आहे आणि म्हणूनच पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर सर्वांचे लक्ष केंद्रित असल्याने, चालू एकदिवसीय मालिकेच्या प्रासंगिकतेवर आणि संदर्भावर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. मोठ्या स्पर्धांमध्ये इतके एकदिवसीय सामने खेळले जात नाहीत आणि म्हणूनच मला वाटते की अशा मालिका आणखी महत्त्वाच्या बनतात, असे निकोलस बुधवारी होणाऱ्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी म्हणाला. आपल्यापैकी काही जण घरच्या मैदानावर लिस्ट ए क्रिकेट खेळत आहेत, म्हणून आम्हाला या फॉरमॅटचा काही अनुभव आहे. पण हा एक फॉरमॅट आहे जो आम्हाला खेळायला आवडतो. तो म्हणाला. या फॉरमॅटमध्ये मर्यादित संख्येने सामने असल्याने ही मालिका पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. जर न्यूझीलंडला भारताला हरवायचे असेल तर त्यांना त्यांचे सातत्य राखावे लागेल. फलंदाजीच्या दृष्टिकोनातून, आम्ही बऱ्याच गोष्टी खरोखर चांगल्या केल्या आणि त्या गोष्टी आपण आणखी काही काळ चालू ठेवू शकतो का हा प्रश्न आहे.

# भारताचा मालिका जिंकण्याचा निर्धार

## न्यूझीलंडविरुद्ध दुसरा एकदिवसीय सामना आज

◆ **राजकोट, १३ जानेवारी**

विराट कोहलीच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे भारताच्या काही प्रमुख खेळाडूंच्या दुखापतींबद्दल वाढत्या चिंता काही प्रमाणात कमी झाल्या आहेत आणि बुधवारी न्यूझीलंडविरुद्धचा दुसरा एकदिवसीय सामना जिंकून भारत तीन सामन्यांच्या मालिकेत अजिंक्य आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल.

वडोदरा येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा चार गड्यांनी पराभव केला. त्या सामन्यात वॉशिंग्टन सुंदर जखमी झाला होता आणि तो एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. निवडकर्त्यांनी दिल्लीच्या आयुष बदोनीचा संघात समावेश केला आहे, परंतु भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या अष्टपैलू खेळाडूंना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे, नितीश कुमार रेड्डी याच्या रूपात आणखी एक अष्टपैलू खेळाडू प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट होऊ शकतो.





पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी दुखापतीमुळे ऋषभ पंत मालिकेतून बाहेर पडला. निवडकर्त्यांनी त्याच्या जागी ध्रुव जुरेलला घेण्याचा निर्णय घेतला, जो संघ व्यवस्थापनासाठी एक विशेषज्ञ फलंदाज म्हणून दुसरा पर्याय असू शकतो. भारतीय संघाकडे अनेक पर्याय आहेत, परंतु पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या पृष्ठभूमीवर ते कोणताही धोका पत्करू इच्छित नाहीत.

भारतीय संघासाठी या चिंता असताना, सर्वांच्या नजरा कोहली आणि रोहित शर्मावर असतील, जे आता त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. कोहलीचे पहिल्या सामन्यात त्याचे ५४ वे एकदिवसीय शतक हुकले, परंतु ९१ चेंडूत त्याच्या ९३ धावांनी भारताच्या विजयाचा पाया रचला.

भारत आणि न्यूझीलंड संघांमध्ये लक्षणीय फरक आहे. किवीजचा गोलंदाजीचा हल्ला मजबूत नाही आणि भारतीय फलंदाज याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करतील.

पहिल्या एकदिवसीय सामन्यात पराभव असूनही, न्यूझीलंडला विश्वास आहे की कोहलीच्या प्रभावी कामगिरी असूनही त्यांनी भारताला कठीण लढत दिली. भारत लक्ष्याच्या दिशेने सहज मार्गावर असताना, काइल जेमिसनने त्याच्या गोलंदाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करून सामना रोमांचक बनवला. शेवटच्या क्षणी झेल सोडल्याचे त्याचे परिणाम त्याच्या संघाला भोगावे लागले.

डावखुरा फलंदाज डेव्हॉन कॉनवे आणि हेन्री निकोल्सने पहिल्या गड्यासाठी ११७ धावा जोडून न्यूझीलंडला चांगली सुरुवात करून दिली, परंतु त्यांचे मधल्या फळीतील फलंदाज भांडवल करण्यात अपयशी ठरले. या क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने संघ मैदानात उतरेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**भारत विरुद्ध न्यूझीलंड**
**स्थळ** : सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, राजकोट
**वेळ** : दुपारी १:३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# दिल्ली कॅपिटल्स, यूपी वॉरियर्स पॉवरप्लेमध्ये वर्चस्व गाजवणार

### महिला प्रीमियर लीग

◆ **नवी मुंबई, १३ जानेवारी**

बुधवारी येथे होणाऱ्या महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) सामन्यात यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांना पॉवरप्लेमध्ये त्यांची कामगिरी सुधारावी लागणार आहे.

वॉरियर्सच्या फलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये अपेक्षेनुसार चांगली कामगिरी केलेली नाही, तर कॅपिटल्सच्या गोलंदाजांना खेळाच्या या महत्त्वाच्या टप्प्यात संघर्ष करावा लागला आहे. जेमिमाह रॉड्रिग्जच्या नेतृत्वाखाली कॅपिटल्सची सुरुवात चांगली झालेली नाही आणि तिचा संघ त्यांची मोहीम पुन्हा रुळावर आणण्यासाठी उत्सुक असेल.

गुजरात जायंट्सविरुद्धच्या पराभवानंतर रॉड्रिग्ज म्हणाली, मला वाटते की, पॉवरप्लेमध्ये आमची गोलंदाजी चांगली नव्हती. आम्हाला आमची रणनीती सुधारण्याची गरज आहे. दिल्ली कॅपिटल्ससाठी आतापर्यंतचे सकारात्मक पैलू म्हणजे श्री चरणी आणि नंदिनी शर्मा या गोलंदाजांची चांगली कामगिरी. गेल्या सामन्यात



जेमिमाह रॉड्रिग्ज



मेग लॅनिंग

नंदिनीची हॅट्ट्रिक तिच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ करेल.

दुसरीकडे, यूपी वॉरियर्सना पॉवरप्लेमध्ये चांगली फलंदाजी करावी लागेल. पहिल्या दोन सामन्यांमध्ये, हरलीन देओल आणि किरण नवघरे यांनी मेग लॅनिंगसोबत डावाची सुरुवात केली, परंतु दोघांचेही संयोजन प्रभावी ठरले नाही. लॅनिंगसोबत डावाची सुरुवात करण्यासाठी संघ व्यवस्थापनाला योग्य खेळाडू शोधण्याची आवश्यकता असेल. भारतीय जलद गोलंदाज क्रांती गौड आणि शिखा पांडे यांनाही त्यांच्या कामगिरीत सुधारणा करावी लागेल. डिआंड्रा डॉटिन यांनाही गेल्या सामन्यातील निराशेतून सावरावे लागेल. त्या सामन्यात ग्रेस हॅरिसने तिच्या एका षटकात ३२ धावा दिल्या.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या पराभवानंतर, कर्णधार लॅनिंग म्हणाली, निश्चितच काही क्षेत्रांमध्ये आपल्याला सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: आघाडीच्या फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल. सुरुवातीला आम्ही बरेच डॉट बॉल खेळले. (वृत्तसंस्था)

# दिल्लीला हरवून विदर्भ उपांत्य फेरीत

### कर्नाटकशी लढत

◆ **बंगळुरू, १३ जानेवारी**

गेल्या हंगामातील उपविजेत्या विदर्भाने शिस्तबद्ध आणि अष्टपैलू कामगिरी दाखवत मंगळवारी येथे विजय हजारे एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत विदर्भाचा सामना कर्नाटकशी होईल. या दोन्ही संघांमधील गेल्या हंगामातील अंतिम सामना खेळला गेला.

विदर्भाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद ३०० धावांचा आव्हानात्मक आकडा गाठला. यश राठोडने ८६ धावांचे योगदान दिले आणि सलामीवीर अथर्व तायडेने ६२ धावांचे योगदान दिले.

प्रत्युत्तरादाखल, दिल्लीचा संघ ४५.१ षटकांत २२४ धावांवर गारद झाला. त्यांना कर्णधार ऋषभ पंत आणि उपकर्णधार आयुष बदोनीची उणीव भासली. पंत दुखापतग्रस्त आहे, तर बदोनीचा न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी राष्ट्रीय संघात समावेश करण्यात आला आहे.

त्याच्या अनुपस्थितीत, विदर्भाच्या मिश्र गती आणि फिरकी आक्रमणाविरुद्ध दिल्लीच्या फलंदाजांना संघर्ष करावा लागला. विदर्भाकडून वेगवान गोलंदाज नचिकेत भुतेने ७.१ षटकांत ५१ धावा देत चार बळी घेतले. डावखुरा फिरकी गोलंदाज आणि कर्णधार हर्ष दुबेनेही प्रभावी कामगिरी केली, त्याने ९ षटकांत ३६ धावा देत तीन बळी घेतले, तर नवीन गोलंदाज प्रफुल्ल हिंगेने ५४ धावांत दोन बळी घेऊन उपयुक्त योगदान दिले.



सामनावीर यश राठोड

यष्टीरक्षक-फलंदाज अनुज रावतने दिल्लीकडून एकट्याने झुंज दिली, ९८ चेंडूत ६६ धावा केल्या, परंतु संघाला उपांत्य फेरीत पोहोचवण्यासाठी ते पुरेसे नव्हते. सहाव्या क्रमांकावर खेळताना, रावतने वरच्या आणि मध्यम क्रमवारीतील फलंदाजांच्या अपयशानंतर डाव स्थिर करण्याचा प्रयत्न केला, मयंक गुसैन (१८), हर्ष त्यागी (२७) आणि हृतिक शोकिन (२१) यांच्यासह उपयुक्त धावा जोडल्या. तथापि, नियमित अंतराने गडी बाद झाल्याने त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले.

तत्पूर्वी, सलामीवीर अमन मोखाडे (०६) लवकर बाद झाल्यानंतर विदर्भाने जोरदार पुनरागमन केले. तायडे (७२ चेंडूत ६२ धावा) आणि ध्रुव शौरी (७१ चेंडूत ४९ धावा) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९० धावांची भागीदारी केली. दिल्लीचा कर्णधार इशांत शर्माने तायडेला बाद करून लिस्ट ए क्रिकेटमध्ये आपला २०० वा बळी घेतला. इशांत व्यतिरिक्त, नवदीप सैनी आणि प्रिन्स यादव यांनीही दिल्लीकडून प्रत्येकी दोन बळी घेतले. (वृत्तसंस्था)

# पंजाबचा १८३ धावांनी विजय, उपांत्यमध्ये सौराष्ट्रशी गाठ

### विजय हजारे चषक

◆ **बंगळुरू, १३ जानेवारी**

विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत पंजाबने स्थान निश्चित केले आहे. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने ६ बाद ३४५ धावा केल्या. प्रत्युत्तरात मध्यप्रदेश संघ केवळ १६२ धावा काढू शकला. त्यांना १८३ धावांनी पराभव पत्करावा लागला. उपांत्य सामन्यात १६ जानेवारी रोजी पंजाबचा सामना सौराष्ट्राशी होईल. पंजाबचे नेतृत्व प्रभसिमरन सिंग करत आहेत.

प्रथम फलंदाजी करताना पंजाबने कर्णधार प्रभसिमरन सिंगच्या ८६ चेंडूत ८८ धावा, अनमोलप्रीत सिंगच्या ६२ चेंडूत ७० धावा, नेहल वधेराच्या ३८ चेंडूत ५६ धावा आणि हरनूर सिंगच्या ७१ चेंडूत ५१ धावा यामुळे ६ गडी गमावून ३४५ धावा केल्या.



अर्धशतक झळकविल्यानंतर बॅट उंचावताना प्रभसिमरन सिंग

रमणदीप सिंगनेही १५ चेंडूत २४ धावा केल्या. मध्य प्रदेशकडून त्रिपुरेश सिंग आणि कर्णधार वेंकटेश अय्यर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल मध्य प्रदेशचा संघ ३१.२ षटकांत १६२ धावांवर संपुष्टात आला.

अय्यरचा प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय चुकीचा ठरला आणि प्रभसिमरन आणि हरनूर यांनी २१ षटकांत पहिल्या गड्यासाठी १६६ धावा जोडत पंजाबला दमदार सुरुवात करून दिली.

आर्यन पांडेने २२ व्या षटकात हरनूरला बाद करून मध्य प्रदेशला पहिले यश मिळवून दिले, परंतु त्यानंतर अनमोलप्रीतने झटपट धावा काढल्या. प्रभसिमरनचे शतक हुकले आणि ३० व्या षटकात कुलदीप सेनच्या गोलंदाजीवर सारांश जैनने त्याला झेलबाद केले. नमन धीरही २३ धावांवर बाद झाला. त्यामुळे पंजाबची अवस्था ३ बाद १९९ अशी झाली. वधेराने चौथ्या गड्यासाठी अनमोलप्रीतसोबत ७६ धावांची जलद भागीदारी केली.

प्रत्युत्तरादाखल मध्य प्रदेशची सुरुवात खराब झाली. १७ व्या षटकापर्यंत ६६ धावांत गडी गमावले. रजत पाटीदारने ४० चेंडूत ३८ धावा केल्या. त्यामुळे धावसंख्या ७ बाद १३२ अशी राहिली. त्रिपुरेश सिंगने पाटीदारसह ३१ धावा केल्या. पंजाबकडून संवीर सिंगने सहा षटकांत ३१ धावांत ३ गडी बाद केले. (वृत्तसंस्था)

### भारताबाहेर सामने हलवण्यास बीसीसीआयचा नकार

**ढाका** : आयसीसीने मंगळवारी बांगलादेश क्रिकेट बोर्डाला टी-२० विश्वचषक सामने भारताबाहेर हलवण्याच्या विनंतीवर पुनर्विचार करण्याची विनंती केली, परंतु बीसीसीआयने सुरक्षेच्या कारणास्तव तसे करण्यास नकार दिला. एका निवेदनात, बीसीबीने म्हटले आहे की बोर्डाचा निर्णय तसाच आहे, जरी आयसीसीने त्यांची विनंती स्वीकारण्यास नकार दिला आहे. दोन्ही पक्ष संभाव्य उपाय शोधत राहतील असे म्हटले आहे.

# त्रिशा-गायत्री दुसऱ्या फेरीत ध्रुव आणि मनीषा बाहेर

### इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

भारताची अव्वल महिला दुहेरी जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी मंगळवारी येथे सरळ गेममध्ये विजय मिळवत इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

नोव्हेंबरमध्ये सय्यद मोदी इंटरनॅशनल सुपर ३०० स्पर्धेत यशस्वीरीत्या आपले जेतेपद राखणाऱ्या त्रिशा आणि गायत्री यांनी ऑर्निचा जोंगसाथापोनपर्न आणि सुकिता सुवाचाई या थाई जोडीचा ४२ मिनिटांत २१-१५, २१-११ असा पराभव केला.

त्रिशा आणि गायत्री यांनी संपूर्ण सामन्यात दमदार खेळ केला. भारतीय जोडीने उत्कृष्ट नेट प्ले दाखवला आणि स्मॅशसह बरेच गुण मिळवले. दुसऱ्या गेममध्ये थाई जोडीने चांगली सुरुवात केली होती, परंतु त्रिशा आणि गायत्रीने पुनरागमन करून विजय मिळवला.

विजयानंतर गायत्री म्हणाली, गेल्या वर्षी दुखापतींमुळे आम्हाला थोडा त्रास झाला होता, परंतु वर्षाच्या अखेरीस सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आम्ही आत्मविश्वास मिळवू शकलो. नवीन हंगाम सुरू होण्यापूर्वी हा एक चांगला निकाल होता. ध्रुव रावत आणि मनीषा के या भारतीय जोडीला मात्र एकतर्फी मिश्र दुहेरी सामन्यात जपानी जोडी हिरोकी मिदोरिकावा आणि नामी मत्सुयामा यांच्याकडून ९-२१, १०-२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला.



**व्हिक्टर लेई आणि कुसुमा वर्दानीची धडक**

जागतिक अजिंक्यपद कांस्यपदक विजेता कॅनडाचा व्हिक्टर लेई याने मंगळवारी येथे योनेक्स सनराइज इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत तीन सामन्यांच्या कठीण सामन्यात विजय मिळवला, तर त्याचाच देशबांधव ब्रायन यांगने चौथ्या मानांकित चायनीज तैपेईच्या चौथ्या मानांकित चाऊ टिएन चेनला सरळ गेममध्ये हरवून धक्का दिला.

महिला एकेरीत, सहाव्या मानांकित आणि जागतिक अजिंक्यपद कांस्यपदक विजेती इंतानोन आणि अनुभवी सातव्या मानांकित इंडोनेशियाची पुत्री कुसुमा वर्दानी आणि अनुभवी सातव्या मानांकित थायलंडची रत्चानोक इंतानोन यशस्वी ठरल्या.

एकवीस वर्षीय व्हिक्टरने फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हचा २१-१२, १६-२१, २१-८ असा पराभव केला, तर यांगने तिएन चेनचा २१-१९, २१-११ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

पुरुषांच्या एका सामन्यात, चायनीज तैपेईच्या ची यु-जेनने सहाव्या मानांकित फ्रान्सच्या ॲलेक्स लॅनियरचा २१-१७, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव करून सर्वांनाच धक्का दिला.

महिला एकेरीत, माजी जागतिक नंबर वन रत्चानोकने जपानच्या रिको गुंजीवर २१-१९, २१-१५ असा विजय मिळवला, तर कुसुमा वर्दानीने कॅनेडियन अनुभवी मिशेल लीचा २१-१२, २०-२२, २१-१५ असा पराभव केला. अनुभवी डॅनिश मिया ब्लिचफेल्डने चायनीज तैपेईच्या चू पिन चिएनचा २१-१९, २१-११ असा सरळ गेममध्ये पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. (वृत्तसंस्था)

### कार्लसन नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होणार

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

बुद्धिबळ खेळाडू मॅग्नस कार्लसन यांनी आगामी नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होण्याबाबतच्या अटकळांना पूर्णविराम देत, यावेळी स्टॅव्हेंजरऐवजी ओस्लो येथे होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभागी होणार असल्याची घोषणा केली आहे.

कार्लसन गेल्या १३ वर्षांपासून सातत्याने त्याच्या घरच्या भूमीवर होणाऱ्या स्पर्धेत खेळत आहे, परंतु अलिकडेच त्याने क्लासिकल बुद्धिबळापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या स्पर्धेत त्याच्या सहभागाबद्दल शंका निर्माण झाली आहे. नॉर्वे बुद्धिबळ ही एक क्लासिकल स्वरूपाची स्पर्धा आहे आणि कार्लसनने ती सात वेळा जिंकली आहे. मॅग्नस कार्लसन हा नॉर्वे बुद्धिबळ २०२६ मध्ये त्याच्या सहभागाची सार्वजनिकपणे पुष्टी करणारा पहिला खेळाडू आहे. उर्वरित सहभागींची घोषणा येत्या आठवड्यात नॉर्वे बुद्धिबळात सहभागी होणाऱ्या महिला खेळाडूंच्या यादीसह केली जाईल, असे आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिरागला वॉकओव्हर

## आयुषला हरवून लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीत

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

स्टार खेळाडू लक्ष्य सेनने मंगळवारी येथे योनेक्स सनराइज इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत सरळ गेममध्ये पराभव केला.

सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही तिसरी मानांकित जोडी बुधवारी पहिल्या फेरीत खेळणार होती, परंतु त्यांचे अमेरिकन प्रतिस्पर्धी चेन झी यी आणि प्रेस्ली स्मिथ स्पर्धेतून माघार घेतल्यानंतर, या स्टार भारतीय जोडीला दुसऱ्या फेरीत प्रवेश करण्यासाठी वॉकओव्हर मिळाला. गेल्या आठवड्यात मलेशिया ओपनच्या पहिल्या फेरीत अमेरिकन जोडी पराभूत झाली होती.



२०२२ चा चॅम्पियन लक्ष्यने आयजी स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या ९५०,००० च्या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत फक्त ३६ मिनिटांत आयुषचा २१-१२, २१-१५ असा पराभव केला. आयुष पहिल्यांदाच इंडिया ओपनमध्ये खेळत होता. चोवीस वर्षीय लक्ष्यचा पुढचा सामना जपानच्या केंटा निशिमोतोशी होईल, जो त्याचा सातवा मानांकित सहकारी कोडाई नारोका २१-६, ७-५ असा सामना सोडून दुसऱ्या फेरीत पोहोचला. (वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय संबंध आणि ‘मेक इन इंडिया’ समित्या स्थापन करा

### क्रीडा मंत्रालयाची एनएसएफना सूचना

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

क्रीडा मंत्रालयाने प्रत्येक राष्ट्रीय क्रीडा महासंघाला (एनएसएफ) संयुक्त सराव कार्यक्रम आणि भारतात प्रमुख स्पर्धा आयोजित करणे यासारख्या मुद्द्यांवर जागतिक संस्थांशी चांगले सहकार्य सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध समिती स्थापन करण्यास सांगितले आहे.

क्रीडा उत्पादन परिसंस्था मजबूत करण्यासाठी भारतीय उत्पादक, स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि चाचणी आणि मानकीकरण संस्थांशी संपर्क साधण्यासाठी मंत्रालयाने एनएसएफना ‘मेक इन इंडिया स्पोर्ट्स कमिटी’ स्थापन करण्यास सांगितले आहे.

एनएसएफना लिहिलेल्या पत्रात मंत्रालयाने म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय संबंध समितीमध्ये फेडरेशनचे वरिष्ठ सदस्य, माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक आणि ‘जागतिक क्रीडा प्रशासन आणि राजनैतिक कूटनीतीमध्ये महत्त्वपूर्ण अनुभव असलेले तज्ज्ञ’ यांचा समावेश असावा.

पत्रात मंत्रालयाने म्हटले आहे की, समितीची संपूर्ण माहिती ३० दिवसांच्या आत मंत्रालयाला कळवावी. क्रीडा सचिव हरि रंजन राव यांनी एनएसएफ अधिकाऱ्यांना दैनंदिन प्रशासन सीईओंवर सोपवून भारताच्या फायद्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केल्यानंतर काही दिवसांतच मंत्रालयाचा हा सल्ला आला आहे.

गेल्या आठवड्यात त्यांनी अहमदाबादमध्ये म्हटले होते की, तुम्ही प्रशासक नाही तर दूरदर्शी बांधकाम व्यावसायिक आहात. तुमच्या संघटनेत व्यावसायिक प्रशासकांची आवश्यकता आहे जे फेडरेशनचे दैनंदिन कामकाज हाताळू शकतील आणि तुम्ही आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध विकसित करण्यावर आणि विकास योजना तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपउपांत्यपूर्व फेरीत

## ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

◆ **काझीपेठ, १३ जानेवारी**

येथील रेल्वे ग्राऊंडवर सुरू असलेल्या ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेने पहिल्याच दिवसापासून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तेलंगणा खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली देशभरातील बलाढ्य संघांनी मैदानात उतरून कौशल्य, वेग, चपळाई आणि रणनीतीचा अफलातून संगम सादर केला. प्रारंभीच्या सामन्यांतच महाराष्ट्र, कोल्हापूर, रेल्वे आणि छत्तीसगड संघांनी जोरदार विजय मिळवत प्रतिस्पर्ध्यांची दाणादाण केली आणि दिमाखात उपउपांत्यपूर्व फेरीत पुढील फेरीत प्रवेश निश्चित केला.

पुढील संघांनी उपउपांत्यपूर्व फेरी गाठली पुरुष गट : महाराष्ट्र, रेल्वे, पुद्दुचेरी, उत्तर प्रदेश, कोल्हापूर, गुजरात, ओडिशा, विदर्भ, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा.





प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूला बाद करताना महाराष्ट्र संघाच्या मुली

**महिला गट** : महाराष्ट्र, ओडिशा, विदर्भ, विमानतळ, पंजाब, दिल्ली, राजस्थान, कोल्हापूर, गुजरात, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तामिळनाडू.

**महिला गटात महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश व चंदीगडवर विजय**

महिला गटात महाराष्ट्राने उत्तर प्रदेशवर ४४-१० असा १ डाव ३४ गुणांनी दणदणीत विजय मिळवून गटात अव्वल स्थान पटकावले. ड्रीम रनद्वारे ८ गुण मिळवण्यात महाराष्ट्र यशस्वी ठरला. महाराष्ट्राकडून सरिता दिवा (२.५० मि. संरक्षण व २ गुण), सुहानी धोत्रे (१.३० मि. संरक्षण व ८ गुण), रेश्मा राठोड (२ मि. संरक्षण व ६ गुण), प्रियांका इंगळे (१.१० मि. संरक्षण व १४ गुण), संध्या सुरवसे (२.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी मोलाची कामगिरी नोंदवली.

महिला गटातच महाराष्ट्राने चंदीगडचा ४२-१२ असा १ डाव ३० गुणांनी पराभव केला. या सामन्यात श्वेता नवाले (१.५०, १.५० मि. संरक्षण), रेश्मा राठोड (२.२० मि. संरक्षण व २ गुण), प्रियांका इंगळे (१.५० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ सादर केला. चंदीगडकडून रितू (१ मि. संरक्षण व २ गुण) हिने चांगली कामगिरी केली.

**पुरुष गटात उत्तर प्रदेश व जम्मू-काश्मीरवर विजय**

पुरुष गटात महाराष्ट्राने उत्तर प्रदेशवर २५-१५ असा ५ मिनिटे राखून १० गुणांनी विजय मिळवला. महाराष्ट्राकडून सुयश गरगटे (२.१० मि. संरक्षण व ४ गुण), निहार दुबळे (४ गुण), प्रतीक वायकर (२.०० मि. संरक्षण), ऋषीकेश मुर्चावडे (२.१० मि. संरक्षण) यांनी चमकदार कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने जम्मू-काश्मीरचा ४८-१४ असा १ डाव ३४ गुणांनी धुव्वा उडवला. विजय शिंदे (२.५० मि., १.२० मि.), सुयश गरगटे (३.०० मि.), शुभम थोरात (१.१० मि. संरक्षण व ६ गुण), रुद्र थोपटे व प्रतीक वायकर (प्रत्येकी ६ गुण) यांनी सामना आपल्या नावावर केला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




### महाराष्ट्र राज्य दिव्यांग क्रीडा स्पर्धेत निखिल मेड राज्यात प्रथम

**बार्शी, दि. १२ जानेवारी**

रामटेक नागपूर येथे झालेल्या राज्य दिव्यांग क्रीडा स्पर्धेत बार्शी शाळेचे खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. यशस्वी खेळाडूंना कविता कोळगे, नितीन सुरवसे, तसेच सोलापूर जिल्हा अध्यक्ष स्पेशल ऑलिंपिक भारत प्रशांत मधुकर पवार व एक्सपर्ट कोच म्हणून दयानंद पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी यांनी प्रशिक्षक तसेच मशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कामगिरी केलेले खेळाडू : निखिल मेड (५० मीटर धावणे प्रथम व उभा राहून लांब उडीत द्वितीय, जिव्हाळा मतिमंद मुलाची शाळा बार्शी), प्रांजल इचके (५० मीटर धावणे द्वितीय व उभे राहून लांब उडी द्वितीय, मतिमंद मुलाची शाळा खांडवी), सृष्टी जावळे (गोळा फेक तृतीय व १०० मीटर धावणे तृतीय, मतिमंद मुलाची शाळा खांडवी).

### दुधनी जि.प. कन्नड मुलींच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी पोतदार

**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यातील दुधनी येथील जि.प. प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जयश्री विलास पोतदार यांची करण्यात आली. यावेळी खेळी मेळीच्या वातावरणात शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापक महादेव बासरगाव यांचे अध्यक्षतेखाली जि.प. प्राथमिक कन्नड मुलींची शाळा दुधनी शाळेत यावेळी नूतन अध्यक्ष म्हणून जयश्री विलास पोतदार तर उपाध्यक्ष म्हणून लक्ष्मीपुत्र शांतलिंग बोळकोटगी यांचे सर्वानुमते



निवड करण्यात आली. अश्विनी रोडगे, रूपा जाधव, शिवराज मंदोलीकर, संजय चंडके, गीता हौदे या सर्वांचे नवनियुक्त सभासद म्हणून निवड करण्यात आली. आनंद शांतय्या बाहेरमठ यांचे शिक्षण तज्ञ म्हणून निवड करण्यात आले. यावेळी सर्व माता पालक व शाळेतील शिक्षक संतोष जोगदे, सिद्धरामेश्वर गोरे, परमेश्वर वागोली, गणपती पवार, मंदाकिनी सोनकांबळे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक महादेव बासरगाव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गणपती पवार यांनी केली तर प्रस्तावना व आभार संतोष जोगदे यांनी मानले.



### आर्या कृषी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**माढा, दि. १३ जानेवारी-**

आर्या कृषी महाविद्यालय मानेगाव येथे राजमाता जिजाऊसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. कविता देशमुख, सहाय्यक प्राध्यापक, विस्तार शिक्षण विभाग, श्रीराम कृषी महाविद्यालय, पानीव उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्या डॉ. देशमुख यांनी यावेळी भाषण केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. धनंजय कुलकर्णी व प्रा. खंडेराव वाघे होते. प्रा. संदीप मुरुमकर, प्रा. तुषार नामदे, डॉ. संदीप मखमले, प्रा. स्नेहल साठे, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, डॉ. तृप्ती राठोड, प्रा. अक्षय शेळके, प्रा. हनुमंत निगुडे तसेच कुमार शिंदे व रोहित घळके यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गटात रंगणार सामना



**आचारसंहिता लागू; जिल्ह्याचे राजकारण पुन्हा तापणार**

**५ फेब्रुवारीला मतदान अन् ७ फेब्रुवारीला निकाल**

**भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेत होणार प्रतिष्ठेची लढाई**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली असून, पुणे जिल्ह्यासह १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आजपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या जिल्ह्यांमध्ये या निवडणुका होत आहेत. त्यामुळे नगरपालिका निवडणुकीनंतर आता सोलापूर जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी (गटासाठी) चुरसीचे मतदान होणार असून, आता ग्रामीण भागाचे राजकारण चांगलेच तापणार असल्याची चर्चा आताच सुरू झाली आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे. या निवडणुकीसाठी गेल्या २ महिन्यापासून काही राजकीय मल्ल लंगोट लावून बसले असून, त्यांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-२ राऊंडही झाल्या आहेत. दरम्यान, ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात १२ नगरपालिकांची नुकतीच निवडणूक पार पडली आहे. महापालिकेतील १०२ जागांचे मतदान येत्या १५ तारखेला आहे. त्यातच अवघ्या राज्याचं लक्ष लागलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार, राज्यातील १२ जिल्ह्यात निवडणुकांचा धुरळा उडणार असून, १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार, राज्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, रोजी ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. आयोगाकडून निवडणुकांची घोषणा होताच निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

**ग्रामीण महाराष्ट्रात निवडणुकांची रणधुमाळी**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यांमध्ये घेतली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने आता १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक असणार आहे. एकीकडे राज्यात ५ फेब्रुवारी रोजी महापालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून, ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, महानगरांमध्ये निवडणुका संपताच, ग्रामीण महाराष्ट्रात निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

**२०१७ साली भाजपाची जोरदार इंट्री**

पूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेत एकही जागा नसलेल्या भाजपने सोलापूर जिल्हा परिषदेत २०१७ च्या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारीत आपल्या मित्र पक्षांसह १९ जागा मिळविल्या होत्या. शिवसेनेनेही आपल्या मित्रांसह दहा जागांचा टप्पा गाठला होता. दरम्यान, यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीत जिल्ह्यातील विविध पक्षाच्या अनेक बड्या नेत्यांचे प्रवेश झाल्याचा फायदा भाजपाला होण्याची शक्यता आहे. सध्या भाजपा बेरजेचे राजकारण करीत असला तरी नव्या सवंगड्यांची साथ त्यांना किती मिळणार? यावरच भाजपाचे भवितव्य अवलंबून आहे. तसेतर भाजपाला नगरपालिका निवडणुकीतही अपेक्षित यश मिळाले नव्हते; आता जिल्हा परिषदेत किती यश मिळेल? हे येणारा काळच सांगणार आहे.

**गतवेळी माळशिरस, माढा तालुक्यात राष्ट्रवादीला भरघोस यश**

२०१७ साली राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या माळशिरस आणि माढा तालुक्यात पक्षाने भरघोस यश मिळविले होते. मोहिते-पाटील यांनी ११ पैकी ८ तर आमदार बबनदादा शिंदे यांनी सर्व सात जागांवर आपलीताकद दाखवून दिली होती. माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील आणि माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांच्या घराणेशाहीबाबत आरोप होऊनही मोहिते पाटील यांच्या घरातील सर्व चार आणि शिंदे यांच्या घरातील देखील सर्व चारही उमेदवारांना जनतेने भरघोस मताने विजयी केले होते. माळशिरस पंचायत समितीवर मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादीची सत्ता आणली तर माढा पंचायत समितीमधील सर्व १४ जागा राष्ट्रवादी जिंकून एकहाती सत्ता मिळविली होती. जिल्ह्यातील ज्या-त्या तालुक्यात स्थानिक नेत्यांचे वर्चस्व असल्याने भाजपासाठी आगामी जिल्हा परिषद निवडणूक कठीणच राहणार आहे.

**जिल्ह्यात राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती**

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून एकट्याच्या जीवावर सोलापूर जिल्हा परिषदेत सत्ता आणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता भाजपाचीच मोठी भीती राहणार आहे. पूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्याने आणि केंद्रात अन् राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असल्याने जिल्हा परिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. यंदा मात्र भाजपाने नगरपालिका, महापालिकेच्या धर्तीवर फिल्डिंग लावली तर मात्र राष्ट्रवादीचे किती सदस्य येतील? हे सध्यातरी सांगणे कठीण आहे. यासाठी भाजप विरोधी सर्व पक्ष एकत्र येवून झेडपी निवडणूक लढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. गेल्या निवडणुकीत सत्ता राखताना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसची दमछाक झाली. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी- २५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते. यामुळे इतर पक्षाच्या टेकूने राष्ट्रवादीने सत्ता मिळविली होती. यंदाही भाजप, राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांतच तगडी फाईट दिसून येणार आहे. तसेतर युती, आघाडीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

**३ वर्षात झेडपीत काही अधिकाऱ्यांची मनमानी**

कोरोना काळापासून जिल्हा परिषदेच्या निवडणुका थांबल्या होत्या. या ३ वर्षाच्या काळात जिल्हा परिषदेच्या कामकाजाची सुत्रे काही अधिकाऱ्यांच्या (प्रशासक) हातात गेली. यामुळे अशा अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेत आजवर बऱ्याच गोष्टीत मनमानी कारभार केल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या माजी पदाधिकाऱ्यांत सध्या रंगत आहे. कारण या अधिकाऱ्यांना गेल्या ३ वर्षात जिल्हा परिषदेतील कारभाराविषयी कोणीही विचारणारा पुढारी नव्हता. यामुळे आता जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, सदस्य, विविध समित्यांचे सभापती पदावर बसल्यावर अशा अधिकाऱ्यांवर नक्कीच अंकुश राहणार असल्याचीही चर्चा जोरात सुरू झाली आहे.

**गड राखण्यासाठी स्थानिक नेत्यांची तयारी**

२०१७ मध्ये शेकाप आणि राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे यांनी ७ पैकी ५ जागा जिंकत शिवसेनेला रोखले होते. सांगोला पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेकाप यांनी १४ पैकी १२ जागा जिंकत आपली सत्ता अबाधित ठेवली होती. करमाळ्यात शिवसेनेचे आमदार नारायण पाटील यांनी आपल्या झंझावातात राष्ट्रवादीचे पानिपत करून ५ पैकी ४ जागी जिंकल्या होत्या. करमाळा पंचायत समितीवर देखील आमदार नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली १० पैकी ८ जागा जिंकत भगवा फडकला आहे. पंढरपूरमध्ये झेडपीच्या ८ पैकी ७ जागा जिंकत कार्यकर्त्यांनी पुन्हा परिचारकांवर आपला विश्वास व्यक्त केला होता. पंचायत समितीवर देखील भाजपाची सत्ता आली होती; यावेळी १६ पैकी १२ जागांवर भाजपाला भरघोस यश मिळाले होते. बार्शी तालुक्यातील सेनेच्या राजा राऊत यांनी बार्शीतून भाजपच्या तीन जागा जिंकत पंचायत समितीवर भाजपची सत्ता आणली होती. अक्कलकोटमध्ये लढतीत काँग्रेसने सहापैकी तीन जागा पटकाविल्या. मंगळवेढ्यात शिवसेना पुरस्कृत समाधान आवताडे गटाला चार पैकी तीन जागी विजयी केले होते. पंचायत समितीवर आवताडे यांच्या आघाडीला आठपैकी पाच जागी विजय मिळाला होता. आता काहीजणांचे पक्ष बदलले आहेत. एकूणच, स्थानिक नेत्यांच्या जीवावरच जिल्हा परिषदेचे राजकीय समीकरण बदलत आल्याचे आजवर दिसून आले आहे. शहर थंडावले आता ग्रामीणचे राजकीय वातावरण तापणार आहे

# झेडपीच्या सीईओंकडून मंद्रूपच्या ग्रामसेवकाची खरडपट्टी

**करसंकलनात पिछाडी; सीईओ आक्रमक**

**दक्षिण सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोमवारी १२ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अचानक मंद्रूप ग्राम पंचायतीला भेट देऊन ग्रामपंचायतच्या काम काजाची पाहणी केली. यावेळी सीईओंनी विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांकडून अपेक्षित उत्तर न मिळाल्यामुळे सीईओ जंगम यांनी ग्रामसेवकांना फैलावर घेतले. तसेच ग्रामपंचायत कामकाजावर नाराजी व्यक्त करीत ग्रामपंचायतचा सन्मानही न स्वीकारता कार्यालयाबाहेर निघून गेल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे सीईओ जंगम मंद्रूपचे प्रभारी ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करीत १५ दिवसात कामकाजात सुधारणा करण्याच्या सूचना देऊन पुन्हा तपासणीसाठी येणार असल्याचे सांगितल्याने ग्रामसेवक जोडमोटे यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येते.

मुख्यमंत्री समृध्दी पंचायत राज अभियानांतर्गत सीईओ जंगम मंद्रूप व भंडारकवठे ग्रामपंचायतीला भेट देऊन अभियानातील घटकांनुसार कामकाजाची पाहणी केली. यावेळी मंद्रूप ग्रामपंचायतकडून घरकुल, करवसूलीसह इतर घटकामध्ये अपेक्षित काम न झाल्याने सिईओ आक्रमक होऊन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत ग्राम सेवकांना धारेवर धरले. यावेळी सिईओंनी विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांनी ढोबळमानाने उत्तरे दिल्याने सीईओ आक्रमक होऊन निश्चित आकडेवारी विचारले. यावेळी ग्रामसेवकांनी मौन धारण केल्यामुळे सीईओ कामकाजात सुधारणा करण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत दिल्याचे सांगण्यात येत आहे.

**सीईओंची अचानक भेट**

सीईओ कुलदीप जंगम यांनी यापूर्वी दोनवेळा मंद्रूप ग्रामपंचायतीला भेट देणार असल्याचे सांगितल्यानंतर मुख्य रस्त्यावरील स्वच्छता करून दप्तर पूर्ण करून ठेवण्यात आले. मात्र त्यावेळी सीईओंनी भेट न देता सोमवारी अचानक भेट दिल्याने ग्रामसेवक व पदाधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. त्यामुळे सीईओंच्या प्रश्नांना उत्तरे देताना ग्रामसेवकांकडून तु तु मैं मैं झाल्याचे सांगण्यात येते.

**सीईओंनी ग्रामसेवकांना झापले**

सोमवारी सिईओ कुलदीप जंगम यांनी मंद्रूप ग्रामपंचायतीला भेट दिल्यानंतर घरकुल उद्दीष्ट व करवसूली याबाबत विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांकडून अपेक्षित उत्तर न मिळाल्याने सीईओंनी ग्रामसेवकांना झापले. तसेच कामात सुधारणा करून घरकुल उद्दीष्ट व करवसूली वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश दिले. ग्रामपंचायत कामावर नाराज झाल्याने सिईओंनी सन्मानही स्वीकारला नाही.

**- यासीन मकानदार, ग्रामपंचायत सदस्य, मंद्रूप**

**कामात सुधारणा करण्याच्या सूचना**

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानांतर्गत असणार्या कामांची पाहणी करण्यासाठी सिईओ मंद्रूपला भेट दिले. यावेळी करवसूली व घरकुल बांधकाम अपूर्ण असल्याने त्याबाबत प्रयत्न करून उद्दीष्ट वाढविण्याच्या सूचना केल्या. १५ दिवसांत सुधारणा केल्यावर पुन्हा सीईओ मंद्रूपला भेट देणार आहेत.

**- नागेश जोडमोटे, प्रभारी ग्रामसेवक, मंद्रूप**




## बी टू मधील कामगारांच्या जागा शासनाकडून विनामूल्य नावावर करुन देणार

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर बी टू मधील कामगारांच्या जागा शासनाकडून विनामूल्य कामगारांच्या नावावर करून देणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्वाही दिल्याची माहिती आमदार देवेंद्र कोठे यांनी आज (दि. १३) दिली.

प्रभाग क्रमांक १५ मधील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अंबादास करगुळे, विजया खरात, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे यांच्या प्रचारार्थ आयोजित पदयात्रा आणि कॉर्नर सभेप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर उमेदवार अंबादास करगुळे, विजया खरात, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे उपस्थित होते. पुढे आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, प्रभाग क्रमांक १५ येथील उमेदवारांच्या प्रचारार्थ जुनी मिल आयोजित केलेल्या सभतून आमदार देवेंद्र कोठे यांनी थेट राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना फोन करून प्रभागात असलेल्या जुनी मिल चाळ, लक्ष्मी चाळ, पाटील चाळ, लक्ष्मी विष्णू चाळ, वारद चाळ, एनजी मिल चाळ,जुनी पोलीस लाईन, धरमशी लाईन यासह मुरारजी पेठ येथील अन्य कामगारांच्या चाळी व मिळकतींवरती चुकीच्या प्रकारे बी टू (सत्ता प्रकार ब) लागल्यामुळे कामगारांच्या चाळींचा पुनर्विकास रखडल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आचारसंहितेनंतर बैठक लावून हा विषय एकही रुपये शासकीय कर न घेता पूर्णपणे निकाली काढून देण्याचा शब्द महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभेमध्ये दिला.

## निधन वृत्त...

### ॲड. पृथ्वीराज चव्हाण



**सांगोला,दि.१३ जानेवारी -**

सांगोला शहरातील माजी नगराध्यक्ष ॲड. पृथ्वीराज भीमराव चव्हाण (वय-९३) यांचे वृद्धपकाळाने मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी दुपारी निधन झाले. सांगोला नगरपरिषदेचे ते पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, भाऊ, बहीण, पुतणे, नातू असा मोठा परिवार आहे.

### बाबूराव लेंगरे



**पिलीव, दि. १३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील बाबुराव ज्ञानु लेंगरे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### चिंतामणी अन्नलदास



**सोलापूर, दि. १३ जानेवारी -**

पूर्वभागातील पद्मनगर येथील रहिवासी व कुचन हायस्कूलचे निवृत्त कार्यालयीन अधिक्षक चिंतामणी रामय्या अन्नलदास (वय-८६) यांचे मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी व नातू असा परिवार आहे. बुधवार, दि.१४ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

# फिरते गर्भलिंग निदानप्रकरण; आणखी तिघांना अटक

**पाच दिवसांची पोलिस कोठडी, प्रकरणाची पाळेमुळे बीडपर्यंत**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जानेवारी-**

गर्भलिंग निदान व गर्भपात प्रकरणाची चक्रे बीड जिल्ह्यापर्यंत पोहोचली आहेत. बार्शी पोलिसांनी याप्रकरणी परिचारिका कल्पना मुंडे (वय ४०, रा. कॅन्सर हॉस्पिटलजवळ कथले प्लॉट, बार्शी), छगन मोहोळकर (वय ३०, रा. उंदरगाव, ता. करमाळा), प्रवीण मासाळ (वय ३३, रा. मानेगाव) यांना सोमवारी अटक केली. पोलीस कोठडीतील आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास करुन तिघे गळाला लागले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले असता तिघांना शुक्रवारपर्यंत (दि.१६) पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. बार्शी तालुक्यात फिरते गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपातप्रकरणी पोलिसांनी जिल्ह्यातील बार्शी, माढा, माळशिरस, करमाळा तालुक्यातील तसेच बीड जिल्ह्यातील केज येथून परिचारिकेसह एकूण ६ जणांना अटक केली आहे. गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदानोपयोगी तंत्र (गर्भलिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ अंतर्गत गुन्हा बार्शी पोलिसांत दाखल केला आहे. याप्रकरणी बार्शी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शिंदे यांनी फिर्याद दाखल केली आहे.




**गर्भलिंग चाचणीसाठी मस्तूदकडे पेशंट**

आरोपी महिला मस्तूद यांच्याबरोबर गर्भलिंग निदान करण्यासाठी एजंट म्हणून पेशंट पुरवण्याचे काम मुंडे करत होत्या. छगन मोहोळकर हा मस्तूद बरोबर गर्भलिंग निदानसाठी एजंट म्हणून काम करत होता. मानेगाव येथील रहिवासी मासाळ हा वैराग व मानेगाव येथील मासाळ हॉस्पिटल येथे गर्भपात करत होता. गर्भलिंग चाचणीसाठी मस्तूदकडे पेशंट पाठवत होता, अशी माहिती पोलिसांच्या तपासात पुढे आली. फिरत्या वाहनाद्वारे गर्भलिंग निदान करणारा तोतया डॉ. अजित सुरेश मस्तूद (वय ३६, रा. रोपळे, ता. माढा) यास गर्भपाताच्या गोळ्या पुरवणारा नरेंद्र भगत (वय ४० रा. आनंदनगर अकलूज, ता. माळशिरस), अकबर मुलाणी (वय ४५, रा. शिक्षक कॉलनी, केज, जि. बीड) या तिघांना यापूर्वीच अटक केली आहे.

**वैरागच्या रुग्णालयात गर्भपात**

अजित मस्तूद याच्या फिरत्या गर्भलिंग निदान केंद्रामध्ये महिलांची सोनोग्राफी करुन गर्भनिदान करत. सर्व गर्भपात हे तालुक्यातील वैरागच्या मॅक्स केअर हॉस्पिटल येथे केल्याची कबुली डॉ. प्रवीण मासाळने दिल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांनी सांगितले.

**आठ दिवसात पोलिसांचा तपास गतिमान**

गेल्या मंगळवारी दुपारी ४.४० वाजण्याच्या सुमारास जामगाव हद्दीतील वाणेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत समाधान शंकर बाबर यांच्या पडीक शेतातील कच्च्या रस्त्यावर अजित मस्तूद हा बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान व गर्भपात करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला होता.

## मालट्रक-चारचाकीच्या धडकेत एक जखमी

**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मालट्रकच्या निष्काळजी वाहनचाकामुळे अपघात होऊन एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास जुना हैद्राबाद नाका, सोलापूर येथील एसएसटी पॉईंट येथे हा अपघात झाला. फिर्यादी सौरभ सुखदेव भिंगे (रा. दामाणी नगर) सोलापूर हे चारचाकी वाहन क्रमांक एमएच १३ ईके ४१०९ थांबवून उभे असताना, मागून येणाऱ्या मालट्रक क्रमांक केए ५६ ३५९४ चालक रविचंद्रन मल्लप्पा रा. हुलगुट्टी, ता. बसवकल्याण, जि. बिदर, कर्नाटक याने वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवत जोराची धडक दिली. या धडकेत चारचाकीमध्ये बसलेले फिर्यादीचे मोठे भाऊ शिवराज यांना उजव्या डोळ्याच्या भुवईजवळ जखम झाली. तसेच धडकेमुळे चारचाकी वाहन पुढे थांबलेल्या वाहनावर आदळून त्याच्या पुढील व मागील बाजूचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मालट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार नवले करीत आहेत.

# खडकावर बीजारोपण करणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील



महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..... माळशिरस तालुका तसा बघितला तर ओसाड व माळरान आणि ग्रामीण भाग. तेथील लोकांच्या समस्या लोखंडी सागरासारख्या होत्या. गोरगरीब समाजासाठी काहीतरी करायचे, नांगरलेल्या शेतातून सोनं उगवावं, हिरव्या गालिच्याने सगळीकडे आच्छादित व्हावं. रात्रीच्या तारांगणात सगळीकडे उजेड पसरावा, ध्येयनिष्ठेने वेडे झालेले सहकार महर्षी प्रचंड महत्वकांक्षा बाळगून काम करीत होते खडतर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक अडचणींवर मात केली आणि एक आदर्श निर्माण केला. माळशिरस तालुक्याचे नंदनवन केले. सहकार महर्षीच्या कार्यातून सर्वसामान्य जनतेला प्रेरणा मिळते कठीण परिस्थितीतही हार न मानता साहेब पुढे गेले. खडतर परिश्रम आणि आत्म विश्वासाच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखवले आणि नवीन दृष्टीकोन स.म.शंकरराव मोहिते पाटील यांनी दिला

सहकाराचे जाळे निर्माण करून गोरगरीब जनतेवर प्रचंड दयाळूपणा दाखवून सर्वांना मदत करायचीच, तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायचेच हीच खरी प्रगती होईल हा मनाशी केलेला ठामनिश्चय ! धोरणे आणि मार्ग जरी वेगळे असले तरी जनतेचे हित जोपासत काम करायचे, जनतेची भूक दूर करीत हरितक्रांतीचा पाया रचला. गरीबांचा उत्कर्ष करायचा असेल, त्यांनी गरीबी दूर करायची असेल तर हाताला काम मिळाले पाहिजे. म्हणून सहकाराच्या माध्यमातून साखर कारखाने, कुक्कुटपालन, सुतगीरण, शेतकऱ्यांच्या मालासाठी खरेदी विक्री संघ, सहकारी बँक अशा अनेक गोष्टी चालू केल्या. त्यामुळे आजची पिढी माळशिरस तालुक्यातील चांगले जीवन जगत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीबरोबर पूरक व्यवसाय करावा दुष्काळी छायेतला प्रदेश पावसाची श्वाश्वती नसलेला परिसर पाण्याखाली भिजवणार, हजारो वर्षांचे दारिद्रय संपवणार कर्तृत्वाचा डोंगर उभा करायचा हाच गुण या मातीनं शिकवला, प्रश्नाचे उत्तर मिळो अथवा न मिळो उत्तराची दिशा शोधायचीच, ग्रामीण भागातील तरूणांना घडवायचच, तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. त्यांच्या चेहऱ्यांवरील दारिद्र्याच्या, कंगालपणाच्या रेषा पुसून आत्म निर्भर बनवायचं, शिकलेली व्यक्ती आजन्म फुलत राहीली पाहीजे. ती कधीच उपाशी किंवा अधाशी नसली पाहिजे. त्याच्या अंगी नवनिर्मितीचे सामर्थ्य असले पाहिजे. शिक्षणामुळे आत्मबोध घडावा. उपजीविकेबाबतीत व्यक्तीची स्वाधीनता वाढावी म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ व सहकाराच्या माध्यमातून अनेक व्यवसाय सुरू केले. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देऊन महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला. सिंचन सुविधांचा विकास करून शेतकऱ्यांना वर्षभर पाणी मिळवून देण्याची व्यवस्था केली. दुष्काळी भागात रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आणि स्थानिक लोकांना स्वावलंबी बनवले. आर्थिक विकास झाला आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा झाली. साहेबांच्या कार्यामुळे सामाजिक बदल घडून आला आणि लोकांमध्ये एकता आणि सहकार्याची भावना निर्माण झाली. पर्यावरण संवर्धनाच्या कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि दुष्काळी भाग, खडकाळ भाग हिरवळ केला. सामान्य माणसाच्या हिताची काळजी वाहणारी तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. तसेच अद्ययावत ज्ञान मिळविण्या शिवाय पिढी पुढे जाणार कशी सामाजिक वैचारिक परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षण हाच पर्याय आहे. म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजची स्थापना केली. आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कामाचा डोंगर उभा करायचा हे करीत असताना श्रेयासाठी मागे वळून पाहायला सुद्धा सवड उरली नाही गावोगावी माळामाळावर नवे जग उभे केले. गोरगरीबांना आधार दिला. आपल्या जिवनात जगण्यासाठी नुसत सुखच पाहील नाही. तर दुष्काळी भागाला सिंचन योजना सुरू करुन खडतर परिस्थितीत ही खडकावर बीजारोपण केले आणि माळशिरस तालुका हिरवागार केला. कोणाबद्दलही किल्मिष न बाळगता आयुष्यभर झुंजले. आणि आपल्या यशाचे नवे सोनेरी पान लिहिले. त्यांच्या जीवनातील आदर्श, त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजासाठी केलेले योगदान कायमस्वरूपी लोकांच्या स्मरणात राहील. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांचा जन्म माळशिरस तालुक्यात झाला याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे.

**- प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी,**
अकलूज, मो.नं. : ९२२६१४४८३६




काकासाहेब,
विकास, गती आणि चालना आपणामुळेच मिळाली...
वसा, वारसा आणि प्रेरणा आपणामुळेच मिळाली...
शेतकऱ्यांच्या उद्धाराचा आपण दिला मंत्र ...
आपल्यामुळेच साध्य झाले इथल्या विकासाचे तंत्र

सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त
त्यांच्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन!

शंकरराव मोहिते-पाटील सर्व सेवा संघ,शंकरनगर
शंकरनगर (अकलूज), ता. माळशिरस, जि. सोलापूर
अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य



सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते
सहकार महर्षि कै.शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !
विनम्र अभिवादन !



थेंबा थेंबात अमृत...
शिवामृत®

रविराज शंकरराव इनामदार-देशमुख
कार्यकारी संचालक

दत्तात्रय रामचंद्र भिलारे
व्हा.चेअरमन

खा.धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील
चेअरमन

सर्व संचालक मंडळ, सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग
शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या,
विजयनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर
Phone : 02185 - 222126/222566 • Email: shivamrutakluj@gmail.com
सोलापूर, सातारा, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नांदेड, लातूर येथे सुपर स्टॉकिस्ट नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.
स्वामीराज अॅड्स 95037 73073



सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते
सहकार महर्षि कै.शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !

Shivratna Shikshan Sanstha
ADMISSION OPEN

SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ
(Std.1-12 classes - CBSE & Maharashtra state board syllabus)
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

SHIVRATNA C.B.S.E. SCHOOL, AKLUJ
1-10 classes (Affiliated to CBSE )
Ph. 9172196213
Email - shivratnaschool79@gmail.com

FREE WINGS PRE-PRIMARY SCHOOL, AKLUJ
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

SHIVRATNA MILLENNIUM SCHOOL, AKLUJ
Ph. 8793411005

SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. (02185) - 227552 / 222552
Email - smpsemienglishakluj@gmail.com

SHIVRATNA PATTERN, AKLUJ
NEET / JEE / MH- CET Coaching Center
Mob.8956993001 / 7517827801
Email - shivratnapatternakluj@gmail.com

VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 * Email - akluj_nursing@rediffmail.com

SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ
(B.B.A. - Affiliated to Solapur University, M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center , Naac Grade : B++ )
Ph. (02185) - 222509 * Email - rmpakluj@gmail.com

SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ
Ph. 9604695339 * Email - shivratnagirlhostel@gmail.com

TARARANI WOMEN'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
Mob.7387311005 * Email - twwa.akluj@gmail.com

SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

SHIVRATNA SPORTS ACADEMY, SHANKARNAGAR-AKLUJ * Ph. 80875 41009

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students
SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA
SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org
■ ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026
■ KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION
स्वामीराज अॅड्स 95037 73073

सोलापूर दिनांक
९ | बुधवार, १४ जानेवारी २०२६
सोलापूर तरुण भारत



# सत्यम्... सत्यम्... दिड्डुम... दिड्डुम..!

## जयघोषात बरसल्या अक्षता



**'बाराबंदी'मुळे धवल सागराला भरती** | **मराठी, कन्नड, हिंदी भाषेतून निवेदन** | **मानकऱ्यांना देण्यात आला विडा** | **विविधरंगी फुलांनी सजला संमती कट्टा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

**सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्दरामेश्वर यात्रेतील अक्षता समारंभ अंतर्गत श्री सिध्दरामेश्वरांचा योगदंड आणि कुंभारकन्या यांचा प्रतिकात्मक विवाह लावण्यात आला. यानिमित्त मंगळवार, १३ जानेवारी रोजी एक हजार किलो विविधरंगी फुलांनी संमती कट्टा सजविण्यात आले होते. दुपारी १.३० वाजता 'एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र... सत्यम सत्यम्, दिड्डुम दिड्डुम... श्रीशिवयोगी सिध्देश्वर महाराज की जय'च्या घोषात दाही दिशांतून अक्षता बरसल्या. भक्तांनी परिधान केलेल्या पांढऱ्या शुभ्र बाराबंदीमुळे जणू धवल सागराला भरती आल्याचे मनोहरी चित्र पहायला मिळाले.**

श्रीसिध्देश्वर यात्रेला ९०० हून अधिक वर्षांची परंपरा आहे. या यात्रेतील यण्णीमज्जन, ६८ शिवलिंग प्रदक्षिणा, करमुटगी, नंदीध्वज मिरवणूक, अक्षता सोहळा, संमत्ती वाचन, कप्पडकळ्ळी आदी धार्मिक विधींना विशेष महत्व असतो. मंगळवार, १३ जानेवारी रोजी सकाळी बाळी वेस परिसरातील श्रीमल्लिकार्जून मंदिरजवळील हिरेहब्बू वाड्यात राजशेखर हिरेहब्बू व इतर मानकऱ्यांच्या हस्ते योगदंडाची पूजा करुन नंदीध्वज मिरवणूक मार्गस्थ करण्यात आली.

दाते गणपती, दत्त चौक, सोन्या मारुती, माणिक चौक, विजापूर वेस, पंचकट्टा या मार्गावरुन ही मिरवणूक काढण्यात आली. श्रीसिध्देश्वर मंदिर परिसरातील संमत्ती कट्टा येथे नंदीध्वज व पालखी येताच त्याठिकाणी उपस्थित भाविकांनी मनोभावे दर्शन घेत कृतकृत्य होत होते.

पारंपरिक वाद्यांसह ढोल-ताशाच्या दणदणाटाने वातावरणात अधिकच उत्साह संचारला होता. दरम्यान, मानकरी राजशेखर हिरेहब्बू, मनोज हिरेहब्बू व इतर मानकरी श्री सिध्देश्वर महाराजांच्या पूजेसाठी मंदिरात गेले. तर इकडे प्रा.भीमाशंकर बिराजदार, काशीनाथ भतगुणकी यांनी मराठी, कन्नड, हिंदी भाषेतून निवेदन करत येथील सोहळ्याचे यथार्थ वर्णन करीत होते. श्रीसिध्देश्वर मंदिरातील पूजाविधीनंतर मानकरी संमत्ती कट्ट्याजवळ येताच गंगा पूजन व सुगडी पूजन झाले. तसेच मानकऱ्यांना विडा देण्यात आला. श्रीसिध्देश्वर देवस्थान कमिटीच्या वतीने सर्व मानकऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अक्षता सोहळ्याला होणारी गर्दी लक्षात घेता पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. श्रीसिध्देश्वर मंदिरकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आले. आजचा हा अनुपम्य सोहळा पाहण्यासाठी सोलापूरसह महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आदी राज्यातील भक्तगणांसह पंचकमिटीचे पदाधिकारी-सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



### 'संस्कार भारती'कडून रांगोळ्याच्या पायघड्या

'संस्कार भारती'च्या वतीने श्रीसिध्देश्वर मंदिर परिसरासह नंदीध्वज मिरवणूक मार्गावर रांगोळ्याच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. सोलापूरसह देशभरातील ४५० ते ५०० रंगावली कलाकारांनी तीन ते सोडतीन किलोमीटरवर रांगोळी रेखाटून श्रीसिध्देश्वर चरणी आपली सेवा अर्पण केली.

### नंदीध्वजांना बांधण्यात आले बाशिंग

नंदीध्वज मिरवणूक मार्गावर अनेक भाविकांनी नंदीध्वजांना बाशिंग बांधत केलेले नवस फळाला आल्याबद्दल आणि मनोकामना पुर्णत्वास न्यावी, अशी प्रार्थना श्रीसिध्दरामेश्वरांकडे करीत होते. काहींनी खारीक-खोबऱ्याचे तर काहींनी लिंबूचे हार मानाच्या नंदीध्वजांना अर्पण केले.

### राजकारणीही परिधान केले होते 'बाराबंदी'चा पोशाख

अक्षता सोहळ्याच्या निमित्ताने विविध पक्षसंघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांचीही लक्षणीय उपस्थिती होती. यामध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार प्रणिती शिंदे, ज्येष्ठ नेत्या उज्ज्वलाताई शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदींचा समावेश होता. विशेष म्हणजे, यातील काहींनी 'बाराबंदी'चा पोशाख परिधान करुन सोहळ्यात सामील झाले होते.




### ५१ किलो तांदळापासून साकारली श्रीसिध्दरामेश्वर महाराजांची प्रतिमा

श्री बसवेश्वर जन्मोत्सव बहुउद्देशीय मंडळाच्यावतीने शेळगी येथील मातोश्री मंगल कार्यालयामध्ये ५१ किलो तांदळापासून श्री शिवयोगी सिध्देरामेश्वर महाराज यांची भव्य प्रतिमा साकारण्यात आली. यासाठी सुमारे सहा तासांचा कालावधी लागला. तांदूळ भाजून त्याच्या पाच वेगवेगळ्या शेड्स तयार करण्यात आल्या. या कलाकृतीचा आकार सुमारे १० बाय १६ फूट इतका आहे. चित्रकार विपुल मिरजकर यांच्यासह शुभम सब्बन, राधाराणी रापेल्ली यांनी ही कलाकृती साकार केली. सिध्दाराम यलशेट्टी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



**आज होम प्रदीपन, भाकणूक सोहळा :** बुधवार, दि.१४ जानेवारी रोजी होम प्रदीपन, भाकणूक सोहळा होणार आहे. मानकरी हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते नंदीध्वजांची पूजा करुन मिरवणूक मार्गस्थ होणार आहे. जुनी फौजदार चावडी येथे पहिल्या नंदीध्वजास नागफणी तर इतर नंदीध्वजांना बाशिंग बांधले जाणार आहे. नंदीध्वज होम मैदान येथे आल्यावर तेथील होमकुंडात बाजरीचा पेंडीचे तयार केलेल्या कुंभार कन्येस शालू नेसवून सौभाग्य अलंकार घालून त्या कुंभार कन्येस मणी, मंगळसूत्र, बांगड्या, जोडवे, हार घालून कुंभार कन्येस सजवून होम प्रदीपन केला जातो. त्यानंतर भाकणुकीचा कार्यक्रम व शोभेचे दारुकाम होणार आहे.

**नंदीध्वज मार्गावर भक्तीचा महापूर :** 'एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र... श्री सिध्देश्वर महाराज की जय...'च्या घोषाने सारा परिसर दुमदुमला होता. आकर्षक रांगोळीच्या पायघड्या, बँड ढोलीबाजा, कृत्रिम हत्ती आणि बाराबंदी पोशाख परिधान केलेले चिमुकले बालक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. नंदीध्वज मिरवणूक मार्गावर भक्तीचा जणू महापूर उसळला होता.



## अक्षता सोहळ्यानंतर जयोस्तुते फाउंडेशनकडून आदर्श स्वच्छता अभियान

**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज यांच्या पावन अक्षता सोहळ्यानंतर जयोस्तुते फाउंडेशनच्या वतीने श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात भव्य व शिस्तबद्ध स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

संमती कट्टा, होम कट्टा व परिसरातील रस्त्यांवर भाविकांकडून पडलेले पाण्याच्या बाटल्या, कागदांचे तुकडे व इतर कचरा तत्काळ गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. अक्षता सोहळ्यानंतर उरलेला तांदूळ वेगळा करून तो पक्ष्यांच्या खाद्यासाठी बाजूला ठेवण्यात आला, तर उर्वरित सर्व कचरा महापालिकेच्या स्वच्छता वाहनात जमा करण्यात आला. अवघ्या तीन तासांत संपूर्ण परिसर पूर्ववत स्वच्छ झाल्याने बंदोबस्तासाठी तैनात असलेले पोलीस कर्मचारी, मंदिर प्रशासन व भाविकांनी समाधान व्यक्त करत जयोस्तुते फाउंडेशनच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. या स्वच्छता अभियानात नीलम नगर, कलावतीनगर, माशाळेनगर परिसरातील सुमारे ८० तरुण-तरुणींनी तसेच विविध गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. स्वच्छता मोहिमेनंतर सर्व सहभागी तरुण-तरुणींना शांतय्या स्वामी यांच्या हस्ते उसाचा रस देण्यातआले.

या स्वच्छता अभियानासाठी जयोस्तुते फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, पर्यावरण संरक्षण गतिविधी, समृद्धी सेवा संस्था, जय हिंद तरुण मंडळ आदी सामाजिक संघटनांनी परिश्रम घेतले. भविष्यातही असेच समाजोपयोगी व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३२६

**तुका म्हणे कोणी नाइके सांगता ।**
**होती यमदूतां वरपडे ।।**

आपणास एखादी गोष्ट येत नाही म्हणून ती दुसऱ्याकडून शिकून घ्यावी, अशी मानसिकता जोपासणारे कमी असतात. पण एखादी गोष्ट, कार्य येत नसले तरीही ते आपणाला जमतेच अश अविर्भावात वावरणारे खूप असतात. अशा अहंकारी, अज्ञानी लोकांना कोणी कितीही सांगितले तरी ते कोणाचे ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. आपण करतो तेच योग्य आहे अशी मानसिकता जोपासणाऱ्या या लोकांवर संत महात्म्यांच्या वचनाचाही परिणाम होत नाही. संसारात अडकलेल्या जीवाला न कळत ईर्षा, द्वेष, मोह, अहंकार, मत्सर, काम, क्रोध आदी शत्रू घेरतात. हे शत्रू त्याला शत्रू न वाटता मित्रच वाटतात. त्यामुळे या जीवाची फार मोठी फसगत होते. ही फसगत आयुष्य व्यर्थ खर्ची जाण्याचा परिणाम देऊ शकते. सर्वश्रेष्ठ असणारे हे मानवी जीवन आपणच निर्माण केलेल्या माया, मोह, अहंकार, आदी शत्रूंच्या तावडीत सापडून व्यर्थ होऊ नये म्हणून मार्गदर्शन करणाऱ्या संतांचेही जर हा माणूस ऐकत नसेल तर त्याच्या जीवनाची परिणीती हाल अपेष्टेत होईल. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे कोणी नाईके सांगता ।**
**होती यमदूतां वरपडे ।।**

दैनंदिन जीवनातील अशी अनेक उदाहरणे असतील की, ज्यांना कोणीही कितीही सांगितले तरी ते कोणाचे ऐकत नाहीत, आणि शेवटी ते फसगतीस पात्र होतात. जन्मत: कोणताही व्यक्ती वाईट नसतो. तो हळू हळू वाईट काम करू लागतो आणि एके दिवशी मोठ्या दुष्कृत्यात सामील होतो. छोटे-छोटे चुकीचे कार्य करणाऱ्यास त्यावेळी कोणीतरी हे कृत्य करू नको म्हणून म्हटले असेलच, पण त्याने निश्चितच हे ऐकले नसेल, म्हणूनच त्याचा परिणाम मोठे दुष्कृत्य त्याच्या हातून घडण्यावर झाला असेल. हे किंवा असे करू नको म्हणून अनेकवेळा सांगूनही न ऐकणारा एखाद्यावेळी मृत्यू ओढावून घेण्यासही कारणीभूत होवू शकतो. मृत्यू म्हणजे सर्व संपणे होय. पण कांही लोक आयुष्यभर दिवसातून अनेकवेळा मरत असतात. त्यांचे हे मरणे केवळ योग्य ते विचार न ऐकण्यामुळे होत असेल तर त्याच्या इतका दुर्भागी दुसरा कोण असणार? "आई-वडील मुलांना हे करू नको, असे करू नको म्हणून अनेकवेळा सांगतात, पण कांही मुले आई-वडीलांचेही ऐकत नाहीत. अशा मुलांची पुढे चालून काय अवस्था होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ज्याला संत, महात्मा, सद्गुरु मार्गदर्शनासाठी भेटला त्याच्या इतका कोणी भाग्यवंत नाही. प्रत्येकाला संत, महात्मा, सद्गुरु भेटेलच असे नाही. आपले आई-वडील हेच खरे सद्गुरु, संत, महात्म्ये असतात, हे लक्षात ठेवून त्यांचे ऐकले तरी पुरेसे होऊ शकते. कोणाचेही आई-वडील आपल्या मुलांना चुकीचे कधीच सांगत नसतात, हे याप्रसंगी लक्षात असू द्यावे.

**जय जय राम कृष्ण हरी.**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष. कृ. एकादशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- अनुराधा (२७.०३)**
**योग - गंड (१९.५४)**
**करण - कौलव (३१.०६)**
**राहू काल : बुधवार : दु. १२ ते १.३०**

**दिनविशेष :**
**मकरसंक्रांती**
**षट्तिला एकादशी**
**१९२३: विदर्भ साहित्य संघाची स्थापना झाली.**
*** १९९४: मराठवाडा विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला.**
*** १९९८: ज्येष्ठ गायिका एम. एस. सुब्बलक्ष्मी यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर.**

# दुधनीत शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांचा अक्षता सोहळा उत्साहात

**हजारो भाविकांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१३ जानेवारी**

हर्र बोला हर्र, श्री मल्लिकार्जुन महाराज की जय, श्री सिद्धरामेश्वर महाराज की जय, जयचा जयघोष करीत हजारो भक्तांच्या उपस्थितीत दुधनीचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांचा अक्षता सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

दुधनी येथे प्रतिवर्षाप्रमाणे मकर संक्रांतीस ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रा भरत असते. यात्रा दुधनी विरक्त मठाचे श्री. म नि प्र डॉ शांतलिंगेश्वर महास्वामी जी यांच्या सानिध्यात मकर संक्रात सर्व कार्यक्रम होणार आहे. सोमवार, दि. १२ जानेवारी रांजी मंदिरात श्रीच्या मूर्तीस महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर मल्लीकार्जुन मंदिरात मानाच्या नंदीध्वजास नागफणी बांधून सजविले. त्यानंतर मानकरी ईरप्पा पुराणीक, चन्नविरप्पा पुराणीक,



अध्यक्ष चंद्रकांत येगदी व सेवेकरी यांच्या उपस्थितीत पूजा करून यात्रेस प्रारंभ झाला आहे. पहाटे श्रीच्या मूर्तीस अभिषेक करून श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून नंदीध्वजाची मुख्य रस्त्याने मिरवणूक काढण्यात आली. संमती कट्ट्यावर डॉ. म. नि. प्र. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पुरोहित इरय्या पुराणीक व पुराणीक बंधू यांनी विधिवत पूजन संमती वाचन केले.

मंदिरामध्ये ११ ते २ वाजे पर्यत हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये विधिवत अक्षता सोहळा संपन्न झाला. हजारो नयनानी हा नयनरम्य दृश्य टिपला. यात्रेत कर्नाटक व महाराष्ट्रातील व्यापारी शेतकरी खरेदी-विक्री करण्याकरिता मोठ्या प्रमाणात आले आहेत. त्या अनुषंगान त्यांना कुठल्याही प्रकारची त्रास होऊ नये म्हणून मंदिर पंचकमिटीच्या वतीने जनावारान पाणी, पिण्याचे पाणी व दुधनी येथील सामाजिक संघटनांकडून दरोज भात, वरण वाटप करण्यात येत आहे. सोहळ्यास नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, शंकरराव म्हेत्रे, मंदिर पंचकमिटी चेअरमन चंद्रकांत येगदी, मलकाजप्पा अंधेनी, गिरमलप्पा सावळगी, सातलिंगप्पा परमशेट्टी, सिद्धाराम मल्लाड, लक्ष्मीपुत्र भाईकट्टी, मल्लिनाथ म्हेत्रे, निंगण्णा सोळसे, शरणबसप्पा हावशेट्टी, सचिन माशाळ आदी परिश्रम घेत आहेत. गाडा यात्रेमध्ये आलेल्या सर्व शेतकरी बांधवाची प्रसादसेवा, पशुधनाच्या पाण्याची व्यवस्था व मुलभुत सुविधा देण्यात येणार आहेत. अक्कलकोटसह कर्नाटकातील शेतकरी बांधवानी या यात्रेत आपले पशुधन खरेदी-विक्री करीता आणावे. पशुधनाचे बक्षीस वितरण देखील होणार आहे.

सदर यात्रा सात दिवस भरत असून बुधवार दि.१३ रोजळ श्री मल्लीकार्जुन पालखी, होम पुजाविधी, होम मैदानावर होम प्रदिपन, गुरुवार दि.१४ रोजळ श्री एस जी परमशेट्टी प्रशालेच्या मैदानावर शोभेचे दारूकाम व रात्री भजन कार्यक्रम. शुक्रवार दि. १५ रोजी प्रसिद्ध मल्लांच्या जंगी कुस्त्या तर शनिवार दि. १६ रोजळ विविध प्रकारच्या जनावरांची निवड करण्यात येते. रविवार दि.१७ रोजळ पशुसवंर्धन अधिकारी डॉ. दिपक बवंडवे यांच्या उपस्थितीत व डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या हस्ते बक्षीस वितरण कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर आठ दिवस जनावरांचा बाजार भरणार आहे. तरी भविकांनी यात्रेस सहभागी व्हावे असे आवाहन देवस्थान पंचकमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.



## बेलाटी जि.प. शाळेत स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण बालाजी अमाईन्स च्या सी.एस.आर विभागाचे प्रमुख अनिल विपत यांच्या हस्ते करण्यात आले. बालाजी अमाईन्सच्यावतीने सीएसआर अंतर्गत मुलांकरीता व मुलीकरीता एक स्वच्छतागृहाचे युनिट बांधून शाळेतील विद्यार्थ्यांची सोय केली या बद्दल शाळेचे मुख्याध्यापिका शोभा माने यांनी संचालक मंडळाचे व व्यवस्थापकिय संचालक राम रेडडी यांचे आभार मानले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक राहुल राठोड, शेखसर, नायडूमॅडम, विश्वनाथ राठोड, नागेश तळे, धनराज थिटे, वैशाली मोरे, रामेश्वर घुगेसर, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज अंटद उपस्थित होते.

## दुकान फोडून ७० हजारांची रोकड व मोबाईल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

एमआयडीसी हद्दीत अज्ञात चोरट्याने दुकान फोडून रोकड व मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी राज सिद्राम कोळी रा. सर्वोदया नगर, मुळेगाव रोड, सोलापूर यांचे साई डोअर्स अ‍ॅण्ड हार्डवेअर, धनलक्ष्मी नगर, सोलापूर येथे दुकान आहे. दि. १० जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजता ते दि. ११ जानेवारी रोजी सकाळी ९.४५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाच्या मागील बाजूचा पत्रा उचकटून आत प्रवेश करत ही चोरी केली आहे. यावेळी चोरट्याने दुकानातून ७० हजार रुपये रोख रक्कम तसेच सॅमसंग गॅलेक्सी एप६ मॉडेलचा ग्रे रंगाचा मोबाईल असा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड करीत आहेत.

## मराठा सेवा संघाच्या कार्यालयात जिजाऊ जयंती साजरी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

राष्ट्रमाता, राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्यालयामध्ये जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला जिजाऊ वंदना म्हणण्यात आली.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री सदाशिव पवार जिल्हा सचिव लक्ष्मण महाडिक, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्ष प्रीती कदम, राम माने, राजू व्यवहारे, गोवर्धन गुंड, जिजाऊ ब्रिगेडच्या उज्वला साळुंखे, अभीजली जाधव, लता ढेरे उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन चव्हाण, नितीन मोहिते, राजू व्यवहारे, प्रकाश डोंगरे, अंबादास सपकाळे नरेश मोहिते, राजेंद्र भोसले आदींनी परिश्रम घेतले.

## हातभट्टी केंद्रावर धाड; पावणे सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

महापालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर व सोलापूर ग्रामिण पोलिस यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत अवैध हातभट्टी दारु निर्मिती केंद्रावर केलेल्या धडक कारवाईत रूपये ०६ लाख ७१ हजार ९१५ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांनी सागर धोमकर विभागीय उपायुक्त, पुणे विभाग याच्या निर्देशानुसार व भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर. सोलपूर ग्रामिण पोलिस विभागाचे परिविक्षाधिन आय पी एस अधिकारी पी एस राहुल, जे. एन. पाटील प्र.उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचे समवेत दि. १२/०१/२०२६ रोजी



दक्षिण सोलापूर तालुक्यातील मौजे मुळेगाव तांडा, येथे केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रांवर, केलेल्या धडक कारवाईत एकुण ०८ गुन्हे नोंद करण्यात आले असुन ०८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत १०,४२० लि. रसायन, ११७० लि. हा. भ. दारू ५१०० किलोग्राम काळा गुळासह एकुण रूपये ०६लाख ७१ हजार लाख ९१५ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच या विभागाकडून ०१ जानेवारी २०२६ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीत एकूण ९९ गुन्हे दाखल करण्यात आले असून ९८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर कारवाईत ४४,५९० लि. रसायन, ३९७३ लि. हा. भ. दारू ३९९ ब. ली. देशी मद्य, ५३ ब. ली. विदेशी मद्य, ११७ ब.ली. परराज्यातील विदेशी मद्य, २१ ब.ली. बिअर, ६३५ ली. ताडी २२०० किलो मळी, ५१०० किलोग्राम काळा गुळ व ०५ वाहनांसह रुपये ३६ लाख ८७हजार ४९५ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई प्र.उपअधीक्षक जे.एन. पाटील, निरीक्षक आर.एम. चवरे, ओ व्ही घाटगे, डी आर बाम णे तसेच दुय्यम निरीक्षक सर्वश्री एस.डी. कांबळे, राम निंबाळकर, धनाजी पोवार, आर.एम. कोलते, सुखदेव सिद, सचिन शिंदे समाधान शेळके, दिलीप सानप, अभिजित साळुंखे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, संजय चव्हाण, जवान सर्वश्री चेतन व्हनगुंटी, आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, वसंत राठोड, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, कपिल स्वामी गजानन ढब्बे, तानाजी जाधव, पवन उगले, स्वप्निल आरमाळ, योगेश गाडेकर, पंढरीनाथ भुतेकर, मंगेश मारसिंग, महिला जवान शिवानी मुढे, वाहनचालक दिपाली सलगर, संजय नवले, रशीद शेख व दिपक वाघमारे यांनी पार पाडली.



## मुस्लिम मावळ्यांकडून जिजाऊ जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त लक्ष्मी मार्केट येथे अभिवादन करण्यात आले. जिजाऊंच्या संस्कारामुळेच छत्रपती शिवाजीमहाराज रयतेच राज्य निर्माण केले. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची शिकवण दिली म्हणूनच आजही शिवछत्रपतींचं नाव जगभरात आहे, असे मत शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांच्या हस्ते जिजाऊ पुजन करण्यात आल. जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे, बशीर सय्यद ,तन्वीर गुलजार, रिजवान शेख, गफूर शेख, रिजवान दंडोती ,लक्ष्मण भोसले, रियाज पैलवान, सादिक शेख, मुख्तार लालकोट, सरफराज शेख, मौला शेख आदी उपस्थित होते.

## 'सिंहगड'चे विद्यापीठ परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

एन. बी. नवले सिंगगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव येथील विद्यार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.



शैक्षणिक वर्ष २०२५-२६ (सेमेस्टर-एक) मधील निकालात संगणक अभियांत्रिकी व यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ रँक मि ळवून कॉलेजच्या नावलौकिक वाढविला आहे. संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाचे यश तृतीय वर्ष बी.टेक मध्ये करणावर मोनाली व सिरसाट श्रावणी या विद्यार्थिनींनी १० व ८९.३३ टक्के गुणांसह विद्यापीठात संयुक्त द्वितीय क्रमांक पटकावला.

याच विभागातील खांडेकर स्वप्निल याने १० व ८६.३३% गुणांसह विद्यापीठात तृतीय क्रमांक, तर खरात सुषमा हिने ड्ख्ख १० व ८४.२७% गुणांसह चौथा क्रमांक मिळविला. अंतिम वर्ष संगणक अभियांत्रिकीतील घवघवीत काम गिरी अंतिम वर्ष बी.टेक (सेम-एक) मध्येही संगणक विभागाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. पूजा राठोड हिने ९२.८३ टक्के गुणांसह विद्यापीठात प्रथम क्रमांक, आदित्य बोडू (९२.४१ टक्के) - द्वितीय क्रमांक, विशाल मोटे (९२.१४ टक्के) - तृतीय क्रमांक, तेजा शेवाळे (९१.५९ टक्के) - चौथा क्रमांक पटकावला. तसेच हर्षदा भोरे (८८.८३ टक्के) - सातवा क्रमांक, संकेत होमकर (८८.६९%) व किर्तन करवा (८८.६९ टक्के) - संयुक्त आठवा क्रमांक, तर आदित्य कांबळे (८८.५५ टक्के) यांनी नववा क्रम ांक मिळविला.

यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचाही उल्लेखनीय सहभाग अंतिम वर्ष बी.टेक (२०२५-२६) मधील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनीही विद्यापीठ रँक मिळवून यशाची परंपरा कायम ठेवली आहे. राऊत प्रशांत यांनी ८५.६३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक, चौधरी आकाश यांनी ८३.८८ टक्के गुणांसह सहावा क्रमांक तर तेजस मेंते यांनी ८३.७५ टक्के गुणांसह सातवा क्रमांक मिळवून विभागाचा गौरव वाढविला. उल्लेखनीय यशाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर टी व्यवहारे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जुन्या भाडेकरूकडून महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

बाळे ब्रिज परिसरात एका महिलेला तिच्याच जुन्या भाडेकरूकडून मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १० जानेवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास वसुधा धनाजी ढाळे रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर या बाळे ब्रिज परिसरातून आपल्या घरी पायी जात होत्या. त्यावेळी त्यांच्या मागून आलेल्या मच्छिंद्र विष्णु गर्जे रा. मु.पो. बावी, ता. आष्टी, जि. सोलापूर या त्यांच्या जुन्या भाडेकरूने, तु मला जेवण करून का देत नाहीस? असे म्हणून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली. यावेळी आरोपीने रस्त्यावरील फरशीचा तुकडा उचलून फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. या घटनेनंतर फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दि. ११ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईत ६५ लाखांची सुपारी जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

मंत्री अन्न व औषध प्रशासन नरहरी झिरवाळ यांच्या विशेष भरारी पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, अन्न व औषध प्रशासन सोलापूर विभागाने दि. १२ जानेवारी रोजी एका मोठ्या कारवाईत ६४ लाख ९१ हजार रुपये किंमतीची संशयास्पद सुपारी जप्त केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटक राज्यातून येणारे वाहन अडवून त्याची तपासणी करण्यात आली. या वाहनातून ३५० पोती २४ हजार ४९८ किलो सुपारीची वाहतूक केली जात होती. या जप्त केलेल्या मालाची किंमत ६४,९१,९७० रुपये इतकी आहे.

सदर सुपारी ही तुटलेली आणि खराब झालेली असून ती प्रथम दर्शनी निकृष्ट दर्जाची असल्याचा संशय आहे. सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा व मानदे कायदा अन्वये हा माल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या सुपारीचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कायद्यानुसार पुढील कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या भेसळीविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाची ही मोहीम यापुढेही सुरूच राहील, असे अन्न व औषध प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

ही कारवाई अन्न व औषध प्रशासन सोलापूर सहाय्यक आयुक्त (अन्न) साहेबराव देसाई यांच्या समवेत अन्न सुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख, नंदिनी हिरेमठ, चन्नवीर स्वामी, उत्कर्षा एखंडे यांनी केली.

## महत्वाचे...



### उत्कृष्ट गाईड पुरस्काराने श्रीपूरच्या करुणा धाईंजे सन्मानित

**श्रीपूर, दि. १३ जानेवारी-**

श्रीपूर (ता.माळशिरस) येथील चंद्रशेखर विद्यालयाच्या क्रिडा सहशिक्षिका करुणा धाईंजे यांना सोलापूर भारत स्काऊटस् आणि गाईड यांच्या वतीने जिल्हास्तरीय उत्कृष्ट गाईडर पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार जिल्हा आयुक्त स्काऊट तथा शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते तर जिल्हा चिटणीस व उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाट, जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे, जिल्हा आयुक्त गाईड तथा उपशिक्षणाधिकारी रूपाली भाऊसार, जिल्हा मुख्य आयुक्त कादर शेख यांच्या उपस्थितीत देवून गौरविण्यात आले. करुणा धाईंजे यांनी शालेय जीवनापासूनच क्रिडा क्षेत्राला प्राधान्य देवून आपली वाटचाल चालू केली होती. विशेषतः भाला फेकी मध्ये त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर चांगली कामगीरी करत अनेक पुरस्कार मिळवले आहेत तसेच महिलांचे कुस्ती क्षेत्रातही त्यांचा दबदबा होता. त्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा जाधव, स्काऊट गाईड लिडर व उपमुख्याध्यापक शंकर यादव यांनी अभिनंदन केले.



### महात्मा फुले शाळेत जिजाऊ जयंती साजरी

**बार्शी, दि. १३ जानेवारी-**


क्रांतिज्योती सावित्रीमाई व राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त महात्मा फुले शाळा, सौंदरे येथे विज्ञान प्रदर्शन, तालुका स्तरीय व जिल्हा स्तरीय निबंध स्पर्धा विदयार्थी सन्मान सोहळा, क्रिडो क्टिव्हिटी, पालक सहविचार सभा आणि संक्रांतनिमित्त हळदी-कुंकू समारंभ संपन्न झाला. विज्ञान प्रदर्शन उद्‌घाटन सरपंच राजेंद्र सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी उपस्थित होते. प्रथमत प्रतिमापूजन व दिपप्रज्वलन कार्यक्रमाचे अध्यक्ष राहुल वाणी व अजय तिवारी यांच्या हस्ते पालकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रास्ताविक प्रा. गणेश गोटे यांनी केले, तर अजय तिवारी यांनी पालकांना मार्गदर्शन केले.



### चित्रकला ग्रेड परीक्षेमध्ये जि.प. पिसेवाडी शाळेचे यश

**वेळापूर, दि. १३ जानेवारी-**

पिसेवाडी तालुका माळशिरस येथील जि.प. पिसेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी चित्रकला ग्रेड परीक्षा मध्ये घवघवीत यश मिळवले आहे. महाराष्ट्र शासन कला संचलनालय मुंबईतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेमध्ये एलिमेंट्री व इंटरमिजिएट या परीक्षेसाठी एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेत बसले होते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले ग्रेड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला यामध्ये ए ग्रेड ७ विद्यार्थी,बी ग्रेड मध्ये १२ व सी ग्रेड मध्ये १५, याप्रमाणे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक जालिंदर बनकर सयाजी माने प्रशांत चिंचकर, प्रशांत पाटील, कृष्णदेव तुपे, अवंती सिंदफळकर, सारिका शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईक नवरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अण्णासाहेब शेंडे उपाध्यक्ष अमोल राऊत सरपंच मोहन भाकरे उपसरपंच भाऊसाहेब पिसे आदींनी अभिनंदन केले.



### अध्यापक विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**पंढरपूर, दि. १३ जानेवारी-**

येथील अध्यापक विद्यालयात राजमाता जिजाऊ जयंती स्वामी विवेकानंद जयंती तसेच युवा दिन व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांना आमंत्रित करण्यात आले होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. आर. वाघमारे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली. राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, सोलापूरचे चार हुतात्मे यांच्या जीवनावरती आधारित भित्तिपत्रके तयार केली होती त्याचे उद्घाटन करून झाली. पाहुण्यांचा परिचय स्नेहल कुलकर्णी यांनी करून दिला. दिव्या पिसे, प्रतीक्षा देशमुख, सार्थक इंगोले, गौरी दानोळे या छात्राध्यापकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन भाग्यश्री मोरे व गायत्री रणदिवे यांनी केले. फलक लेखन तृप्ती भगत व ज्ञानेश्वरी शिंदे यांनी केले. रांगोळी रचना कळकुंबे व शुभांगी चव्हाण तर भित्तिपत्रके हर्षा राहीरकर व प्रतीक्षा पवार यांनी तयार केले. कार्यक्रमाचे आभार नम्रता माळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख संतोष गंगथडे यांनी मार्गदर्शन केले.अध्यापक विद्यालयाचे शिक्षक श्रीनिवास हरिदास, एच.डी.जाधव, मनोज पाडवी, अतुल शिखरे, अभिजीत अवताडे यांचे सहकार्य लाभले.

# मैंदर्गी उपनगराध्यक्षपदी सुरेश नागूर यांची बिनविरोध निवड

**नगराध्यक्षा अंजली बाजारामठ यांनी घेतला पदभार**

**स्वीकृत नगरसेवकपदी जक्कापुरे, बेपारी, पक्षनेत्या सुरेखा होळीकट्टी**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यातील मैंद्रगी नगरपालिका उपनगराध्यक्षपदी सुरेश नागुर यांचा बिनविरोध निवड करण्यात आला असून नगराध्यक्षा अंजली बाजारामठ यांनी पदभार घेतला. आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार व भाजप अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष तसेच नगरसेवकांचा गौरव करण्यात आला.

या निवड प्रक्रियेत सहायक अधिकारी म्हणून मुख्याधिकारी अर्जुन सुरवसे यांनी काम पाहिले.यावेळी स्विकृत नगरसेवकपदी सिद्धाराम जकापुरे, जाफर बेपारी यांची स्वीकृत निवड करण्यात आली. तर पक्षनेतेपदी सुरेखा होळीकट्टी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी नगरसेवक चौडाबाई दर्गी, अब्दुल गनी बाबुडे, भीमशा पुजारी, कावेरी पुजारी, भीमणा पुजारी, शिवचलप्पा मुनोळी, रोहिणी निंबाळ, पिरेश भंगर्गी, भौरम्मा गुडद, लाडलेबक्ष लुकडे, मेहराज लुकडे, मुतणा करजगी, रेश्मा उस्ताद, स्वप्ना मोरे, तिपणा नागणसुर, सुरेखा होळीकट्टी, काशीनाथ जकापुरे, बमनळळी, आरेनवरू, शिवम्मा विठ्ठल सरस्वती पोतेनवरू उपस्थित होते.

यावेळी राजशेखर मसूती,दयानंद बम नळळी, अनिल पाटील, तुकप्पा नागूर, मोतीराम राठोड, अशोक लोहार, नागणा दर्गी, बसवराज बेंणेसूर, रुडप्पा येळसंगी, विश्वनाथ हिरेमठ, श्रीशैल बिज्जरगी, योगीनाथ बाजारामठ उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र गायधनकर यांनी तर आभार वैशाली नन्ना यांनी मानले.

## शक्तिपीठ महामार्ग देवस्थळांमध्ये माढेश्वरी देवी व विठ्ठल मंदिराचा समावेश करा

**● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मणेर यांची मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेला नागपूर गोवा शक्तिपीठ मार्ग हा काही दिवसापूर्वीच माढा विधानसभा मतदारसंघातून जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. या महामार्गाचे नाव शक्तीपीठ मार्ग आहे जे की राज्यातील देवस्थानांना जोडण्यासाठी याची निर्मिती असणार आहे. त्यामुळे माढा शहराचे ग्रामदैवत तसेच शहरातील ऐतिहासिक प्राचीन विठ्ठल मंदिराचा या मार्गातील महत्त्वाच्या देवस्थानामध्ये समावेश करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव जहीर मणेर यांनी पत्राद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, शक्तिपीठ महामार्गास नुकतीच आपल्या लोकप्रिय शासनाने मंजुरी दिली असून माढा शहराच्या जवळून नियोजित शक्तिपीठ महामार्ग मार्गक्रमण करणार आहे. माढा जिल्हा सोलापूर येथे असलेले माढेश्वरी देवस्थान व पुरातन विठ्ठल मंदिर या दोन्ही देवस्थानांचा धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्वाचा ठसा आहे. पुराणसाहित्यातही या मंदिरांचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे. ही मंदिरे संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांच्या श्रद्धेच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहेत. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गावरील महत्वाच्या देवस्थान स्थळांमध्ये माढेश्वरी देवस्थान व प्राचीन विठ्ठल मंदिराचा समावेश करण्याची विनंती सादर करत असल्याचे पत्रात सांगण्यात आले आहे.



## यशवंत शरद प्रतिष्ठानचे उपक्रम कौतुकास्पद : नगरसेवक इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

अक्कलकोट शहर तालुक्यात कार्यरत असलेल्या यशवंत शरद प्रतिष्ठानकडून होणारे विकासाचे व माणसं एकत्र आणण्याचे समजपयोगी उपक्रम कौतुकास्पद असल्याचे मनोगत वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी व्यक्त केले. येथील पत्रकार सन्मान सोहळा व आरोग्य तपासणी आयोजित उपक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी हे होते. यावेळी मंचावर पत्रकार संघांचे अध्यक्ष बाबासाहेब निंबाळकर, राष्ट्रवादीचे अध्यक्ष दिलीप सिद्धे, डॉ.आर.व्ही. पाटील, सुभाष गडसिंग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. प्रकाश सुरवसे यांनी प्रास्तविक केले. यावेळी ३० पत्रकारांचा गौरव करून आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी नगरसेवकपदी निवडून आल्याबद्दल महेश इंगळे यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सुधाकर गोंडाळ, फरीद जमादार, नागनाथ पाटील, माणिक बिराजदार, शुक्राचार्य चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन शंकर व्हनमाने यांनी केले तर रमेश पुजारी यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय युवा दिनी नालसा डॉन योजनेअंतर्गत शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव पी. पी. पेठकर यांच्या सहकार्याने पंढरपूर तालुका विधी सेवा समिती व पंढरपूर अधिवक्ता संघ, पंढरपूर यांचे संयुक्त विद्यमाने सिंहगड अभियांत्रीकी महाविद्यालय, कोर्टी, (ता. पंढरपूर) येथे राष्ट्रीय युवा दिन निमित्त राष्ट्रीय नालसा डॉन योजनेअंतर्गत (ड्रग अवेअरनेस आणि वेलनेस नेव्हिगेशन - ड्रग-फ्री इंडिया योजना-२०२५ विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्यायाधीश एम. बी. कुलकर्णी, यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना व्यसनापासून दुर राहून जिद्द व चिकाटीने आयुष्यामध्ये यश मिळविण्याकरीता प्रयत्न करणेबाबत मार्गदर्शन केले. प्रथम शिबीराची प्रस्ताविका पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. व्ही. एम. भोसले यांनी केली. तसेच पंढरपूर अधिवक्ता संघाचे पदाधिकारी गणेश चव्हाण, राजेंद्र पुजारी, अंकुश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक शिबीरावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. कैलाश जे. कारंडे, उपप्राचार्य डॉ. श्री. स्वानंद जी. कुलकर्णी उपस्थित होते.

## माळशिरस येथे उद्यापासून अखंड हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १३ जानेवारी-**

माळशिरस येथे वै कृष्णकांत मारुतराव थोरात यांच्या ३१ व्या पुण्यस्मरणा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह सामुदायिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून गुरुवार दिनांक १५ जानेवारी रोजी या सोहळ्यास प्रारंभ होत असून गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी सांगता होणार आहे

या सोहळ्यासाठी गुरुवार १५ जानेवारी रोजी ह भ प गोरख महाराज रायते पंढरपूर शुक्रवार दिनांक १६ जानेवारी रोजी ह भ प अभिमन्यू महाराज कदम दहिगाव शनिवार दिनांक १७ जानेवारी रोजी ह भ प अमोल महाराज सूळ मोरोची रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी डॉ तुकाराम महाराज बोराडे नातेपुते सोमवार दिनांक १९ जानेवारी रोजी ह भ प श्रीराम महाराज अभंग रामकुंड मंगळवार दिनांक २० जानेवारी रोजी हभप संस्कार महाराज खंडागळे संगेवाडी बुधवार दिनांक २१ जानेवारी रोजी ह भ प कैलास महाराज केंजळे धर्मपुरी यांचे कीर्तन व गुरुवार दिनांक २२ जानेवारी काल्याचे होणार आहे.

बुधवार दिनांक २१ जानेवारी रोजी दुपारी चार वाजता भव्य दिव्य दिंडी नगर प्रदक्षिणा घोड्याचे उभे व गोल रिंगण व रात्र कीर्तनानंतर नेत्र दीपक दीपोत्सव होणार आहे हे सर्व कार्यक्रम विठ्ठल रुक्मिणी मंदिर माळशिरस येथे होणार असून नागरिकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आव्हान संयोजकांनी केले आहे



## ‘सह्याद्री’मध्ये राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जानेवारी-**

स्वराज्याच्या संकल्पनेच्या पहिल्या शिल्पकार राजमाता माँसाहेब जिजाऊ व भारताचे महान सुपुत्र, आध्यात्मिक क्रांतीचे जनक स्वामी विवेकानंद यांची जयंती सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे साजरी करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजित इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला.

डी.फार्मसी द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी भारती मोटेनी मनोगतात स्वामी विवेकानंदांनी नेहमीच तरुणांना शक्ती, स्वावलंबन आणि समाजाप्रती जबाबदारीचा संदेश दिला. राष्ट्रीय युवक सप्ताह अंतर्गत स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी तसेच पालक, नागरिक व कर्मचाऱ्यांनी संपूर्ण कॉलेज परिसराची स्वच्छता केली. याप्रसंगी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा.एस.पी.जोकार, प्रा.ए.व्ही. सपाटे, सांस्कृतिक विभागाचे डॉ.एन.ए.तांबोळी उपस्थित होते.



## राष्ट्रवादीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी गुरूनाथ जोडमोटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी मंद्रूप येथील गुरुनाथ जोडमोटे यांची निवड करण्यात आली आहे.

मंद्रूप येथील गुरुनाथ जोडमोटे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन प्रदेश कार्यकारीणी सदस्य अप्पाराव कोरे यांच्या शिफारशीवरून जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी जोडमोटे यांची निवड केली आहे. निवडीनंतर जोडमोटे यांनी दक्षिण तालुक्यामधील प्रत्येक घराघरात व तळागाळात राष्ट्रवादी पक्ष पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जेऊर येथे थॅलेसेमिया जागरूकता, विविध विषयावर मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१३ जानेवारी-**

जिव्हाळा ग्रुप करमाळा व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या करमाळा शाखेच्या वतीने जेऊर येथे थॅलेसेमिया जागरूकता व विविध विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन येथील आनंद पथसंस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश भाऊ करे पाटील ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड. डॉ. बाबुराव हिरडे, हरिदास डांगे, ड सविता शिंदे, श्रेणीक खाटेर उपस्थित होते होते. प्रास्ताविक करताना मेडिकल असोसिएशनच्या करमाळा शाखेचे अध्यक्ष डॉ. सुभाष सुराणा यांनी केले. या कार्यक्रमात आरोग्याबरोबरच शिक्षण शेती उद्योग या संदर्भात विवेक पात्रुडकर प्राचार्य नागेश माने, संजय चौधरी प्रकाश लावंड यांनी माहिती दिली केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सी.एम.एस परीक्षेत यश मिळवलेल्या भगवंत पवार बाळासाहेब रोंगे नानासाहेब साळुंके, संदीप कोठारी गंगाधर पोळ राजकुमार राठोड, दत्तात्रय पवार रेश्मा जाधव यांचा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला लोकविकास डेअरीचे चेअरमन दीपक देशमुख, आदिनाथ कारखान्याचे उपाध्यक्ष महेंद्र पाटील, डॉ. शारदा सुराणा, ज्योती मुथा, ॲड. अपर्णा पदमाळे माया जाधव, निळकंठ ताकमोगे, डी.के. पासंगराव, सुहास गलांडे राजेंद्र रणसिंग यांनी सुरवसे,भारत रोकडे भूषण लुंकड उपस्थित होते.

# पेनूरचा ‘किरण’ शासनाच्या पुरस्काराने सन्मानित

**मरीआई समाजातील युवा दिग्दर्शक रशीद निंबाळकर यांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि १३ जानेवारी-**

पेनूर (ता. मोहोळ) येथील युवा दिग्दर्शक रशीद निंबाळकर यांनी लेखन व दिग्दर्शन केलेल्या ‘किरण’ या मराठी लघुपटाला महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने पेनूरसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा सन्मान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, पुणे २०२५ अंतर्गत प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट-रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात ‘किरण’ मधील बालकलाकार अंजली निंबाळकर हिला उत्कृष्ट बालकलाकार



पुरस्काराने गौरविण्यात आले. अंजलीच्या सहज, प्रामाणिक आणि भावस्पर्शी अभिनयाची परीक्षक मंडळाने विशेष दखल घेतली. अंजली सध्या पेनूर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेत आहे.

‘किरण’च्या माध्यमातून पेनूर गावाचे, मरीआईवाले समाजाचे आणि सामाजिक भान जपणाऱ्या मराठी चित्रसृष्टीचे नाव उज्ज्वल झाले आहे. ‘किरण’ हा लघुपट बालमनातील संघर्ष, आशा, जिद्द आणि परिस्थितीशी झुंज देणाऱ्या निरागस आयुष्याचे प्रभावी दर्शन घडवतो. अंजली निंबाळकर हिने साकारलेली भूमिका विशेष परिणामकारक ठरली असून, ती या चित्रपटाचे भावनिक केंद्रबिंदू आहे. या लघुपटाचे निर्माते गिरीश यशवंत गवळी असून, संगीत डॉ. जयभीम शिंदे यांनी दिले आहे. सहाय्यक दिग्दर्शनात दामोदर पवार, उपकरण व्यवस्थापनात कृष्णा राऊत, संपादनात आकाश चौरसिया, डीआयमध्ये ईश्वर केरूरकर, स्थिर छायाचित्रणात अभि शिंदे, वेशभूषेत सचिन गवळी व गंगाधर नरहरे, ध्वनिमुद्रणात कृष्णा सोलुंके, तर मेकअप व डिझाइनमध्ये अब्दुल दिलावर इनामदार यांनी मोलाचे योगदान दिले आहे. किरण’ हा लघुपट पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रस्तुततेखाली साकार करण्यात आला असून. चित्रपट निर्मितीसाठी जनसंज्ञापन व पत्रकारिता विभागातील डॉ.अंबादास भास्के, प्रा. डॉ. तेजस्विनी कांबळे, यशवंत विश्वंभर गवळी, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे विशाल पवार, राष्ट्रपती पुरस्कार विजेते अमर देवकर, फिल्ममेकर नवनाथ निकम व अगस्त्य कबीर यांचे मार्गदर्शन लाभले. भटक्या-विमुक्त समाजातून पुढे आलेले रशीद निंबाळकर हे सामाजिक वास्तव, मानवी भावभावना आणि बालजीवनातील प्रश्न प्रभावीपणे मांडणारे युवा दिग्दर्शक म्हणून ओळखले जात आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांच्या ‘इरगाल’ या चित्रपटाला २०२१ च्या राज्य चित्रपट पुरस्कारांसाठी चार नामांकन मिळाले होते.

> एका कलाकाराचा किंवा एका चित्रपटाचा नसून, सामाजिक वास्तव मांडणाऱ्या संवेदनशील दृष्टीकोनाचा आणि वंचित समाजातून पुढे येणाऱ्या सर्जनशील प्रतिभेचा सन्मान आहे. अत्यंत मर्यादित साधनसामग्री असूनही दर्जेदार कलाकृती साकारत ‘किरण’च्या संपूर्ण टीमने आपली वेगळी छाप उमटवली आहे. हा पुरस्कार नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा असून, ग्रामीण व वंचित समाजातील कलावंतांच्या क्षमतेचे सशक्त उदाहरण आहे. किरण’च्या माध्यमातून मिळालेला हा सन्मान पेनुर गावासाठी, मरीआई वाले समाजासाठी आणि सामाजिक भान जपणाऱ्या मराठी चित्रसृष्टीसाठी गौरवाची बाब आहे.
>
> **-रशीद निंबाळकर, लेखक -दिग्दर्शक**

# पदयात्रा, रॅलीने झाली प्रचाराची सांगता

## उद्याच्या मतदानाविषयी उत्सुकता; शुक्रवारी होणार मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरु असलेल्या प्रचाराच्या तोफा मंगळवार, दि.१३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता थंडावल्या. विविध राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांनी पदयात्रा व रॅलीद्वारे शक्तीप्रदर्शन करत प्रचाराची सांगता केली.

ढोल-ताशांचा गजर, घोषणाबाजी, झेंडे-बॅनर यामुळे राजकीय वातावरण भारले होते. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, गल्लीबोळ व वस्त्यांमध्ये उमेदवारांसह नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. सर्वांगीण विकास, पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य या मुद्द्यांवर उमेदवारांनी मतदारांना साद घातली. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात घरोघरी गाठीभेटी, नागरिकांशी संवाद यांसारख्या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले. पदयात्रेत महिला व युवकांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. नागरिकांनी उमेदवारांचे औक्षण करून शुभेच्छा दिल्या. काही भागातील संस्था-संघटनांनी उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला. प्रचाराच्या गदारोळानंतर शहरात निवडणूकपूर्व शांतता जाणवू लागली आहे.

गेल्या अकरा दिवसात विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी प्रचाराची रणधुमाळी उठवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा झाली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा प्रचार दौरा झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निवडणुकीदरम्यान सोलापुरातच तळ ठोकून होते. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर, युवा नेते सुजात आंबेडकर यांनीही झंझावती प्रचार दौरा केला. विविध पक्षाच्या दिग्गज नेत्यांनीही प्रचाराच्या निमित्ताने सोलापुरात हजेरी लावली होती.

गुरुवार, दि.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदानाच्या निमित्ताने सर्वच उमेदवारांचे भवितव्य मतयंत्रात बंद होणार आहे. शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी व निकाल घोषित करण्यात येणार आहे. सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

दरम्यान, विविध ३५३ ठिकाणी एकूण १०९१ मतदान केंद्रात मतदानासाठी तयारी करण्यात येत आहे. निवडणूक यंत्रणेशी निगडित प्रशासन व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली आहे.



## प्रभाग क्रमांक २६ मधील जनता जनार्दनाची दीपक जमादार यांना साथ, विरोधकांना देणार मात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. प्रभाग क्रमांक २६ (ब) मध्ये भारतीय जनता पक्षाचे तरुण आणि तडफदार उमेदवार दीपक जमादार यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. या प्रभागातील जनता जनार्दन दीपक जमादार यांना साथ देत विरोधकांवर मात करणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



'युवाशक्तीची नवी दिशा, विकासाची नवी ओळख' हे ब्रीदवाक्य घेऊन रिंगणात उतरलेल्या जमादार यांनी आपल्या पदयात्रेद्वारे मतदारांशी थेट संवाद साधण्यावर भर दिला आहे. दीपक जमादार हे नागरिकांच्या प्रश्नांवर आणि स्थानिक नागरी समस्यांवर सातत्याने काम करत आहेत. प्रचार फेरी दरम्यान महिलांनी ठिकठिकाणी त्यांचे औक्षण करुन स्वागत केले. तरुणांमध्ये त्यांच्याबद्दल मोठी क्रेझ दिसून येत असून, 'युवा नेतृत्व-विकासाचे नेतृत्व' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रभागातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी जमादार यांनी दिलेले आश्वासन आणि त्यांचा आजवरचा जनसंपर्क यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल मोठी विश्वासार्हता निर्माण झाली आहे. प्रचार मोहिमेत केवळ तरुणच नव्हे तर ज्येष्ठांचाही मोठा सहभाग पाहायला मिळाला. भाजपच्या कमळ चिन्हावर मतदान करून विकासाची ही गंगा अखंड वाहती ठेवण्याचा संकल्प अनेक मतदारांनी यावेळी केला.

प्रभाग २६ मधील जनतेचा मिळणारा प्रतिसाद पाहता या प्रभागातून भाजपच्या दीपक जमादार यांचा विजय सुनिश्चित मानला जात आहे. त्यांच्या या विजयानंतर हा परिसर विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.



## मोची समाजाचा भाजपाला निर्णायक पाठिंबा

### प्रभाग २२ मधील किसन जाधव पॅनलला मोठे बळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. २२ मधील भाजपाचे उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, अंबिका नागेश गायकवाड आणि चैत्राली गायकवाड यांच्या पॅनलला मोची समाजाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

प्रभाग २२ मध्ये मोची समाजाची मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वास्तव्यास असल्याने हा पाठिंबा निवडणुकीत निर्णायक ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

मोची समाजाच्या सांस्कृतिक भवनासाठी शासन स्तरावरुन ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करुन घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याबद्दल भाजप उमेदवार किसन जाधव यांचे विशेष आभार मानण्यात आले. सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी मोची समाजाच्या विकासासाठी २ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर केल्यामुळे समाजाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्नांना गती मिळाल्याचे नमूद करण्यात आले.

मोची समाजाचे शहर-जिल्हाध्यक्ष तथा स्थायी समितीचे माजी सभापती देवेंद्र भंडारे म्हणाले की, खासदार प्रणिती शिंदे यांनी त्यांच्या गेल्या पंधरा वर्षांच्या आमदारकीच्या काळात मोची समाजाचा केवळ निवडणूकपुरता वापर केला. समाजाच्या मूलभूत प्रश्नांसाठी ठोस निर्णय घेतले गेले नाहीत. याउलट भाजप सरकार आणि आ. देवेंद्र कोठे यांनी प्रत्यक्ष निधी उपलब्ध करून समाजाच्या विकासाला चालना दिली आहे.

दरम्यान, राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे यांच्या उपस्थितीत रेवणसिध्देश्वर मंदिर परिसरात भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य कॉर्नर सभा पार पडली. या सभेत परिसरातील मतदारांनी भाजप पॅनलला उत्स्फूर्त पाठिंबा दर्शविला. यावेळी जेम्स जंगम, नागनाथ कासलोलकर यांच्यासह मोची समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुळे सोलापूरमधील बसवेश्वर उद्यानाची निर्मिती निर्णायक ठरणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

माजी उपमहापौर राजेश काळे यांनी आपल्या कारकिर्दीत बसवेश्वर उद्यानासाठी दोन एकर जागा आरक्षित करुन ती जागा उद्यानासाठी अधिकृत मंजूर करुन घेतली. बसवेश्वर उद्यानाच्या निर्मितीसाठी त्यांनी दिलेल्या भरीव योगदानाचा विचार करता शिवसेनेच्या उषा राजेश काळे यांना लिंगायत समाजाचा भक्कम पाठिंबा मिळणार असल्याचे सांगण्यात येते.

केवळ कागदी ठराव न करता प्रत्यक्ष पाठपुरावा, सातत्यपूर्ण बैठका, महापालिकेत प्रस्ताव मांडणे, निधी उपलब्ध करुन देणे, कामकाजाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनावर दबाव टाकणे ही सर्व प्रक्रिया त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन पूर्ण केली. बसवेश्वर महाराजांचे विचार, लिंगायत समाजाची अस्मिता आणि जुळे सोलापूरच्या विकासाचा दीर्घकालीन विचार करुन उभारलेले बसवेश्वर उद्यान लिंगायत समाजासाठी वैचारिक आणि सामाजिक केंद्र बनत आहे. यंदा विरोधकांकाडकून लिंगायत समाजाचा विचार न करता सर्वसाधारण जागेवर ओबीसी प्रवर्गाचा उमेदवार देण्यात आल्याने तीव्र नाराजी आहे.

मतं हवीत, पण प्रतिनिधित्व नको या भूमिके मुळे समाजामध्ये भाजपविरोधात असंतोष पसरलेला दिसून येतो. अनेक बैठका, समाजबांधवांचे मेळावे आणि चर्चांमधून हा राग उघडपणे व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर राजशेखर बिराजदार पाटील यांनी शिवसेना शिंदे गटात केलेला प्रवेश हा लिंगायत समाजासाठी निर्णायक ठरणारा टप्पा मानला जात आहे. समाजातील प्रभावी नेतृत्व शिवसेनेत सहभागी झाल्यामुळे कार्यकर्त्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत एक सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. एकीकडे बसवेश्वर उद्यानासाठी प्रत्यक्ष काम करणारे राजेश काळे, आणि दुसरीकडे समाजाच्या नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करणारे राजशेखर बिराजदार पाटील या दुहेरी घटकांमुळे लिंगायत समाज शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हाच्या बाजूने ठामपणे उभा राहील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

विकासाचे प्रत्यक्ष काम, समाजाच्या अस्मितेला दिलेला सन्मान आणि योग्य राजकीय प्रतिनिधित्व या तिन्ही मुद्द्यांमुळे जुळे सोलापूरमधील लिंगायत समाजाचा कल शिवसेना शिंदे गटाकडे झुकलेला दिसून येत आहे. आगामी निवडणुकीत याचे प्रतिबिंब स्पष्टपणे मतपेटीतून उमटेल, अशी चर्चा सर्वत्र रंगली आहे.

## 'भारतमाता की जय'च्या घोषात प्रभाग ७ मधील प्रचाराचा समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

ढोल ताशांच्या गजरात, 'भारतमाता की जय'च्या घोषात भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रभाग क्रमांक ७ मधील प्रचाराचा समारोप करण्यात आला.

पत्रा तालीम, छत्रपती शिवाजी महाराज चौक, धरमसी लाईन, लोभा मास्तर चाळ, निर्मल नगर, ११७ उमा नगरी, लोकमंगल ऑक्सीपार्क, १०५ उमा नगरी, सिध्दीजिन सोसायटी, जुनी पोलीस लाईन, हिरज नाका या मार्गावरुन ही पदयात्रा काढण्यात आली.

भारतीय जनता पार्टीचे प्रभाग क्रमांक ७ चे उमेदवार आनंद कोलारकर, श्रध्दा पवार, उत्तरा बचुटे-बरडे, पद्माकर काळे यांनी मतदारांच्या भेटीगाठी घेऊन भाजपाच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. मतदारांनी भाजपच्या उमेदवारांचे पुष्पहार घालून, फटाक्यांच्या माळा उडवून, रांगोळ्या घालून स्वागत केले. यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या चारही उमेदवारांना प्रचंड मोठ्या मताधिक्याने निवडून आणणार असल्याचा विश्वास मतदारांनी उमेदवारांना आणि भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, पुरुषोत्तम बरडे, निवडणूक प्रमुख श्रीकांत घाडगे, सुरज बंडगर, जयवंत सलगर, महेश बोकन, सतीश कुदळे, शेखर फंड, विनोद मोटे, दादा सुरवसे, संदिप जाधव यांच्यासह कार्यकर्ते, मतदार उपस्थित होते.



## प्रभाग १३ मध्ये 'रोड शो'द्वारे भाजपचे महाशक्ती प्रदर्शन

### ढोल-ताशा, फटाक्यांत विकासाचा जयघोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने प्रभाग १३ मधील भाजपाचे अधिकृत उमेदवार सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, सुनिता कामाठी आणि अंबिका चौगुले यांच्या प्रचारार्थ भव्य शक्तीप्रदर्शन रोडशो काढण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत निघालेल्या या रोडशोने संपूर्ण प्रभाग भाजपमय झाला होता. विशेषतः लाडक्या बहिणींचा मोठ्या संख्येने सहभाग हे या रोडशोचे आकर्षण ठरले.

विकास हाच आमचा अजेंडा या घोषणेसह भाजपाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ठामपणे उतरले. आमदार देवेंद्र कोठे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर जनतेचा विश्वास असल्याचे उमेदवारांनी यावेळी व्यक्त केले. अशोक चौक, बोल्ली मंगल कार्यालय, साईबाबा चौक, मस्ताना हॉटेल, खड्डा तालीम, आम्रपाली चौक, वालचंद कॉलेज परिसर यासह प्रभागातील विविध भागांतून काढण्यात आला. रस्त्यांच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी करून उमेदवारांचे स्वागत केले.

हातातील भगवे झेंडे, कार्यकर्त्यांचा जल्लोष आणि घोषणांनी संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शक्तीप्रदर्शनाने भाजपाच्या प्रचाराला निर्णायक उंची मिळाली असून मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजय संकल्प रॅलीचे प्रभाग क्रमांक १३ मधील विविध नगरांमध्ये मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शंकर चौगुले, गुर्रम, चिप्पा, आणि कामाठी समर्थकांसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रभाग १७ मध्ये भाजपचे महाशक्तीप्रदर्शन रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १३ जानेवारी**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम दिवशी म्हणजे मंगळवारी प्रभाग क्रमांक १७ मधील भाजपाचे अधिकृत उमेदवार निर्मला जंगम, भारतसिंग बडूरवाले, जुगनबाई आंबेवाले, रवी कय्यावाले यांच्या प्रचारार्थ भव्य शक्तीप्रदर्शन विजय संकल्प रॅली काढण्यात आली.



लाडक्या बहिणींनी भाजप उमेदवारांचे पुष्पहार घालून, ओवाळणी करत मोठ्या उत्साहात स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत निघालेल्या या विजय संकल्प रॅलीने संपूर्ण प्रभाग भाजपमय झाला होता. विशेषतः लाडक्या बहिणींचा मोठ्या संख्येने सहभाग हे या रॅलीचे आकर्षण ठरले. विकास हाच आमचा अजेंडा या घोषणेसह भाजपाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ठामपणे उतरले आहेत. आमदार देवेंद्र कोठे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर जनतेचा विश्वास असल्याचे उमेदवारांनी सांगितले. दरम्यान, भाजपाच्या चारही उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. लष्कर, जगदंबा चौक, बेडर पूल, नळ बाजार चौक, सत्यनाम चौक, मौलाली चौक, कुंभार गल्ली, गावंडे गल्ली, जांबमुनी चौक, शास्त्रीनगर परिसर यासह प्रभागातील विविध भागांतून काढण्यात आली

राज्य व केंद्र सरकारच्या भरीव योजनांच्या आधारे आम्ही जनतेकडे मतदानरुपी आशीर्वाद मागितले आहोत. या विजय संकल्प रॅलीचे प्रभाग क्रमांक १७ मधील विविध नगरांमध्ये मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यामुळे आमचा विजय निश्चित मानला जात आहे, असा विश्वास उमेदवार भारतसिंग बडूरवाले आणि रवी कय्यावाले यांनी यावेळी व्यक्त केला.

## प्रभाग ६ मधील जनता करेल शिवसेना, भाजपच्या उमेदवारांचा पराभव

### अपक्ष उमेदवार मनोहर सपाटे यांच्या पॅनलची भव्य रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

प्रभाग ६ मध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून निवडून येऊन सुध्दा या भागामध्ये एकही ठोस काम न केलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या आणि भाजपच्या उमेदवारांचा जनता या निवडणुकीत निश्चितपणे पराभव करेल, असा विश्वास अपक्ष उमेदवार मनोहर सपाटे यांनी व्यक्त केला.



करुन आपण कामाचा माणूस असल्याने लोक आपलाच विजय करतील, अशी आपल्याला खात्री असल्याचा दावा शिवसेना ठाकरे गट पुरस्कृत अपक्ष उमेदवार, माजी महापौर मनोहर सपाटे यांनी व्यक्त केला. सपाटे पुढे म्हणाले की, कष्ट, प्रामाणिकपणा, सात्विकतेच्या विचारातून एकत्र आलेले आपले पॅनल आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजपचे उमेदवार नैतिकतेपासून दूर असून त्यांना संविधान मान्य नाही. प्रभाग सहा मधील शिवसेना ठाकरे गट पुरस्कृत अपक्ष उमेदवार मनोहर सपाटे, रेखा लहू गायकवाड, कीर्ती शिंदे, अंकुश राठोड यांच्या प्रचारार्थ देगाव परिसरातील बसवेश्वरनगर तांडा, देगाव, कोयनानगर, थोबडे वस्ती, दमाणीनगर भागात रॅली काढण्यात आली. दादागिरी, गुंडगिरी व दहशतीच्या जोरावर लोकशाही संपुष्टात आणण्याचा प्रयत्न हे लोक करत आहेत. गेल्या पंधरा वर्षांत या प्रभागात सत्तेचा गैरवापर झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रभागातील अपक्ष उमेदवार रेखा गायकवाड, कीर्ती शिंदे व अंकुश राठोड यांनी देखील मनोगत केले. याप्रसंगी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.